CMYK





# सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ३१ मार्च २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १४२ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





# संघ हा भारतीय संस्कृतीचा अक्षय वट : पंतप्रधान



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी हेडगेवार स्मृतिमंदिराला भेट देऊन रा. स्व. संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची समाधी, द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी यांच्या स्मृतिचिन्हाला अभिवादन केले. तसेच दीक्षाभूमी येथे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला वंदन केले

## राष्ट्रयज्ञाच्या पावन अनुष्ठानात मला येण्याचे सौभाग्य

## माधव नेत्रालयाची लाखो लोकांना सेवा

## योग आणि आयुर्वेदाला जगात मानाचे स्थान

◆ **नागपूर, ३० मार्च**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भारताच्या अमर संस्कृतीचा आधुनिक अक्षय वट आहे. हा अक्षय वट आज भारतीय संस्कृतीला, आपल्या राष्ट्रचेतनेला निरंतर ऊर्जावान बनवीत आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी येथे केले.

हिंगणा मार्गावरील माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरचा शिलान्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, स्वामी अवधेशानंद गिरी महाराज, स्वामी गोविंददेव गिरी महाराज, माधव नेत्रालय चॅरिटेबल ट्रस्टचे सरचिटणीस डॉ. अविनाशचंद्र अग्निहोत्री व्यासपीठावर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, रा. स्व. संघ अशी संघटना आहे, जी अंतर्दृष्टी व बाह्यदृष्टी दोन्हींसाठी काम करीत आहे. आपले शरीर परोपकार, सेवेसाठीच बनले आहे. सेवा संस्कारात येते तेव्हा ती साधना बनते. हीच साधना स्वयंसेवकांच्या जीवनाची प्राणवायू आहे. सेवा, संस्कार ही साधना आहेत तसेच प्राणवायू देखील आहे जो प्रत्येक पिढीतील प्रत्येक स्वयंसेवकाला तपस्येसाठी प्रेरित करीत आहे.

राष्ट्रयज्ञाच्या या पावन अनुष्ठानात आज मला येथे येण्याचे सौभाग्य प्राप्त झाले. संघसेवेचे पवित्र तीर्थस्थान असलेल्या नागपुरात आज एका पुण्यसंकल्पाच्या विस्ताराचे आपण साक्षीदार झालो आहोत. माधव नेत्रालय अशी संस्था आहे जी अनेक दशकांपासून गुरुजींच्या आदर्शानुरूप लाखो लोकांची सेवा करीत आहे.

पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना सर्वांच्या प्रयत्नांबद्दल बोललो होतो. आरोग्य क्षेत्रातील सुधारणांमध्ये देशाला पुढे घेऊन जाण्याचा संकल्प जाहीर केला. गोरगरिबांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी केंद्र शासन कसोशीने कार्य करीत आहे. माधव नेत्रालयानेही यात योगदान देत गेल्या तीन दशकांपासून लोकांच्या जीवनात प्रकाश आणण्याचे मोलाचे कार्य केल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

देशात ५१ हजार डायलिसिस केंद्रे आहेत. ग्रामीण भागात आयुष्यमान भारत केंद्रे उभारण्यात आली आहेत. कोट्यवधी लोकांना आरोग्यसेवा पुरविण्यात आल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रथमच देशात वैद्यकीय शिक्षण मातृभाषेत उपलब्ध करून देण्यात आले. वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागा वाढविण्यात आल्या आहेत, असे पंतप्रधान म्हणाले.

योग आणि आयुर्वेदालाही जगात मानाचे स्थान मिळाले आहे. आरोग्यसेवांपासून कुणी वंचित राहू नये, असे शासनाचे धोरण असून त्यानुसार सक्षमपणे कार्य सुरू आहे. विदर्भातील थोर संत प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज हे जन्मतः अंध होते. मात्र अंधत्वावर मात करीत त्यांनी ज्ञानाची दृष्टी विकसित केली. दृष्टी बोधातून येते. विवेकातून प्रकट होते, याचा आदर्श वस्तुपाठच त्यांनी घालून दिला आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांसारख्या अनेक संतांनी राष्ट्रीय चेतनेत आपल्या मौलिक विचारांनी प्राण फुंकले. भारताला एकसंध ठेवत उत्तम शिकवण दिल्याचे उद्गार पंतप्रधान मोदी यांनी काढले.


संघटन, समर्पण व सेवा ही त्रिवेणी विकसित भारताच्या निर्माणासाठी दिशा व ऊर्जा देत राहील, असे मोदी म्हणाले.

प्रारंभी माधव नेत्रालय चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष निखिल मुंडले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे स्वागत केले. डॉ. मोहनजी भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही उद्‌बोधन केले.

महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधि व न्याय राज्यमंत्री ॲड. आशिष शेलार, गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, आ. समीर मेघे, कुलगुरू प्रशांत बोकारे, सुरेश शर्मा, रा. स्व. संघाचे अनेक ज्येष्ठ प्रचारक, पदाधिकारी, राजकीय, वैद्यकीय तसेच विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, उपायुक्त लोहित मतानी, सहायक पोलिस आयुक्त नरेंद्र हिवरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी या कार्यक्रमस्थळी चोख सुरक्षा ठेवली. (तभा वृत्तसेवा)

### पंतप्रधानांची मराठीत सुरुवात

पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपुरात आले आणि मराठीत बोलणार नाहीत, असे होऊच शकत नाही. भारत मातेचा जयघोष केल्यानंतर 'गुढीपाडवा आणि नवीन वर्षाच्या आपल्या सर्वांना अतिशय मनःपूर्वक शुभेच्छा' असे म्हणत त्यांनी उपस्थितांच्या हृदयाला साद घातली. आज चैत्र शुद्ध प्रतिपदेचा हा दिवस विशेष आहे. आजपासून नवरात्रीचे पवित्र पर्व सुरू होत आहे. गुढीपाडवा, उगाडी, नवरोजचा सण साजरा केला जात आहे. आज भगवान झुलेलाल, गुरू अंगददेव यांचा अवतरण दिवसही आहे. प्रेरणापुंज डॉ. हेडगेवार यांची जयंती आहे. रा. स्व. संघाच्या गौरवशाली यात्रेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. अशा वेळी स्मृती मंदिरात जाऊन डॉ. हेडगेवार व श्रीगुरुजींना श्रद्धांजली वाहण्याची संधी मिळाली, याकडे त्यांनी लक्ष वेधले.



अक्कलकोट स्वामी समर्थ यांचा आज प्रकटदिन



आज संत झुलेलाल जयंती

## दीक्षाभूमी भेटीतून पंतप्रधानांनी घडविले समतेचे दर्शन

**नागपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागपुरात आगमन झाल्यानंतर पहिले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयाला भेट दिली. त्यानंतर ते दीक्षाभूमीत दाखल झाले. तेथे त्यांनी गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या ठिकाणी त्यांनी प्रार्थना देखील केली. संघभूमी आणि नंतर दीक्षाभूमीला भेट देऊन त्यांनी समतेचे दर्शन घडविल्याची भावना व्यक्त होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंती सोहळ्याच्या निमित्ताने दीक्षाभूमीला भेट दिली होती. त्यानंतर आता ते दुसऱ्यांदा दीक्षाभूमीवर पोहोचले आहेत. विशेष म्हणजे पंतप्रधान पदावर असताना त्यांनी दुसऱ्यांदा दीक्षाभूमीला भेट दिली आहे. पदावर असताना दोनदा दीक्षाभूमीला भेट देणारे ते पहिलेच पंतप्रधान ठरले आहेत. यापूर्वी अटल बिहारी वाजपेयी आणि डॉ. मनमोहन सिंग यांनी पंतप्रधान पदावर असताना दीक्षाभूमिला भेट दिली होती. यावेळी त्यांच्यासोबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही उपस्थिती होती.

## सुसंस्कृत राज्यासाठी देवेंद्र फडणवीसांना पाठींबा : राज ठाकरे

**मुंबई, दि.३० मार्च-**

लोकसभेत मोदींना बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या राज ठाकरेंनी आता देवेंद्र फडणवीसांना पाठिंबा देण्याची भाषा केली आहे. महाराष्ट्राचे प्रश्न सोडवणार असतील, मराठी माणसाच्या चांगल्यासाठी काम करणार असतील तर फडणवीसांना पाठिंबा असेल असं राज ठाकरेंनी गुढीपाडवा मेळाव्यातून जाहीर केलं. सगळे पक्ष महापालिका निवडणुकांची तयारी करत असताना राज ठाकरेंनी हे मोठं वक्तव्य केलं आहे. तसेच भाजपच्या इतर सर्व मुद्द्यांना विरोध करत राज ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांना मात्र पाठिंबा जाहीर केल्यानं अनेकांच्या भुवयाही उंचावल्या आहेत.



राज ठाकरे म्हणाले की, निवडणुका संपल्या, शिमगा संपला. देवेंद्र फडणवीसांच्या हाती एक सुसंस्कृत राज्य आलेलं आहे. मराठी माणसासाठी जर चांगल्या गोष्टी करणार असाल तर आमचा तुम्हाला निश्चितपणे पाठिंबा आहे. पण प्रत्येक गोष्ट आमचं ऐकून करा.

**पाठिंबा भाजपला की महायुतीला?**

राज ठाकरेंच्या या वक्तव्याने काही प्रश्न देखील जन्माला घातले आहेत. राज ठाकरेंचा फक्त फडणवीसांना म्हणजेच भाजपला पाठिंबा असेल की महायुतीला? शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी वगळून राज ठाकरेंचा फडणवीसांना पाठिंबा असेल? या प्रश्नाची उत्तर कधी मिळणार याची महाराष्ट्राला उत्सुकता असेल.

औरंगजेबाची कबर असायला हवी : ज्या फडणवीसांना राज ठाकरेंनी पाठिंबा जाहीर केला आहे त्या फडणवीसांच्या भाजपनं औरंगजेबाची कबर हटवण्याची भूमिका घेतली आहे. मात्र शिवरायांच्या पराक्रमाची साक्षीदार म्हणून औरंगजेबची कबर असली पाहिजे अशी भूमिका राज ठाकरेंनी जाहीर केली. जो औरंगजेब महाराष्ट्रावर चाल करून आला होता त्याला मराठ्यांनी याच मातीत गाढलं. औरंगजेबाची कबर पाहून हा इतिहास प्रत्येकाला समजेल. शिवरायांचा पराक्रम शिकवण्यासाठी शाळेच्या सहली औरंगजेबच्या कबरीजवळ नेल्या पाहिजेत असा सल्लाही त्यांनी दिला. चित्रपट पाहून जागे होणारे हिंदू काही कामाचे नाहीत असा टोला देखील राज ठाकरेंनी लगावला.

दरम्यान राज ठाकरेंनी विविध विषयांवरून विरोधकांना धारेवर धरलं. मनसे हा हरलेला पक्ष नाही असं बोलून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. प्रयागराजमध्ये झालेल्या गंगास्नानावरून देखील त्यांनी नदी सफाईचा मुद्द्याला पुन्हा हात घातला. गंगा सफाईवरून राज ठाकरेंनी घेतलेल्या भूमिकेवर टीका करणाऱ्यांना देखील धू-धू धुतल्याचं दिसून आलं. दुसरीकडे, संतोष देशमुख हत्या प्रकरण, बीडमधील वाढती गुन्हेगारी आणि मराठी माणसांचे प्रश्न अशा अनेक विषयांवर राज ठाकरे यांनी बोट ठेवलं. तर येत्या महापालिका निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश राज ठाकरेंनी दिले.

## हैदराबादचे बलून सांगोला शहरात लँड

### जिवितहानी नाही मात्र अनेक वाहनांचे झाले नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० मार्च-**

ताऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी सोडण्यात आलेले टी आइ एफ आर, बेलून फेसिलिटी, हैदराबादचे बलून सांगोला शहरातील खडतरे गल्ली येथे लँड झाल्याची घटना रविवार दि.३० मार्च रोजी सकाळी साडेसहा ते सातच्या दरम्यान घडली. सदर घटनेमध्ये सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही परंतु एका चार चाकी व दुचाकी वाहनाचे नुकसान झाले.

याबाबत अधिक माहिती अशी, हैदराबाद येथील टी आइ एफ आर, बेलून फेसिलिटीचे बलून ताऱ्यांचा अभ्यास करण्यासाठी शनिवार दि.२९ मार्च रोजी रात्री सोडण्यात आलेले होते. सदर बलून हे रविवार दि.३० मार्च रोजी सकाळी साडेसहा ते सातच्या दरम्यान सांगोला शहरातील खडतरे गल्ली येथील गजानन खडतरे यांच्या घरासमोर लँड झाले. सुदैवाने त्यावेळी तेथे कोणीही मनुष्य उपस्थित नव्हते. ते एका चार चाकी व दुचाकी वर लँड झाले. त्यामुळे त्या दोन्ही वाहनांचे नुकसान झाले.



सदर बलून मध्ये एक टेलिस्कोप इन्स्ट्रुमेंट असून ह्याच्या माध्यमातून आम्ही ताऱ्यांचा अभ्यास करतो. सदर इन्स्ट्रुमेंट आम्ही बलून मध्ये ठेवतो व रात्री ते सकाळपर्यंत चालू ठेवतो नंतर सकाळी लँड करतो. आम्ही ह्या इन्स्ट्रुमेंटला लेबल लावतो की हे बलून लँड झाले तर आम्हाला संपर्क करा. सांगोला येथे पहिल्यांदाच हे बलून लँड झाले असून सहसा आंध्रप्रदेश व कर्नाटक मध्ये लँड होते अशी माहिती टी आइ एफ आर, बेलून फेसिलिटी, हैदराबादचे सतीश पुजारी यांनी दिली.




**सोलापूर :** गुढीपाडव्या निमित्त जुळे सोलापूर येथील हिंदू नववर्ष महोत्सव समितीच्या वतीने रविवारी सायंकाळी शोभायात्रा काढण्यात आली. त्याप्रसंगीचे छायाचित्र.

## गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्यात ८६, ८१४ वाहनांची नोंदणी

**मागील वर्षाच्या तुलनेत ३० टक्के अधिक**

◆ **मुंबई, ३० मार्च**

राज्यामध्ये दुचाकी चारचाकी व अन्य वाहनांच्या नवीन खरेदीची नोंदणी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मागील सात दिवसांत मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे. नवीन वाहन खरेदीची नोंदणी २०२४ च्या तुलनेत यावर्षी तब्बल ३० टक्के जास्त वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे. राज्यात ८६,८१४ वाहनांची नोंदणी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर करण्यात आली.



गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर अनेक नागरिक नवीन वाहनांची खरेदी करतात. या वाहनांची नोंदणी संबंधित प्रादेशिक परिवहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंतर्गत करण्यात येते. नागरिकांमध्ये वाहन खरेदीचा उत्साह दिसून येत असल्यामुळे, यंदा वाहन नोंदणी मध्ये ३० टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. तब्बल २०,०५७ वाहने मागील वर्षाच्या तुलनेत अधिक खरेदी करण्यात आल्याचे आकडेवारीवरून दिसून येते.

चारचाकी वाहन प्रकारात २०२५ मध्ये २२,०८१ वाहनांची नोंदणी करण्यात आली. ही मागील वर्षीच्या तुलनेत ४,९४२ ने जास्त आहे. याची टक्केवारी २८.८४ टक्के आहे. मोटारसायकल, स्कूटर या दुचाकी वाहन प्रकारात २०२५ मध्ये ५१,७५६ नवीन वाहनांची खरेदी नागरिकांकडून करण्यात आली आहे. मागील वर्षी हीच खरेदी ४०,६७५ एवढी होती. यामध्येही ११,०८१ ने वाढ नोंदविण्यात आली असून, २७.१४ टक्के अधिकची नोंदणी झाल्याचे निदर्शनास येत आहे. (वृत्तसंस्था)

### सर्वाधिक नोंदी पुणे परिवहन कार्यालयात

राज्यात सर्वांत जास्त पहिल्या पाच परिवहन कार्यालयांच्या अंतर्गत वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे. त्यामध्ये पुणे परिवहन कार्यालयात ११,०५६, पिंपरी-चिंचवड परिवहन कार्यालय अंतर्गत ६,६४८, नाशिकअंतर्गत ३,६२६, मुंबई (मध्य) परिवहन कार्यालयाअंतर्गत ३,१५४ आणि ठाणे परिवहन कार्यालयाअंतर्गत ३,१०७ वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे, असे परिवहन विभागाकडून कळविण्यात आले.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### ठाण्यात प्रतिबंधित खोकल्याच्या २३८ बाटल्या जप्त

**ठाणे** : पोलिसांनी ठाणे जिल्ह्यात एका व्यक्तीकडून मोटारसायकलवरून बेकायदेशीरपणे नेण्यात येणाऱ्या ५३,५५० रुपये किमतीच्या बंदी असलेल्या कोडीनयुक्त खोकल्याच्या २३८ बाटल्या जप्त केल्या आहेत, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. शिल डायघर परिसरातील सिबली नगर येथे २२ वर्षीय तरुणाला मोटारसायकलवरून प्रवास करताना पोलिसांच्या पथकाने अटक केली. तपासणी दरम्यान त्याच्याकडे दोन बॉक्समध्ये ठेवलेल्या बंदी असलेल्या कोडीनयुक्त खोकल्याच्या २३८ बाटल्या आढळल्या, असे शिल- डायघर पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याने सांगितले. कॅब चालक असलेल्या या व्यक्तीची दुचाकी, १,८०० रुपये रोख आणि एक मोबाईल फोन सुद्धा त्याच्याकडून जप्त करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

### पाक सैन्याच्या ड्रोन हल्ल्यात १२ अतिरेकी ठार

**पेशावरः** खैबर पख्तुनख्वा प्रांतातील दहशतवादी अड्डयावर पाकिस्तानी सैन्याने केलेल्या ड्रोन हल्ल्यात १२ अतिरेकी ठार झाले. या घटनेत अनेक नागरिकांना जीव गमवावा लागला. नागरिकांच्या मृत्यूचा आकडा समोर आलेली नाही. स्थानिय प्रशासनाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, शनिवारी सकाळी मर्दान जिल्ह्यातील कातलांग या दुर्गम डोंगराळ भागात अतिरेकी लपून असल्याची गोपनीय माहिति मिळाल्यानंतर लष्कराने लक्ष्य करीत ड्रोन हल्ला केला. या कारवाईत १२ अतिरेकी ठार झाल्याची पुष्टी लष्कराने केली आहे. या हल्ल्यात महिला व मुलांचा मृत्यू झाला, मात्र नेमका आकडा समोर आलेला नाही. खैबर पख्तूनख्वा प्रातांचे मुखअयमंत्री अली अमीन गुंडापूर म्हणाले, या कारवाईत स्थानीय नागरिकांचा मृत्यू होणे निंदनीय आहे.

### कोरटकरला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी



**कोल्हापूर** : इतिहासकार इंद्रजित सावंत यांना शिवीगाळ करताना छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणारा तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकर याला न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्याने जामिनासाठी केलेल्या अर्जावर १ एप्रिलला सुनावणी होणार असल्याने त्याचा कोठडीतील मुक्काम वाढला आहे. कोल्हापूर न्यायालयाने कोरटकरला पोलिस कोठडी सुनावली होती. या कोठडीची मुदत संपल्याने न्यायालयाने त्याला १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. यानंतर कोरटकरने वकिलामार्फत जामिनासाठी अर्ज सादर केला. या अर्जावर येत्या मंगळवारी सुनावणी होणार आहे. दरम्यान, कोरटकरचे वकील सौरभ घाग यांनी प्रशांत कोरटकरच्या सुरक्षेबाबत पोलिसांना सुचना देण्याची मागणी केली. कोरटकरवर दोनवेळा हल्ल्याचा प्रयत्न झाल्याचे वकिलाने कोर्टाला सांगितले. त्यावर न्यायालयाने सुरक्षेबाबत पोलिसांना सूचना दिल्या.

### येस बँकेला २,२०९ कोटींची आयकर नोटीस

**मुंबई** : येस बँकेला २०१९-२० या कर निर्धारण वर्षासाठी २,२०९ कोटी रुपयांची आयकर विभागाची डिमांड नोटीस मिळाली आहे. बँकेने एक्सेंज फायलिंगमध्ये ही माहिती दिली. येस बँकेचा असा विश्वास आहे की ही डिमांड नोटीस चुकीची आहे. येस बँकेने म्हटले आहे की, त्यांना २०१९-२० या कर निर्धारण वर्षासाठी आयकर कायदा १९६१ च्या कलम १४४ अंतर्गत ३० सप्टेंबर २०२१ रोजीचा आदेश मिळाला आहे. यामध्ये, बँकेला पूर्वी दाखल केलेल्या आयकर रिटर्नमध्ये दावा केलेल्या रकमेनुसार परतावा देण्यात आला. एप्रिल २०२३ मध्ये आयकर विभागाने संबंधित कर निर्धारण वर्ष पुन्हा उघडले.

### उद्योजक लक्ष्मी मित्तल दुसऱ्या देशात वास्तव्य करणार

**लंडन** : भारतात जन्मलेले आणि ३० वर्षांपासून ब्रिटनमध्ये वास्तव्याला असलेले दिग्गज स्टील उद्योजक लक्ष्मी मित्तल ब्रिटन सोडण्याच्या तयारीत आहेत. तेथील नॉन-डोमिसाइलची कररचना संपुष्टात आणल्याने त्यांनी हे पाऊल उचलले. जगातील दुसरी सर्वात मोठी स्टील कंपनी बनवणारे लक्ष्मी एप्रिल २०२५ मध्ये नवीन नियम लागू होण्याआधी यूके टॅक्स रेसिडेन्सी सोडू शकतात. दुबई, स्वित्झर्लंड किंवा इटलीत ते जाऊ शकतात.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ४१.१ | २६.५ |
| अमरावती | ४१.२ | २४.० |
| भंडारा | ३९.६ | २२.० |
| बुलडाणा | ३८.८ | २३.८ |
| चंद्रपूर | ४२.४ | -.- |
| गडचिरोली | ४१.४ | २०.० |
| गोंदिया | ३८.८ | २०.५ |
| नागपूर | ४१.२ | २०.४ |
| वर्धा | ४१.२ | २२.८ |
| वाशीम | ३९.८ | -.- |
| यवतमाळ | ४१.२ | २४.२ |

# सोलर एक्सप्लोझिव्ह टेस्ट रेंजचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

### अत्याधुनिक सुरक्षा यंत्रांची प्रत्यक्ष पाहणी

◆ **नागपूर, ३० मार्च**

अमरावती मार्गावरील बाजारगावस्थित सोलर एक्सप्लोझिव्ह टेस्ट रेंज आणि रनवे सुविधेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सोलर कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष नुवाल, राघव नुवाल, सोलर डिफेन्स अॅण्ड एरोस्पेस लिमिटेडचे कार्यकारी संचालक वासुदेव आर्या उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोटेरिंग म्युनिशन टेस्ट सुविधेचे तसेच भारतातील पहिल्या अनमॅन एरियल सिस्टीम १.२७ कि.मी.चे हॅंगर्स आणि रिपेअर लेनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी सोलर ग्रुपद्वारा निर्मित अत्याधुनिक सुरक्षा यंत्राचे अवलोकन केले. कार्यक्रमाला कंपनीचे उपमहाव्यवस्थापक श्याम मुंदडा व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी सोलर एक्सप्लोझिव्ह टेस्ट रेंजचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सोलर कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांच्यासह मनीष नुवाल, राघव नुवाल, वासुदेव आर्या उपस्थित होते

**अनेक उत्पादनांची प्रत्यक्ष पाहणी**

अमरावती मार्गावरील सोलर डिफेन्स अॅण्ड एरोस्पेस लिमिटेडच्या हेलिपॅडवर पंतप्रधानांचे स्वागत सोलर कंपनीचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष नुवाल यांनी केले.

सोलर कंपनीच्या एकूण १०८० एकर परिसरातील लॉईटर म्युनिशन टेस्ट रेंजच्या उद्घाटनानंतर कमांड अॅण्ड कंट्रोल सेंटर, टेक ऑफ एरिया, एन्ड्यूरन्स अॅण्ड कम्युनिकेशन रेंज चेक फॅसिलिटी, पॅराशूट रिकव्हरी एरिया, स्टॅटिक अॅण्ड मूव्हिंग टार्गेट एंगेजमेंट, टार्गेट हिट अॅण्ड सीईपी मेजरमेंट, लेथॅलिटी टेस्ट फॅसिलिटी आदींची पंतप्रधानांनी पाहणी केली.तसेच पंतप्रधानांनी उत्पादन गॅलरीला भेट देत येथील प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या पिनाका रॉकेट सिस्टीम, एअर-बॉम्ब, माईन्स, ग्रेनेड, मिलिटरी एक्सप्लोझिव्ह, नागास्त्र १ आणि २, लॉयटर दारूगोळा आणि इतर अनेक उत्पादनांची पाहणी केली.

**सोलरकडून स्वदेशी तंत्रज्ञानाला प्राधान्य**

याशिवाय परिसरात नव्याने बांधलेल्या एअर स्ट्रिपची पाहणी करीत नरेंद्र मोदी यांनी मानवरहित हवाई प्रणालीचा विकास आणि हवाई चाचणीसाठी नव्याने बांधलेल्या धावपट्टीचे निरीक्षण केले. अत्याधुनिक स्वदेशी तंत्रज्ञानाला सोलरने प्राधान्य दिले असल्याची माहिती नुवाल यांनी पंतप्रधानांना दिली. ◂(तभा वृत्तसेवा)

# छत्तीसगडमध्ये ५० नक्षल्यांनी पत्करली शरणागती

### १४ जणांवर एकूण ६८ लाखांचे बक्षीस

**बिजापूर, ३० मार्च**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यापूर्वी छत्तीसगडमधील बिजापूर येथे ५० नक्षलवाद्यांनी रविवारी शरणागती पत्करली. त्यापैकी १४ जणांच्या शिरावर एकूण ६८ लाख रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

राज्य पोलिस दल आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर त्यांनी शरणागती पत्करली. माओवाद्यांच्या अमानवी व पोकळ विचारसरणीचा आलेला कंटाळा, आदिवासी बांधवांचे वरिष्ठ कॅडरकडून होणारे शोषण तसेच नक्षलवाद्यांमध्येच निर्माण झालेल्या मतभेदांना कंटाळून आत्मसमर्पण करण्याचा निर्णय घेतला. केवळ इतकेच नव्हे, तर राज्य सरकारच्या निया नेल्लानार योजने मुळे प्रभावित झाल्याचे शरण आलेल्या नक्षलवाद्यांनी सांगितल्याची माहिती बिजापूरचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक जितेंद्रकुमार यादव यांनी सांगितले. शरण आलेल्या ५० जणांपैकी सहा जणांवर प्रत्येकी आठ लाख रुपयांचे, तीन जणांवर प्रत्येकी पाच लाख रुपये आणि पाच जणांवर एक लाख रुपयांचे बक्षीस होते. त्यांच्या शरणागतीत जिल्हा राखीव रक्षक (डीआरजी), बस्तर फायटर्स, विशेष कृती दल आणि सीआरपीएफच्या कोब्रा बटालियनने महत्त्वाची भूमिका बजावली, असे यादव यांनी सांगितले.

नक्षलवादी हिंसाचार सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी असलेल्या राज्याच्या पुनर्वसन धोरणाप्रमाणे त्यांचे पुनर्वसन केले जाईल, असे यादव यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यापूर्वी या नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध प्रकल्पांची पायाभरणी होईल, काम सुरू केले जाईल. दरम्यान, सुरक्षा दलांनी शनिवारी बस्तर विभागातील सुकमा आणि बिजापूर जिल्ह्यात ११ महिलांसब १८ नक्षलवाद्यांचा खात्मा केला.

# निम्म्या भारतीयांच्या नावावर ३.५ लाखांचीही संपत्ती नाही

### भारतीय अर्थतज्ज्ञाने जगाचीही झोप उडविली

◆ **नवी दिल्ली, ३० मार्च**

जग मंदीच्या छायेत असताना अमेरिकी राष्ट्राध्यक्ष जगावर टेरिफ वॉर लादून महागाईत आणखी तेल ओतण्याचे काम करीत आहेत. चेन्नईतील आर्थिक नियोजन तज्ज्ञ डी मुथुकृष्णन यांनी भारतासमोर काय संकट वाढून ठेवले याबाबत सावध केले आहे. निम्म्या भारतीयांकडे साडे तीन लाखांपेक्षाही कमी संपत्ती आहे, तर जगातील ९० टक्के लोकांचे एका पगाराचे जरी नुकसान झाले तरी ते त्या संकटाला तोंड देऊ शकत नाहीत, असा दावा केला आहे.

एआय, ऑटोमेशन आणि नोकऱ्यांच्या संकटात आर्थिक असमानता वाढत जाणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. हे संकट एवढे भीषण आहे की अगदी अतिश्रीमंत देशांमध्येही अब्जावधी लोक असुरक्षित बनणार आहेत.

सर्वात श्रीमंत देश असलेल्या स्वित्झर्लंडमध्येही हा फेरा चुकलेला नाही. तिथेही १ टक्के लोकांकडे देशाच्या ४३ टक्के संपत्ती आहे. असे असले तरी स्वित्झर्लंडच्या प्रत्येक व्यक्तीकडे सरासरी ६ कोटी रुपयांची संपत्ती आहे. भारतात हा आकडा साडेतीन लाखही नाही. जगाची सरासरी संपत्ती ८,६५४ आहे. जगातील अर्ध्या लोकांकडे ७.५ लाखांपेक्षा कमी संपत्ती आहे. भारताची सरासरी संपत्ती अंदाजे ४,००० आहे. अर्ध्या लोकांकडे ३.५ लाखांपेक्षा कमी संपत्ती आहे, असे मुथुकृष्णन यांनी म्हटले आहे.

यूबीएस ग्लोबल वेल्थ रिपोर्ट २०२४ चा संदर्भ त्यांनी दिला आहे. अमेरिका आणि स्वित्झर्लंड सारख्या देशांमध्ये सरासरी संपत्ती जास्त आहे, परंतु त्यांच्या सरासरी संख्येत मोठी तफावत दिसून येते. उदाहरणार्थ, अमेरिका सरासरी संपत्तीमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे परंतु सरासरी संपत्तीमध्ये १४ व्या क्रमांकावर घसरला आहे, असे ते म्हणाले आहेत.

**जगात सर्वत्र आर्थिक असमानता**

जगातील १ टक्के लोकांकडे ८.६ कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्ती आहे.उर्वरित ९९ टक्के लोकांकडे यापेक्षा कमी संपत्ती आहे. जर श्रीमंत देशांचे हे नशीब असेल, तर भारताबद्दल जितके चांगले बोलले जाईल तितके कमीच आहे. जगातील पहिल्या १०% लोकसंख्येचा अपवाद वगळता, ९०% लोक एक पगार गमावूनही जगू शकत नाहीत, अशी परिस्थिती मुथुकृष्णन यांनी मांडली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मणिपूर, नागालॅण्ड, अरुणाचलमध्ये आफ्स्पाची मुदत सहा महिन्यांनी वाढवली

### केंद्र सरकारने जारी केली अधिसूचना

◆ **नवी दिल्ली, ३० मार्च**

सद्यःपरिस्थिती पाहता केंद्र सरकारने मणिपूर, नागालॅण्ड आणि अरुणाचल प्रदेशात आफ्स्पा कायद्याची मुदत सहा महिन्यांना वाढवली असून, अधिसूचना जारी करण्यात आली.

मणिपुरातील कायदा आणि सुव्यवस्थेचे विश्लेषण केल्यानंतर सशस्त्र दल (विशेष अधिकार) कायदा-१९५८ मधील कलम ३ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करीत पाच जिल्ह्यांमधील १३ पोलिस ठाण्यांची हद्द वगळता उर्वरित मणिपूर १ एप्रिलपासून सहा महिन्यांपर्यंत ही घोषणा मागे न घेतल्यास अशांत क्षेत्र घोषित करण्यात आले, असे जारी केलेल्या अधिसूचनेत केंद्र सरकारने म्हटले आहे.

नागालॅण्डमधील कायदा व सुव्यवस्थेचेही विश्लेषण करण्यात आले आणि येथील आफ्स्पाची मुदत सहा महिन्यांसाठी वाढवण्यात आली. नागालॅण्डमधील दिमापूर, निऊलॅण्ड, चुमोकेदिमा, मोन, किफिर, नोकलाक, फेक आणि पेरेनमध्ये आफ्स्पाची मुदत वाढवण्यात आली. कोहिमा जिल्ह्यातील खुजामा, उत्तर कोहिमा, दक्षिण कोहिमा, जुबजा आणि केजोचा पोलिस ठाणे हद्दींमध्ये ही मुदत वाढवण्यात आले. मोकोकचुंग जिल्ह्यातील मंगकोलेम्बा, मोकोकचुंग-१, लोंगथो, तुली, लोंगचेम आणि अनाकी 'सी' पोलिस ठाण्यांतील परिसरही अशांत घोषित करण्यात आला. यांगलोक पोलिस ठाणे क्षेत्र, वोखा जिल्ह्यातील भंडारी, चांमपांग आणि रालान पोलिस ठाणे परिसर, जुनहेबोटे जिल्ह्यातील घटासी, पुघोबोटो, सताखा, सुरुहुतो, जनहेबोटो आणि अघुनाटो हद्दीत आफ्स्पाची मुदत वाढवण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

### मणिपूरमध्ये ३ बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : मणिपूरच्या वेगवेगळ्या भागातून वेगवेगळ्या कारवाईत तीन बंडखोरांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी रविवारी सांगितले.

इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील खुर्कुल येथून शनिवारी बंदी घातलेल्या प्रेपाक (प्रो) संघटनेच्या एका सदस्याला अटक करण्यात आली. त्याची ओळख निंगथौजम बोबॉय सिंग उर्फ खोंगनांगथाबा (३७) अशी झाली, असे त्यांनी सांगितले.इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील सावोम्बुंग येथील त्याच्या घरातून बंदी घातलेल्या केसीपी (पीडब्ल्यूजी) संघटनेच्या एका सदस्याला अटक करण्यात आली. त्याचे नाव सनासम सोनमित सिंग (२७) असे आहे. काकचिंग व इम्फाळ पश्चिम जिल्ह्यांमध्ये खंडणीच्या गुन्ह्यांमध्ये हवा असलेला केसीपी (सिटी मेइतेई) या संघटनेच्या एका बंडखोरालाही अटक करण्यात आली. त्याचे नाव शारुंगबम थोइबा सिंग (४३) असे आहे, असे पोलिसांनी सांगितले. दुसऱ्या एका कारवाईत, ३२ वर्षीय व्यक्तीला बंडखोरांना सिमकार्ड विकल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. शनिवारी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील खुरखुल येथील मांडोप यम्फम रिलीफ कॅम्पमधून वाहेंगबाम अजित मीतेईला अटक करण्यात आली. सिमकार्डचा वापर खंडणीसह विविध बेकायदेशीर कामांसाठी केला जात असल्याचा संशय आहे. त्याच्याकडून एकूण ११७ सिमकार्ड जप्त करण्यात आले आहेत, असे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, शुक्रवारी कांगपोक्पी आणि चुराचंदपूर जिल्ह्यात वेगवेगळ्या कारवाईत आठ बंदुका आणि मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त केला.

# पवनीच्या पौराणिक मुरलीधर मंदिराला आग

◆ **पवनी, ३० मार्च**

पौराणिक मुरलीधर मंदिराला रविवार, ३० मार्चला दुपारी आग लागली. विद्युत प्रवाह खंडित असताना आग नेमकी लागली कशाने हा संशोधनाचा विषय आहे. अग्निशमन दलाच्या पथकाने अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळविले.

विठ्ठल गुजरी वॉर्डात पौराणिक असे मुरलीधर मंदिर आहे. गोपाळ कृष्णाच्या या मंदिराची वास्तू अत्यंत पुरातन आहे.

रविवारी दुपारी अडीच ते तीन वाजताच्या सुमारास मंदिराच्या सभागृहावरील खोलीला अचानक आग लागली. आगीच्या ज्वाळा दिसताच परिसरातील लोकांनी अग्निशमन विभागाला कळविले. अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अर्ध्या तासात आगीवर नियंत्रण मिळविले. आग लागलेल्या खोलीतील विद्युत प्रवाह देखील अनेक दिवसांपासून खंडित आहे. त्यामुळे शॉर्टसर्किटने आग लागली नाही, हे स्पष्ट आहे.

अशावेळी सभागृहावर टाकून असलेल्या ताडपत्रीने उन्हामुळे पेट घेतल्याने आग लागली असावी, असा अंदाज नागरिक व्यक्त करीत आहेत. मंदिरातील इतर भाग सुरक्षित आहे. मंदिर दिवसभर बंद राहत असल्याने भाविकांची देखील मंदिरात घटनेच्या वेळी वर्दळ नव्हती. ◂(तभा वृत्तसेवा)



आगीत जळालेली मंदिरावरची खोली

# अंडी विक्रेत्याला आयकर विभागाची नोटीस

### ५० कोटींच्या कंपनीची मालकी असल्याचे उघड

◆ **दमोह, ३० मार्च**

मध्यप्रदेशातील दमोह येथे हैराण करणारा प्रकार समोर आला आहे. याठिकाणी एका अंडी विक्रेत्याच्या नावावर दिल्लीत कोट्यवधीची बनावट कंपनी असल्याचे आढळले आहे. या कंपनीचा टर्नओव्हर ५० कोटींहून अधिक असून त्यावर ६ कोटी जीएसटीची थकबाकी आहे. आयकर विभागाने याबाबत अंडी विक्रेत्याला नोटीस पाठवून बँक स्टेटमेंट आणि इतर कागदपत्राची मागणी केली आहे ज्यामुळे त्याच्या कुटुंबालाही मोठा धक्का बसला आहे.

माहितीनुसार, पथरिया नगर येथे राहणाऱ्या प्रिंस सुमन हे अंडी विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र त्यांच्या नावावर दिल्लीत प्रिंस इन्टरप्रायजेस नावाने कंपनी रजिस्टर आहे. ज्यात २०२२ ते २०२४ या काळात ५० कोटींचा व्यवसाय केला. ही कंपनी चामडे, लाकडे, लोखंड यांचा व्यवसाय करते परंतु कंपनीने जीएसटी भरला नाही म्हणून आयकर विभागाने आता प्रिंस सुमन यांना ६ कोटी रूपये थकबाकी भरण्यासाठी नोटीस पाठवली आहे. मात्र प्रिंस कधीही दिल्लीत गेला नाही, केवळ इंदूर येथे मजुरीचं काम करायला गेला होता. त्याने कुणालाही पॅन कार्ड अथवा आधार कार्ड दिले नाही तरीही दिल्लीत त्याच्या नावावर बनावट कंपनी बनवण्यात आली.

आयकर विभागाने जेव्हा या कुटुंबाला नोटीस पाठवली तेव्हा ही बाब उघडकीस आली. प्रिंस सुमन यांचे वडील श्रीधर सुमन एक छोटे किराणा मालाचे दुकान चालवतात. या कुटुंबाने आता सदर प्रकरणी पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, हा प्रकार समोर येताच कुटुंबाची बाजू मांडणारे वकील अभिलाष खरे यांनी आयकर विभागाला पत्र लिहून माहिती दिली. त्याशिवाय पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवत बनावट कंपनीमागील खरे गुन्हेगार शोधण्याची मागणी केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### स्विफ्ट डिझायरमध्ये आढळला पोलिसाचा मृतदेह

देऊळगाव राजा, ३० मार्च

बुलढाणा जिल्ह्यात पुन्हा एकदा पोलिसाच्या संशयास्पद मृत्यूची घटना उघडकीस आली आहे.

जालना पोलिस दलातील ज्ञानेश्वर पांडुरंग म्हस्के यांचा मृतदेह त्यांच्या स्विफ्ट डिझायर कारमध्ये आढळून आला. ही घटना रविवार ३० मार्च रोजी देऊळगाव राजा-सिंदखेडराजा मार्गावरील आर. जे. इंटरनॅशनल स्कूलसमोरील वनविभागाच्या जागेत उघडकीस आली. प्राथमिक तपासात गळा आवळून हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, गाडी आतून बंद होती. त्यामुळे हा घातपात की आत्महत्या, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे. स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली असून, अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही. याच महिन्यात २३ मार्चला अंढेरा पोलिस स्टेशन हद्दीत भागवत गिरी या पोलिसाचा खून झाल्याची घटना घडली होती. आता पुन्हा एका पोलिसाचा मृतदेह आढळल्याने पोलिस प्रशासन हादरले आहे. उपविभागीय अधिकारी मनीषा कदम आणि पोलिस निरीक्षक संतोष महल्ले यांनी घटनास्थळी पाहणी केली असून, पुढील तपास सुरू आहे.

## संसदभवनात मान्यवरांनी घेतला थालिपीठाचा आस्वाद

**नवीन** संसद भवनातील उपहारगृहात उत्तर भारतीय तसेच दक्षिण भारतीय पदार्थ मिळतात. मात्र महाराष्ट्रीय पदार्थ म्हणून ओळखले जाणारे थालिपीठ मिळत नाही. मागील बुधवारी अनेक संसद सदस्यांना थालिपीठाचा आस्वाद घेता आला, तो केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या दालनात. प्रश्नोत्तराच्या तासामुळे गडकरी दर आठवड्यात बुधवारी राज्यसभेत तर गुरुवारी लोकसभेत उपस्थित असतात. त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासानंतर गडकरी मंत्र्यांना आणि सर्वपक्षीय खासदारांना आपल्या दालनात भेटत असतात. गडकरींना भेटायला येणारे आपल्या मतदारसंघातील काम घेऊन येतात आणि जाताना काम झाल्याच्या समाधानात भरल्या पोटाने जातात. गडकरींच्या कार्यालयात येणारा कोणीही काही खाल्ल्याशिवाय जाऊ शकत नाही. गडकरी आपल्या घरुन येतांना काहीतरी खायचे घेऊन येतात, कधी ते पोहे आणतात, कधी बटाटेवडा, कधी वडापाव तर कधी थालिपीठ. गडकरींना खाण्याची तसेच खाऊ घालण्याची आवड आहे. त्यामुळे गडकरींच्या दालनात येणारा तृप्त होऊन जात असतो.

मागील बुधवारी गडकरी संसद भवनातील आपल्या दालनात थालिपीठ घेऊन आले होते. दालनात भेटायला येणाऱ्या सर्व मान्यवरांना गडकरी थालिपीठ खाण्याचा आग्रह करत होते. येणारा थालिपीठ, चटणी आणि मिरचीचे लोणचे खाऊन जात होता. त्यादिवशी गडकरींना भेटायला माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडाही आले होते. गडकरींचे दालन भेटायला येणाऱ्यांनी भरून गेले होते. गडकरींच्या दालनात भेटायला येणाऱ्यांची जेवढे गर्दी असते, वा त्यांचे जेवढे आदरातिथ्य केले जाते, तेवढे खचितच अन्य मंत्र्यांच्या दालनात होत असावे.

## हलवापाठोपाठ आता खीरसमारंभ

**संसद** भवनात अर्थसंकल्प छपाईला पाठवतांना दरवर्षी हलवा महोत्सव होत असतो. इंग्रजीत त्याला हलवा सेरेमनी म्हटले जाते. अर्थमंत्री निर्मला सीतारामन स्वत: हलवा तयार करतात आणि अर्थराज्यमंत्री तसेच अर्थमंत्रालयाचे सचिव आणि अधिकारी या हलव्याचा




आस्वाद घेतात. मागील अनेक वर्षापासून ही परंपरा सुरु आहे. मात्र या परंपरेला मागील वर्षी काँग्रेसचे राहुल गांधी यांनी गालबोट लावले. अर्थसंकल्प तयार करण्याच्या प्रक्रियेत तसेच हलवा सेरेमनीत किती ओबीसी अधिकारी असतात, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. राज्यातही दरवर्षी अर्थसंकल्प तयार होतो. पण कोणत्याच राज्यात हलवा वा त्याच्यासारखा समारंभ होत नाही. दिल्लीत बऱ्याच वर्षांनी भाजपाचे सरकार आले. रेखा गुप्ता यांच्या नेतृत्वात भाजपचे सरकार राज्यात सत्तारुढ झाले. त्यामुळे रेखा गुप्ता यांच्या नेतृत्वातील सरकारने यावेळी आपला पहिला अर्थसंकल्प सादर केला. भाजपाच्या दृष्टीने ही अभिमानाची तसेच आनंदाची बाब होती. त्यामुळे अर्थसंकल्प सादर करतांना रेखा गुप्ता यांनी खिर समारंभ आयोजित केला, अर्थसंकल्प तयार करणारे अधिकारी, भाजपाचे मंत्री तसेच आमदारांना खिर खाऊ घातली. असे करत रेखा गुप्ता यांनी यावर्षी नवीन पायंडा पाडला. आता भाजपशासित अन्य राज्यातही असा प्रयोग झाला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

●● ●●

## स्थगन प्रस्तावाच्या सूचनेचा घोळ

**लोकसभा** असो की राज्यसभा संसदेच्या अधिवेशन काळात विरोधी पक्षाचे सदस्य दररोज कोणत्या न कोणत्या मुद्यांवर स्थगनप्रस्तावाची सूचना देत असतात. सभागृहाचे नियमित कामकाज स्थगित करून संबंधित विषयांवर चर्चेची मागणी यातून केली जाते. काही वेळा तर एकापेक्षा जास्त विषयावर सदस्य वेगवेगळ्या स्थगनप्रस्तावाच्या सूचना देत असतात. मात्र दोन्ही सभागृहाचे अध्यक्ष वा सभापती स्थगनप्रस्तावाच्या सूचना नियमात बसत नाही, या कारणावरुन फेटाळून लावत असतात. संसदेच्या कामकाजाचा हा आता नियमित भाग झाला आहे. काही दिवसांपूर्वी राज्यसभेचे सभापती जगदीप धनकड यांना स्थगन प्रस्तावाच्या एका सूचनेने धक्का बसला. तृणमूल काँग्रेसच्या सागरिका घोष यांनी स्थगनप्रस्तावाची ही सूचना दिली होती. २० मार्चला सभागृहाचे कामकाज स्थगित करावी, अशी सूचना घोष यांनी दिली होती मात्र ही सूचना सभापती धनकड यांना २६ मार्चला दुपारी १ वाजून ३६ मिनिटांनी प्राप्त झाली. त्यामुळे यावर कोणता निर्णय घ्यावा, असा प्रश्न धनकड यांना पडला. या पेचप्रसंगात आर्टिफिशियल इंटेलिजन्सही मला मदत करू शकणार नाही, असे त्यांना म्हणावे लागले.

सामान्यपणे स्थगनप्रस्तावाची सूचना सभागृहाचे कामकाज सुरु होण्याच्या आधी द्यावी लागते. सागरिका घोष यांना सभागृहाच्या कामकाजाचे नियम माहिती नाही का, असा प्रश्न यातून उपस्थित झाला. २० मार्चचे कामकाज स्थगित करण्याची सूचना त्यांनी २६ मार्चला कशी दिली, यात नेमका घोळ कोणत्या बाजूने झाला, याची उत्तरे आतापर्यंत मिळाली नाही.

●● ●●

## काँग्रेस मुख्यालयात झाली इफ्तार पार्टी

**राजधानीत** सध्या इफ्तार पार्ट्या सुरु आहेत. सामान्यपणे इंडिया आघाडीतील पक्ष इफ्तार पार्टीचे आयोजन करतात. काही दिवसांपूर्वी काँग्रेसच्या नवीन मुख्यालयात बिहारमधील काँग्रेस नेत्यांच्या एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही बैठक तशी तासभर उशिरा सुरु झाली, पण वेळेच्या आधी म्हणजे ६.३० वाजता संपवण्यात आली. कारण या बैठकीत ५ मुस्लिम नेते सहभागी झाले होते, ज्यांनी रोजे धरले होते. त्यांना रमजानचा उपवास सोडायचा होता, त्यामुळे काँग्रेस मुख्यालयात तशी व्यवस्था करण्यात आली आहे. बैठकीला उपस्थित नेत्यांसाठी समोसा आणि कचोरीसोबत अन्य खाद्य पदार्थांची व्यवस्था करण्यात आली होती.

काँग्रेसच्या अल्पसंख्याक आघाडीचे प्रमुख इम्रान प्रतापगडी यांनी आपल्या निवासस्थानी इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. या पार्टीला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव, तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा तसेच शिवसेनेच्या प्रियांका चतुर्वेदी यांच्यासह इंडिया आघाडीतील विविध राजकीय पक्षांचे नेते उपस्थित होते.

● **दिल्लीवाला**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# म्यानमार तिसऱ्या दिवशीही भूकंपाने हादरले

| | |
|---|---|
| तीव्रता | ५.१ रिश्टर स्केल |
| मृत | १७०० |
| जखमी | ३५०० |
| बेपत्ता | ३,४०० पेक्षा अधिक |




बँकॉकमधील बहुमजली निर्माणाधीन इमारत भूकंपाने कोसळली. मलबा हटविण्याचे काम अजूनही सुरूच आहे. इमारतीच्या मलब्याखाली दबल्याने पतीचा मृत्यू झाल्याचे कळताच महिला शोकसागरात बुडाली

◆ बँकॉक ३० मार्च

म्यानमारमध्ये सलग तिसऱ्या दिवशी रविवारी सकाळी ७.१५ वाजताच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टल स्केलवर भूकंपाची तीव्रता ५.१ रिश्टल स्केल इतकी नोंदविण्यात आल्याची माहिती अमेरिकेच्या भूगर्भशास्त्र विभागाने दिली आहे. शुक्रवारपासून ते रविवार या तीन दिवसात म्यानमार सलग १७ वेळा भूकंपाने हादरला असून नागरिकांमध्ये प्रचंड दहशत आहे. शुक्रवारी झालेल्या ७.७ तीव्रतेच्या भूकंपात जमीनदोस्त झालेल्या इमारतींच्या ढिगाऱ्यातून आतापर्यंत १७०० नागरिकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले, तर ३५०० नागरिक जखमी आहे.

म्यानमारच्या आपत्ती व्यवस्थापन व प्राधिकरण विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भूकंपामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. देशभरात फोन, वीज आणि इंटरनेट बंद आहेत. रविवारी म्यानमारमधील दुसरे सर्वात मोठे शहर मंडाले येथे ५.१ तीव्रतेचा भूकंप झाला. म्यानमारमध्ये भूकंपामुळे मोठी हानी झाली आहे. अनेक इमारती कोसळल्या आणि इतर पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. नैसर्गिक आपत्तीमुळे राष्ट्रपती भवनाचेही मोठे नुकसान झाले आहे. आतापर्यंत १,७०० लोकांचा मृत्यू झाला असून ३५०० लोक जखमी आहे, तर ३,४०० पेक्षा अधिक लोक बेपत्ता आहेत. हा आकडा वाढण्याची भीती आहे. अनेक ठिकाणी रस्ते उखडले , पुलांना तडे गेल्याने वाहतूक ठप्प आहे. पर्यायाने मदतीसाठी बाधा पोहोचली आहे. मदत कार्य सुरू असून इमारतीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी आपत्ती व्यवस्थापनाचे पथक अहोरात्र कार्यरत आहे. दरम्यान म्यानमार दीर्घकाळ चाललेल्या गृहयुद्धाच्या संकटात आहे, अशा परिस्थितीत तेथे मदत आणि बचाव कार्य अत्यंत कठीण होत आहे. (वृत्तसंस्था)

### थायलंडमधील रुग्णालयात जागाच नाही

म्यानमारच्या शेजारी देश थायलंडमध्येही भूकंपाने मोठी हानी झाली आहे. राजधानी बँकॉकसह देशातील इतर भागात नुकसान झाले आहे, तेथील रुग्णालयांमध्ये जागा कमी असून रुग्णांवर तात्पुरत्या स्वरूपात रस्त्यावर उपचार सुरू असल्याची परिस्थिती आहे. उपचार साहित्य आणि औषधांचाही मोठा तुटवडा आहे. बँकॉकच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, थायलंडमध्ये झालेल्या भूकंपामुळे आतापर्यंत २५ लोकांचा मृत्यू झाला आहे, २५० लोक जखमी आणि ५०० पेक्षा अधिक बेपत्ता आहेत.

### भारताचे वैद्यकीय पथक म्यानमारमध्ये पोहोचले

भूकंपग्रस्त देशांच्या मदतीसाठी भारताने ऑपरेशन ब्रम्हा सुरू केले, त्या अंतर्गत भारतीय हवाई दलाची दोन विमाने आणि नौदलाची जहाजे तैनात करण्यात आली. रविवारी पहाटे हवाई दलाच्या विमानाने ४० टन जीवनावश्यक साहित्य आणि ११८ जणांचे वैद्यकीय पथक म्यानमारला पोहोचले. त्यांनी जखमींवर उपचार सुरू केले आहे. भारतीय लष्कर ६० खाटांचे वैद्यकीय उपचार केंद्र उभारणार आहे. यामध्ये आपत्कालीन शस्त्रक्रियेच्या सुविधा उपलब्ध असतील. भारताने शनिवारीदेखील म्यानमारच्या यंगून शहरात १५ टन मदत सामग्री पाठवली होती.

# माजी राजा ज्ञानेंद्र शाह यांच्याकडून वसूल करणार नुकसान भरपाई

## नेपाळ सरकारची हिंसाचारावर कारवाई, ७.९३ लाखांचा दंड ठोठावला

◆ काठमांडू, ३० मार्च

नेपाळमध्ये शुक्रवारी राजेशाहीच्या समर्थनार्थ झालेल्या हिंसाचारानंतर आंदोलकांची धरपकड सुरूच असताना ओली सरकारने माजी राजा ज्ञानेंद्र शाह यांच्याकडून नुकसान भरपाई वसूल करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय शाह यांच्या सुरक्षेसाठी असलेल्या कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली असून, त्याचवेळी त्यांची सुरक्षाही कमी करण्यात आली आहे. यापूर्वी ज्ञानेंद्र शाह यांना २५ सुरक्षा कर्मचाऱ्यांनी सुरक्षा पुरवली जात होती, आता ती १६ करण्यात आली आहे.



काठमांडू महापालिकेने माजी राजा ज्ञानेंद्र शाह यांना ७.९३ लाख रुपयांचा दंड ठोठावला असून, जे काही नुकसान झाले आहे त्याची भरपाई करण्याचे आदेश दिले आहेत. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, हिंसाचारापूर्वी तीनकुणे मैदानावर राजेशाहीसंदर्भात जाहीर सभा सुरू होती. त्यानंतर सभेत सहभागी लोक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी तोडफोड आणि जाळपोळ करण्यास सुरुवात केली. तपासात माजी राजा ज्ञानेंद्र यांनी १९ फेब्रुवारी रोजी लोकशाही दिनानिमित्त जनतेला पाठिंबा देण्याचे आवाहन केल्यानंतर. नेपाळमध्ये राजेशाही आणि हिंदू राष्ट्र पुनर्स्थापित करण्याच्या मागणीसाठी सुरक्षा दल आणि समर्थकांमध्ये संघर्ष झाला. शाह यांच्या आवाहनामुळेच आंदोलक भडकल्याचे समोर आले आहे. हिंसक संघर्षात अनेक घरे, इमारती, सरकारी कार्यालये आणि सरकारी वाहनांचे नुकसान झाले. सरकारने भरपाईची रक्कम शाह यांच्याकडून वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे. (वृत्तसंस्था)

### राजेशाहीच्या मागणीसाठी आंदोलन

नेपाळमध्ये २००६ पूर्वी राजेशाही होती. विरोधानंतर राजा ज्ञानेंद्र यांना सत्ता सोडावी लागली. यानंतर सर्व अधिकार संसदेकडे सुपूर्द करण्यात आले आणि २००८ मध्ये नेपाळमधील २४० वर्षांची राजेशाही संपुष्टात आली. आता पुन्हा एकदा राजेशाही आणण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### दोषींवर कठोर कारवाई करा : पुष्पकमल दहल प्रचंड



माजी पंतप्रधान पुष्पकमल दहल प्रचंड म्हणाले, या सगळ्यामागे ज्ञानेंद्र शाह यांचा हात असल्याचे आता पूर्णपणे स्पष्ट झाले आहे. ज्ञानेंद्र शाह यांचा हेतू योग्य नाही. आता सरकारने कठोर पावले उचलण्याची वेळ आली आहे. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. ज्ञानेंद्र शाह यांना आता पूर्ण स्वातंत्र्य देता येणार नाही. याशिवाय अनेक राजकीय नेत्यांनी माजी राजा ज्ञानेंद्र शाह यांच्यावर हिंसाचाराचे गंभीर आरोप केले. नेपाळच्या गृहमंत्रालयाने माजी राजावर पाळतही वाढवली आहे. नेपाळी काँग्रेसनेही माजी राजाला हिंसाचारासाठी जबाबदार धरले आहे.

## राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्या ताफ्यातील कारमध्ये स्फोट

**मॉस्को** : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या ताफ्यातील लिमोझिन कारचा मॉस्कोमधील एफएसबी गुप्तचर विभागाच्या मुख्यालयाजवळ अचानक स्फोट झाला. या घटनेत जीवितहानी झालेली नाही. आग आधी कारच्या इंजिनमध्ये लागली आणि नंतर ती आतील भागात पसरली. कार पूर्णपणे जळून खाक झाली. घटनेच्या वेळी कार कोण चालवत होते, हे समोर आलेले नाही. कारमधील स्फोटाचा व्हिडीओ समाज माध्यमांवर प्रसारित झाला आहे. कारला आग कशामुळे लागली याचा तपास सुरू आहे. कार स्फोटाच्या घटनेला गांभीर्याने घेण्यात आले असून तपास सुरू करण्यात आला आहे.

## एसयूव्ही पुलावरून कोसळली, दोघांचा मृत्यू

◆ गौरेला, ३० मार्च

छत्तीसगडमधील बिलासपूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमासाठी लोकांना घेऊन जाणारी एसयूव्ही रविवारी गौरेला-पेंड्र-मारवाही जिल्ह्यात पुलावरून नदीत कोसळल्याने २ जणांचा मृत्यू आणि ७ जण जखमी झाले आहेत, असे पोलिसांनी सांगितले.

पेंड्रा पोलिस स्टेशन हद्दीतील कोटमी गावाजवळ सकाळी ९ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. एसयूव्हीमध्ये आठ जण होते, तर ती एसयूव्ही मानेंद्रगड-चिरमिरी-भरतपूर (एमसीबी) जिल्ह्यातील बिलासपूरला जात होती, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. सोन नदीवरील पुलावर पोहोचताच एसयूव्ही चालकाचे चाकावरील नियंत्रण सुटले व नंतर ती नदीत कोसळली. या अपघातात महिला पादचाऱ्याचा आणि चालकाचा जागीच मृत्यू झाला. (वृत्तसंस्था)

# हमासने युद्धविराम प्रस्ताव स्वीकारला

### इस्रायलने नवा प्रस्ताव मांडल्याने संघर्ष कायम

◆ तेल अवीव, ३० मार्च

हमासने इस्रायलसोबत गाझा पट्टीमध्ये युद्धविराम प्रस्ताव मंजूर केला आहे. इजिप्त आणि कतार या मध्यस्थांनी मांडलेला युद्धविराम प्रस्ताव स्वीकारल्याचे हमासने शनिवारी सांगितले, परंतु इस्रायलने अमेरिकेच्या सहकार्याने नवा प्रस्ताव मांडल्याने संघर्ष कायम राहण्याची शक्यता आहे. नव्या प्रस्तावात हमासकडून सोडण्यात येणाऱ्या ओलिसांच्या संख्येत बदल केला आहे.

इजिप्तच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, युद्धबंदीच्या करारानुसार हमास अमेरिकन नागरिकांसह पाच जिवंत ओलिसांची सुटका करणार आहे. त्याबदल्यास इस्त्रायल गाझा पट्टीत मानवीय सहाय्यता, जीवनावश्यक वस्तूंचा




पुरवठा करण्यास परवानगी देईल आणि एका आठवड्याची युद्धबंदी लागू करेल. याशिवाय इस्रायल शेकडो पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका करणार आहे. गाझामधील हमासचा नेता खलील अल-हय्या याने प्रस्ताव स्वीकारला. मात्र इस्त्रायलने अमेरिकेच्या सहकार्याने युद्धबंदीचा नवा प्रस्ताव तयार केला असून तो लवकरच हमासकडे पाठविण्यात येणार आहे. या प्रस्तावात हमास ५९ ओलिसांची सुटका करेपर्यंत युद्ध सुरू राहणार असल्याचा उल्लेख असल्याचे इस्त्रायलच्या एका लष्करी अधिकाऱ्याने सांगितले. दरम्यान हमासच्या नेत्यांनी गाझा सोडावे, सर्व ओलिसांची एकाच टप्प्यात सुटका करावी या मागणीवर इस्त्रायल कायम आहे, तर दुसरीकडे गाझामधून आपले सैन्य मागे घेतले आणि पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका केली तरच ते ओलिसांना मुक्त करेल असे हमासचे म्हणणे आहे. (वृत्तसंस्था)

### `गाझातील नागरिक संकटात

इस्रायल-हमास युद्धविराम संपल्यानंतर पुन्हा युद्ध सुरू झाले. इस्रायली हल्ल्यात शेकडो पॅलेस्टिनी मारले गेले आणि इस्रायलने चार आठवड्यांपासून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा थांबवल्याने गाझातील नागरिक संकटात आहे. ७ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू असलेल्या युद्धात ५० हजार नागरिकांचा मृत्यू झाला आहे.

# बंगळुरूमध्ये सुरू झाली ड्रोन डिलिव्हरी

### केवळ सात मिनिटांत पार्सल घरपोच

◆ बंगळुरू, ३० मार्च

भारताचे आयटी हब असलेल्या बंगळुरू शहरात आता ड्रोनद्वारे डिलिव्हरी सेवा देण्यात येत आहे. हायपरलोकल ड्रोन डिलिव्हरी नेटवर्क असलेल्या स्काय एअर या कंपनीने केवळ सात मिनिटांत ड्रोनद्वारे डिलिव्हरी देण्याची ही सेवा बंगळुरूमध्ये सुरू केली आहे.

या सेवेमुळे गुरुग्रामनंतर भारतातील ड्रोन लॉजिस्टिक्सचा स्वीकार करणारे बंगळुरू हे देशातील दुसरे शहर ठरले आहे. ही नवीन सेवा ई-कॉमर्स आणि क्विक-कॉमर्स क्षेत्रात मोठा बदल घडवून आणेल, असा दावा कंपनीने केला आहे.

बंगळूरूमधील कोनानकुंटे आणि कणकपुरा रोड परिसरातील रहिवाशांना केवळ ७ मिनिटांत ड्रोनद्वारे डिलिव्हरी मिळणार आहे. शहरी लॉजिस्टिक्समध्ये होत असलेल्या तांत्रिक प्रगतीचे हे उत्तम उदाहरण मानले जात आहे.

**१० किलो वजन वाहून नेण्याची क्षमता**

कंपनीच्या मते, ही देशव्यापी बदलाची सुरुवात आहे. आगामी काळातड्रोन डिलिव्हरी एक सामान्य गोष्ट होईल. ही सेवा स्काय शिप वन या फ्लॅगशिप डिलिव्हरी ड्रोनच्या सहकार्याने सुरू आहे. हे ड्रोन १० किलोपर्यंत वजन वाहून नेऊ शकते. आणि ते १२० मीटर उंचीवरील अदृश्य ''स्काय टनेल'' मार्गाचा वापर करेल. अर्थातच ट्रॅफिक टाळल्याने डिलिव्हरीचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होतो. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### रग्गड पगार घेतात ऐश्वर्याचे अंगरक्षक



**मुंबई** : नुकताच ऐश्वर्या रॉयच्या कारला बेस्ट बसने मागून धडक दिल्याचा प्रकार घडला होता. यात कोणीही जखमी झाले नाही. ऐश्वर्याच्या गाडीचेही किरकोळ नुकसान झाले. या घटनेनंतर ऐश्वर्याच्या अंगरक्षकांनी बेस्टच्या चालकाच्या थोबाडीत मारली होती. बसचालकाने लगेचच पोलिस तक्रार केली आणि नंतर अमिताभ यांच्या बंगल्याचे काम पाहणाऱ्या सुपरव्हायजरने त्या बस चालकाची माफी मागितली. या सर्व प्रकारात ऐश्वर्याचे अंगरक्षक प्रकाशात आले. ऐश्वर्याकडे दोन अंगरक्षक आहेत. एकाचे नाव शिवराज असून दुसऱ्याचे राजेंद्र ढोले आहे. ऐश्वर्या जसे चित्रपटात तगडे मानधन घेते तितकाच मोठा पगार ती आपल्या अंगरक्षकांना देते. शिवराजला महिन्याला सात लाख रुपये पगार असून राजेंद्रचा वर्षाचा पगार एक कोटीच्या घरात आहे. हे अंगरक्षक तिच्यासोबत चित्रपटांच्या सेटवर, सहलीदरम्यान सगळीकडे हजर असतात.

### 'हिरामंडी'नंतरही अदितीकडे कामाची वानवा

**मुंबई** : संजय लीला भन्साळीच्या चित्रपटात चांगली भूमिका करूनही अभिनेत्री अदिती राव हैदरीकडे सध्या काम नाही. नुकतीच तिने फराह खानच्या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. त्यावेळी अदिती म्हणाली की, 'हिरामंडी'ला खूप प्रेम मिळाले. सगळीकडे या सीरिजची चर्चा होती. नंतर मला चांगली कामे मिळतील, अशी आशा वाटत होती. अक्षरशः ऑफर्सचा पाऊस पडेल, असे वाटले होते. मात्र, मी ठार रिकामी बसले आहे. दुष्काळ पडल्यासारखे वाटत आहे. काही काम नसल्यामुळे तू लग्न केले का, असे फराहने गमतीने विचारताच अदितीने होकार दिला. अदितीने नुकतेच दाक्षिणात्य अभिनेता सिद्धार्थसोबत लग्न केले. अदिती लवकरच इम्तियाज अलीच्या सीरिजमध्ये दिसणार असून यामध्ये अर्जुन रामपाल आणि अविनाश तिवारी दिसतील.



### पुन्हा दिसणार संजय दत्त-सलमान खानची जोडी

**मुंबई** : 'चल मेरे भाई' आणि 'साजन'सारख्या चित्रपटांमध्ये एकत्र दिसलेले सलमान खान आणि संजय दत्त पुन्हा एकदा एकत्र चित्रपट करत आहेत. अलिकडेच सलमान खानने सिकंदरच्या पत्रकार परिषदेत याबद्दल बोलले होते. आता संजय दत्तनेही यावर दुजोरा दिला आहे. तो म्हणाला की त्याला त्याचा धाकटा भाऊ सलमानसोबत काम करायला खूप आनंद होत आहे. नुकताच संजय दत्तच्या आगामी 'द भूतनी' चित्रपटाचा ट्रेलर लाँच कार्यक्रम पार पडला. यावेळी संजय दत्तला विचारण्यात आले की तो खरोखर सलमानसोबत काम करत आहे का? यावर संजय दत्त म्हणाला, हो आम्ही नक्कीच ते करत आहोत, आम्ही दोघे भाऊ एकत्र... तुम्ही साजन पाहिला आहे, तुम्ही चल मेरे भाई पाहिला आहे. आता या दोघांमधील टशन पाहा. हा एक ॲक्शन चित्रपट आहे आणि मी खूप आनंदी आणि उत्साहित आहे की मी २५ वर्षांनंतर माझ्या लहान भावासोबत काम करणार आहे.



# हवामान खाते आता कमावता विभाग

भारतातील हवामान अंदाज व आपत्ती व्यवस्थापनासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारे भारतीय हवामान विभाग (आयएमडी) आता महसूल कमावणाऱ्या शासकीय संस्थांपैकी एक बनले आहे. २०२२-२३ पासून २२६ कोटी रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवले आहे, ज्याचा मोठा वाटा विमानवाहतूक हवामान सेवांमधून आला आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या अहवालानुसार, हे मंत्रालयाच्या अखत्यारीत सर्वाधिक महसूल मिळवणारे विभाग ठरले आहे. विमानतळ प्राधिकरणाला पुरविल्या जाणाऱ्या हवामानविषयक सेवा, हवामान डेटा विक्री, मासिक अहवाल, तसेच उपकरणांच्या चाचणी आणि अंशांकन यांमधून आयएमडीला मोठा आर्थिक लाभ झाला आहे.

**विमानतळ हवामान सेवेतून मोठी कमाई**

संसदेच्या विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण, वन आणि हवामान बदल स्थायी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार, ने २०२४-२५ च्या पहिल्या सहा



महिन्यांतच ६६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. विमानतळ हवामान सेवा ही या कमाईतील प्रमुख घटक आहे. या सेवेद्वारे विमानतळ प्राधिकरणाला अचूक हवामान अंदाज पुरवले जातात, जे उड्डाण सुरक्षा आणि व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे ठरतात. याशिवाय, आयएमडीने आपल्या हवामान डेटाच्या विक्रीसाठी संरक्षित प्रणाली विकसित केली असून, विविध सरकारी व खाजगी संस्थांना विशिष्ट दराने माहिती उपलब्ध केली जाते.

**राष्ट्रीय महासागर तंत्रज्ञान संस्थेची कमाई**

व्यतिरिक्त, चेन्नईस्थित राष्ट्रीय महासागर तंत्रज्ञान संस्थादेखील महसूल कमावणारी संस्था ठरली आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या माहितीनुसार, या संस्थेने गेल्या तीन वर्षांत २४ कोटी रुपयांची कमाई केली आहे. आयएमडीने ४२ नवीन तंत्रज्ञान विकसित करून ती उद्योगांना विक्री केली आहे.

**नवीन ऊर्जा क्षेत्रासाठी हवामान डेटा सेवा**

नूतनीकरणक्षम ऊर्जा क्षेत्राच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन, आयएमडीने विशेष डेटा सेवा विकसित केली आहे. दहा दिवसांपर्यंतचा हवामान अंदाज, पर्जन्यमान, तापमान, वाऱ्याचा वेग, आर्द्रता, तसेच भू-शास्त्रीय घटक यांचा समावेश असलेल्या या डेटामधून वीज निर्मिती आणि हवामान धोरणे आखण्यात मदत होते. हे हवामान अंदाज केंद्र व राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहेत. विशेषतः विषम हवामान परिस्थिती ओळखण्यासाठी आणि आपत्तीपूर्व तयारी करण्यासाठी हे अंदाज महत्त्वपूर्ण ठरत आहेत.

# एसबीआयला एटीएमने केले मालामाल!




सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना एटीएम सेवेच्या माध्यमातून मिळणाऱ्या पैशांबद्दल केंद्र सरकारने संसदेत महत्त्वाची माहिती दिली. लोकसभेत तृणमूल काँग्रेसच्या खासदार माला रॉय यांनी विचारलेल्या प्रश्नावर अर्थ मंत्रालयाने याबद्दल आकडेवारी जाहीर केली. केंद्र सरकारने दिलेल्या माहितीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाने जवळपास २ हजार कोटी रुपये उत्पन्न कमावले आहे.

मागील पाच आर्थिक वर्षांमध्ये एटीएमच्या माध्यमातून बँकांनी किती पैसे कमावले याबद्दल सरकारने माहिती दिली आहे. केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, एटीएम सेवेतून फायदा होणाऱ्या बँकांची संख्या खूपच कमी आहे. मात्र, एसबीआयला भरपूर पैसे मिळाले आहेत.

**कोणत्या बँकांना एटीएम सेवेत फायद्यात?**

रिपोर्टनुसार, आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षांच्या काळात वेगवेगळ्या सार्वजनिक बँकांनी वेगवेगळ्या स्वरुपात उत्पन्न मिळवले आहे. तर काही बँकांना तोटा सहन करावा लागला आहे. कमाई करणाऱ्या बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया आणि पंजाब नॅशनल बँकेचा समावेश आहे.

आकडेवारीवर नजर टाकायची झाल्यास २०१९-२० मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियाने ६५६ कोटी रुपये एटीएम सेवेतून कमावले. तर पंजाब नॅशनल बँकेने १०२.४० कोटी रुपये. दुसरीकडे बँक ऑफ बडोदा बँकेला ७०.०६ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. बँक ऑफ इंडियालाही २१२.०८ कोटींचा तोटा झाला आहे.

इंडियन बँकेला २०१९-२० या काळात ४१.८५ कोटींचे नुकसान झाले आहे. २०२३-२४ मध्ये ते आणखी वाढून १८८.७५ कोटी रुपयांवर गेले. सेंट्रल बँक ऑफ इंडियालाही २०१९-२० मध्ये ६०.२६ कोटी रुपयांचे नुकसान झाले. तर २०२३-२४ मध्ये ते १९५.८८ कोटींवर पोहोचले.

# भारतीय कुटुंबांकडे सोन्याचा मोठा खजिना!

भारतीयांचे सोन्यावरील प्रेम पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. ग्लोबलच्या एका अहवालानुसार, भारतीय कुटुंबांकडे असलेला सोन्याचा साठा आता जगातील टॉप १० केंद्रीय बँकांच्या एकूण साठ्याहूनही अधिक आहे.

सध्या भारतातील घरगुती सोन्याचा साठा तब्बल २५,००० टन इतका आहे. हा साठा अमेरिकेसह (८,१३३ टन), जर्मनी (सुमारे ३,३०० टन), इटली, फ्रान्स, रशिया, चीन, स्वित्झर्लंड, भारत, जपान आणि तुर्की या देशांच्या केंद्रीय बँकांपेक्षा खूपच जास्त आहे. डिसेंबर २०२४ पर्यंत, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे केवळ ८७६.१८ टन सोन्याचा साठा होता.

भारतीय ग्राहक आता फक्त सोनेच नाही, तर इतर क्षेत्रातही आघाडीवर आहेत. २०२४ मध्ये मारुती सुझुकीने भारतात इतकी वाहने विकली की, संपूर्ण जगभरात सुजुकी मोटरने त्यापेक्षा कमी विक्री केली आहे. भारतामध्ये मारुती सुझुकीने १८ लाखाहून अधिक कार विकल्या, तर सुजुकी मोटरने (भारत वगळून) केवळ १४ लाख गाड्यांची विक्री केली. याशिवाय, चिनी टी-चेन कंपनी मिक्स्यू सध्या जागतिक पातळीवर चर्चेत आहे. या कंपनीने स्टारबक्सने मॅकडोनाल्ड्सलाही मागे टाकत ४५,००० हून अधिक आउटलेट्स सुरू केली आहेत.

तुलनेसाठी पाहिल्यास, डिसेंबर २०२४ अखेर मॅकडोनाल्ड्सची ४३,४७७ आणि स्टारबक्सची ४०,१९९ हॉटेल्स होती. टी ब्रँड मिक्स्यू आता भारतातही काही शहरांमध्ये पोहोचला असून मोठ्या प्रमाणात विस्ताराची योजना आखत आहे.

# पुरुषांपेक्षा महिलांची म्युच्युअल फंडात जास्त गुंतवणूक

म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या एकूण गुंतवणूकदारांमध्ये महिलांचा वाटा एक चतुर्थांश म्हणजेच २५% पर्यंत वाढला आहे. त्याच वेळी, वैयक्तिक गुंतवणूकदारांच्या मालमत्तेत महिला गुंतवणूकदारांचा वाटा एक तृतीयांशपर्यंत पोहोचला आहे. याचा अर्थ असा की महिला पुरुषांपेक्षा जास्त गुंतवणूक करत आहेत.

असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया आणि क्रिसिलच्या अहवालानुसार, महिला गुंतवणूकदारांची मालमत्ता व्यवस्थापनाखालील रक्कम (एयूएम) मार्च २०१९ मध्ये ४.५९ लाख कोटी रुपये होती, जी मार्च २०२४ मध्ये दुप्पट होऊन ११.२५ लाख कोटी रुपये झाली.

**ब्रोकरच्या मदतीशिवाय गुंतवणूक करण्याचा ट्रेंड**

अहवालानुसार, महिला गुंतवणूकदारांमध्ये ब्रोकरच्या मदतीशिवाय थेट गुंतवणूक करण्याचा ट्रेंड वेगाने वाढत



आहे. मार्च २०२४ पर्यंत, त्यांच्या एयूएमपैकी सुमारे २१% थेट योजनांद्वारे आले. मार्च २०१९ मध्ये हा आकडा १४.२०% होता. तरुण महिला गुंतवणूकदारांमध्ये हा ट्रेंड सर्वात वेगवान आहे. २५-४४ वर्षे वयोगटातील महिलांमध्ये एकूण मध्ये थेट योजनांद्वारे गुंतवणुकीचा वाटा १६% वरून २७.३% पर्यंत वाढला, तर ५८ वर्षांवरील श्रेणीमध्ये तो १३.९% वरून १७.६% पर्यंत वाढला. म्युच्युअल फंडांमध्ये महिलांची गुंतवणूक ११ लाख कोटी रुपये आहे. यामध्ये, २५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या महिलांची गुंतवणूक सर्वात कमी १.६% आहे.

## अग्रलेख...

# मातृभाषेला फुटावी चैत्रपालवी

चैत्रपालवी बहरत आहे. यंदाची मंगल गुढी अधिकच खुशीने डौलत होती. कारण ज्या मराठी भाषेवर आपण मनापासून प्रेम केले, भक्ती केली त्या आईचे दुसरे रूप असणाऱ्या मराठी भाषेला अभिजात दर्जा मान्य करून जणू अखिल भारताने मराठी भाषेचे पूजनच केले आहे. निसर्गाचा नियम आहे की सबळ, सखोल आहे तेच टिकते. पण इतर दुर्बळ असताना आपण टिकून राहण्यात काही मातब्बरी नाही. विविध काळात हे केवळ मानवी समूहाबाबत नाही, तर संस्कृतीबाबतही घडते. त्यातच भाषा हे आत्मिक अत्यंत प्रवाही आणि चैतन्यशील संस्कृतीचे रूप आहे. म्हणूनच एखाद्या वैभवशाली परंपरेला, राज्याला नाहीसे करायचे असेल तर आक्रमक भाषा नष्ट करतात, हा इतिहास आहे. सत्तालालसी आक्रमक एखाद्या सुंदर लेण्यावर हल्ला करतात आणि त्यांना वाटते, आपण ही संस्कृती, हे राज्य नष्ट केले. परंतु अवकाशातले चैतन्य पुन्हा नवे कलावंत निर्माण करते. पुन्हा नवीन शिल्पकार नवी लेणी तयार करतात. म्हणजेच आक्रमणाला आक्रमणाने उत्तर द्यायचे नसते, तर त्याहून सबळ नवनिर्मितीने उत्तर द्यायचे असते. आज मराठी भाषेपुढे आणि अर्थातच नव्या पिढीपुढे हेच एक आव्हान आहे. चैत्र महिन्याच्या निमित्ताने त्यांनी पुन्हा एकदा नव्या सशक्त सर्जनशीलतेसाठी तयार व्हायला हवे. पोटार्थी समाज फक्त पोटासाठी आवश्यक असणाऱ्या कामाचा विचार करत, तेवढेच काम करून जिवंत राहू शकतो, आरोग्य टिकवू शकतो. पण तो त्या आरोग्याला सुरेल जगण्याचा मंत्र देऊ शकत नाही. खरे तर जीवन आणि जीवनसत्त्व या दोन्ही गोष्टींच्या संगमानेच भाषा पुढे जाते. आपल्याला केवळ बोलता येणे किंवा थातुरमातुर लिहिता येणे म्हणजेच भाषा उमजणे नव्हे, तर त्या भाषेतील लेखनामध्ये प्रतिभेचा झंकार उमटणे, नवनिर्मितीचे स्पंदन प्रकटणे महत्त्वाचे असते. त्यासाठी मराठी भाषिकांनी आपल्या पूर्वसूरींनी केलेल्या उत्तुंग नवनिर्मितीचा आस्वाद घेण्याची गरज आहे. म्हणूनच मराठी नववर्षाला केवळ अभिमानाच्या आवरणाखाली संकुचितपणाचा कोश विणण्यापेक्षा मातृभाषा मराठी जागतिक कशी होईल, वैश्विक कशी होईल हे बघायला हवे. केवळ राज्यापुरता, प्रदेशापुरता विचार न करता आपण वैदिक असण्याची भावना निर्माण करणे ही काळाची गरज आहे. अर्थात मराठी भाषेचा आग्रह धरणे याचा अर्थ इंग्रजी, जर्मन वा अन्य भाषांकडे दुर्लक्ष करणे असा होत नाही. एकाच वेळी उत्कृष्ट मराठी आणि त्याच वेळी इंग्रजी वा अन्य भाषांवर प्रभुत्व असणारी अनेक व्यक्तिमत्त्वे आपल्याला परिचित आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे असे किती तरी दिग्गज या निमित्ताने डोळ्यापुढे येतात. यांना मराठीबरोबरोच जागतिक भाषा अवगत होती आणि म्हणून ते विश्वविख्यात झाले. असे असले तरी लोकोत्तर कार्य करणाऱ्या या लोकांनी आपली निर्मिती, चिंतन मातृभाषा मराठीतच राखण्याचीही काळजी घेतली. अलिकडील उदाहरणे घ्यायची तर विख्यात खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर, अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, विजय भटकर, डॉ. रघुनाथ माशेलकर असे महनीय उत्कृष्ट इंग्रजीमुळे जगात सर्वमान्य झाले. परंतु आजही ते उत्कृष्ट मराठी बोलू शकतात, लिहू शकतात. यामागील कारण म्हणजे त्यांनी आपली ज्ञानाची, अभिव्यक्तीची भाषा विश्वभाषा इंग्रजी ठेवली, त्याचबरोबर आपली परंपरा, संस्कृती आणि संवेदना यांचे भान जागे ठेवणारी मराठीही जपली. आजच्या पिढीने मराठी अस्मिता जपताना याची नोंद घ्यायला हवी. इंग्रजीमध्ये व्यक्त होणे हा कुठल्याही प्रकारचा आजार समजू नये, कारण या भाषेत व्यक्त होणे ही काळाची गरज आहे. परंतु मूळ रुजायला हवे ते मातृभाषेमध्ये. कारण आपली मातृभाषा मराठी असणे म्हणजे फक्त अ, आ, इ, ई, उ, ऊ येणे नाही तर आपल्या कहाण्या, वाक्प्रचार, दंतकथा, कथा, म्हणी, स्त्री गीते, मराठीचा वेलू गगनावर नेणाऱ्या विचारवंतांची-ध्यासवंतांची चरित्रे ठावूक असणेही गरजेचे आहे. हे विचारधन मुलांना माहिती असावे; खेरीज त्यांची ती स्फूर्तिकेंद्रही असायला हवी. आकाश डोक्यावर असते, त्याप्रमाणे सगळे ग्रंथ सतत पाठीशी असतात. त्यांच्या अभ्यासातूनच आपण पुढे जात असतो. रक्तात भिनलेला प्राणवायू चैतन्य देतो त्याचप्रमाणे भाषासुद्धा आपल्याला प्रवाही ठेवत असते. केवळ शरीराने नव्हे तर अंतर्मनाने जिवंत ठेवत असते. त्यामुळेच उत्तम मराठी जपून ही विश्वभाषा कशी होईल, हे आजच्या तरुणाईने बघायला हवे.

भाषा म्हणून कागदोपत्री मातृभाषा अपरिहार्य करणे हा झाला केवळ वरवरचा गिलावा. अनिवार्यता असेल तर ही भाषा केवळ पन्नास-साठ मार्कांपुरती राहील, पण या विचाराने ती आपल्या अस्तित्वाशी कधीच एकरूप होणार नाही. म्हणूनच आता तीन पिढ्यांचे मिळून तिला वैभवी करण्याचे काम हाती घेण्याचा निश्चय करणे गरजेचे आहे. तरच मराठीची गुढी उभारण्यात आपल्याला यश मिळाले असे आपण समजू. अनेक व्यासपीठांवर किंवा राजकीय सभांमध्ये एक लोकप्रिय विचार मांडला जातो. तो म्हणजे, पाट्या मराठीत करा. मराठीत बोला. याची आवश्यकता आहेच परंतु या बाह्य गोष्टी आहेत. मराठीत बोलले पाहिजे, मराठीत पाट्या लिहिल्या पाहिजेत. पण मुळात हे सगळे आतून जाणवले पाहिजे. इथे व्यवहाराचा भाग दुय्यम तर मराठी रक्तामध्ये उतरण्याचा भाग प्रथम असायला हवा. आज पालकांनी मुलांशी बोलताना, घरगुती गप्पांमध्ये मराठीचा आग्रह धरायला हवा. बालगीते, बडबडगीते पुन्हा एकदा म्हणायला सुरुवात केली पाहिजे. मराठी भाषेतील उत्तम साहित्याच्या परंपरेची ओळख मुलांना करून देणे हीदेखील अतिशय गरजेची गोष्ट आहे. मात्र सध्या आई-बाबांची पिढीच इंग्रजीत जगलेली, इंग्रजी शिकलेली आहे. त्यांना मराठी येत नसल्याचा संकोच वाटत नाही. पण त्यांना इंग्रजीदेखील केवळ पोटार्थी व्यवहारापुरते येते. इंग्रजी येते याचा अर्थ त्यांना इंग्रजीतले अभिजात साहित्य माहिती असते असे नाही. फक्त त्यांना संगणकावर लिहिणे, एखाद्या पार्टीमध्ये चार वाक्य बोलणे इतकेच येत असते. प्रत्यक्षात विचारांनी व्यक्त होण्याची वेळ येते तेव्हा अनेकांचे पितळ उघड पडते. अभिजात मराठीच्या प्रेमामध्ये अशा बेगडीपणाचा काहीही उपयोग नाही. दांभिकपणा झुगारून पुन्हा पायाभूत काम करण्याची नितांत गरज आहे. नववर्षाच्या प्रारंभी मराठी भाषेचा ध्वज फडकता ठेवण्यासाठी या कामाला प्रारंभ व्हायला हवा. मातृभाषेने आपल्याला संवेदनात्मक देणे दिले आहे. ते पुढच्या पिढीकडे पोहोचवणे आवश्यक वाटते. मातृभाषेचे ऋण फेडण्याची ही संधी आहे. तेव्हा अन्य गोष्टी ठेवण्यासाठी जागा करताना घरामध्ये पुस्तकांचे एक कपाट असू द्या. त्यात मराठीबरोबरच इतर भाषांची पुस्तकेही असू द्या. तुमच्याकडे शेक्सपियर असेल तर योग्यच, पण ज्ञानेश्वर, तुकाराम अशा संतांचे साहित्यही असू द्या. इंग्रजीतला थोर कवी वर्ड्सवर्थ असण्यास हरकत नाही पण श्रेष्ठ कुसुमाग्रजसुद्धा तुमच्याकडे असू द्या. बर्नार्ड शॉ असेल तर उत्तमच पण आपले लाडके व्यक्तिमत्त्व पुलंही असू द्या. चैत्राचा पहिला दिवस हा चैतन्याचा महोत्सव असतो. नवे शुभ संकल्प पूर्ण होण्याची ऊर्जा देणारा हा एक शुभ क्षण असतो. माता, राष्ट्रमाता आणि मातृभाषा यांना जपले नि जोपासले तरच नवी पिढी आपले सण, उत्सव आत्मीयतेने साजरे करू शकेल. आमच्या पिढीने नव्या पिढीला वारसा द्यायचा तो फक्त लौकिक संपत्तीचा नाही तर अलौकिक भाषावैभवाचा. त्यातून पाझरणाऱ्या सुमंगल संस्कारांचा! यंदाच्या चैत्र गुढीने तीच साद घातली होती. त्या सादेला सकारात्मक प्रतिसाद देऊ या. अभिजात मराठीची अभिजातता जपू या, जोपासू या.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# अग्निकांडातील नोट कांड!

पनामा पेपर्स या बहुचर्चित पुस्तकातील पहिले वाक्य आहे, 'इतिहासात असे काही क्षण येतात की मोठे सत्य अचानक बाहेर येते.' सध्या गाजत असलेल्या, न्या. यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी सापडलेल्या□१५ कोटी रुपयांनी ते सत्य करून दाखविले आहे. न्या. वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानावर कुणी छापा मारला नव्हता, त्यांच्या मालमत्तेबाबत कुणी तक्रार केलेली नव्हती. ते सपत्नीक बाहेरगावी गेले असताना, अचानक त्यांच्या निवासस्थानाच्या एका भागात आग लागली. ती आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले आणि मग अग्निशमन दलाला नोटांनी भरलेली, अर्धवट जळालेली पाच पोती सापडली. सारेच चमत्कारिक.

**सुखराम कांड** : राजकीय नेते, पोलिस, मुलकी अधिकारी, त्यातही सार्वजनिक बांधकाम व परिवहन विभागात काम करणारे कर्मचारी यांच्या निवासस्थानी मोठी रोकड सापडल्याच्या घटना घडत आल्या आहेत. राजकीय नेत्यांच्या निवासस्थानी मोठी रोकड सापडल्याची देशातील पहिली घटना बहुधा हिमाचल प्रदेशातील माजी केंद्रीय मंत्री सुखराम यांच्या बाबतीत घडली होती. दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानातून २ कोटी ४५ लाख तर हिमाचल प्रदेशातील मंडी येथील निवासस्थानातून १ कोटी १६ लाख रुपये जप्त करण्यात आले होते.

**पहिलीच घटना** : न्यायाधीशाच्या निवासस्थानी रोकड सापडल्याची ही मात्र पहिलीच घटना असावी. तीही एका उच्च न्यायालयाच्या संदर्भात आणि त्यातही देशाच्या राजधानीत असलेल्या दिल्ली उच्च न्यायालयात.

काही वर्षांपूर्वीची घटना. एक परिचित व्यक्ती मला सांगत होती, दिल्ली उच्च न्यायालयात कुणाला 'बेल' वगैरे हवी असल्यास आपल्याला सांगा, आपण हे काम सहज करू शकतो. हे शब्द ऐकून प्रथम तर धक्का बसला. पण, नंतर मात्र दिल्ली उच्च न्यायालयात काय काय होऊ शकते याची थोडी फार चर्चा ऐकावयास मिळाली. आणि या रोकड कांडाने तर त्यावर एकप्रकारे शिक्कामोर्तब केले आहे.

**रोकड कुणाची?** : न्या. वर्मा यांच्या निवासस्थानी १५ कोटी रुपयांची रोकड मिळाली असली तरी ती कुणाची हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे आणि तो अनुत्तरित राहणार आहे असे दिसते. ही रोकड न्या. वर्मा यांच्या निवासस्थानातून मिळाली असली तरी ती ते राहात असलेल्या भागातून मिळालेली नाही असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे ही रोकड नाकारण्यास त्यांना भरपूर वाव आहे. नवी दिल्लीतील सरकारी बंगले विस्तीर्ण आहेत. एखाद्या बंगल्याच्या एखाद्या कोपऱ्यात असलेल्या खोलीत रोकड वा आणखी काही मिळाल्यास त्याचा थेट संबंध संबंधित बंगल्यात राहणाऱ्या व्यक्तीशी कसा जोडता येईल असा प्रश्न विचारला जात आहे. न्या. वर्मा यांच्या शयनकक्षातून, अभ्यासिकेतून वा दिवाणखान्यातून ही रोकड मिळाली असती तर त्याचा इन्कार करणे न्या. वर्मा यांना जड गेले असते. त्यांच्या इन्कारावर कुणाचाही विश्वास बसला नसता. तसे झालेले नाही. न्यायाधीशाच्या बंगल्यात रोकड तर मिळाली, पण त्याची मालकी कुणाची हे सिद्ध करणारा पुरावा अद्याप तरी पोलिसांना गवसलेला नाही. न्या. वर्मा यांच्याकडे काम करणाऱ्या एखाद्या व्यक्तीचे हे काम असावे काय असाही प्रश्न विचारला जात आहे.

**बदनामीचा कट?** : न्या. वर्मा यांना बदनाम करण्यासाठी हे नोटकांड करण्यात आले असावे काय असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. ही रोकड न्या. वर्मा यांचीच आहे हे क्षणभर मान्य केले तर ते एवढी मोठी रक्कम आपल्या निवासस्थानी ठेवण्याचा मूर्खपणा करणार नाहीत. १५ कोटी रुपये स्वत:च्या निवासस्थानात दडवून ठेवलेले आणि ते दिल्लीबाहेर गेलेले हे जरा विचित्र वाटावे असे आहे. याने एक पैलू या प्रकरणाला जोडला गेला आहे.

**योग्य निर्णय** : न्या. वर्मा यांच्या निवासस्थानी सापडलेल्या या रोकडीबाबत ठोस पुरावा समोर आला नसला तरी ते संशयाच्या भोवऱ्यात आले आहेत हेही तेवढेच खरे. या स्थितीत सर्वोच्च न्यायालय जे करू शकत होते, ते न्यायालयाने करीत न्या. वर्मा यांची बदली अलाहाबाद उच्च न्यायालयात केली आहे. एवढ्या मोठ्या गंभीर प्रकरणात केवळ बदली ही शिक्षा होऊ शकत नाही याची सर्वोच्च न्यायालयालाही कल्पना असावी. पण, याव्यतिरिक्त न्यायालय काहीही करू शकत नाही.

**गुंतागुंतीची प्रक्रिया** : उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना हटविण्याची एक प्रक्रिया आहे. ती एवढी गुंतागुंतीची आहे की न्या. वर्मा यांना हटविणे जवळपास अशक्य आहे असे मानले जाते.

संसदेने १९६८ मध्ये पारित केलेल्या न्यायाधीश चौकशी कायद्यात ही सारी प्रक्रिया सांगण्यात आली आहे. त्यानुसार एखाद्या न्यायाधीशाचे वर्तन चुकीचे आढळल्यास, संसदेचे खासदार त्यांना हटविण्याची नोटीस देऊ शकतात. लोकसभेत अशी नोटीस देण्यासाठी किमान १०० खासदारांच्या सह्या आवश्यक असतात तर राज्यसभेत किमान ५० खासदारांच्या सहीने अशी नोटीस द्यावी लागेल. राज्यसभाध्यक्ष वा लोकसभा सभापतींनी अशी नोटीस स्वीकारल्यास, त्यातील आरोपांची चौकशी करण्यासाठी एक त्रिसदस्यीय समिती नेमली जाते. समितीचा अहवाल नंतर सभागृहासमोर ठेवला जातो आणि घटनादुरुस्ती ज्या बहुमताने पारित केली जाते, त्याच बहुमताने हा प्रस्ताव स्वीकारला गेल्यास, सभापती व अध्यक्ष राष्ट्रपतींकडे संबधित न्यायधीशाच्या बरखास्तीची शिफारस करतात व नंतर राष्ट्रपती ती स्वीकारीत त्या न्यायाधीशाला बरखास्त करतात. या साऱ्याचा विचार करता न्या. वर्मा यांची बरखास्ती किती अवघड आहे याची कल्पना करता येईल.

**अलाहाबादमध्ये पडसाद** : सर्वोच्च न्यायालयाने वर्मा प्रकरणी योग्य व तत्परतेने कारवाई करीत त्यांची बदली अलाहाबाद उच्च न्यायालयात करताच तेथील बार असोसिएशने संपावर जाण्याचा निर्णय घेतला. हे सारे प्रकरण कुठवर जाते हे येणाऱ्या काळात दिसू लागेल. पण, आजतरी न्यायपालिकेच्या प्रतिमेला एक धक्का लागला आहे. असाच धक्का काही वर्षांपूर्वी तत्कालीन सरन्यायाधीश न्या. रंजन गोगोई यांच्यावर एका महिलेने केलेल्या आरोपानंतर लागला होता. स्वत:वरील आरोपांबाबत सुनवाई करणाऱ्या पीठात स्वत: गोगोईच होते. म्हणजे संशयित आरोपी व न्यायाधीश या दोन्ही भूमिका ते बजावताना दिसले. ते योग्य झाले नव्हते.

न्या. वर्मा यांच्या निवास्थानातून अर्धवट जळालेल्या अवस्थेत सापडलेल्या नोटा साऱ्या देशाने पाहिल्या. आता ही रोकड न्या. वर्मा यांची की त्यांच्या एखाद्या कर्मचाऱ्याची याची चौकशी होत राहील. पण, सामान्य जनतेच्या मनात या घटनेने संशयाचे काहूर निर्माण केले आहे. ते कसे शांत होणार?

देशाच्या सरंक्षणाची सारी भिस्त ज्याप्रमाणे लष्कराकडे असते. तसेच देशाच्या न्यायदानाची सारी जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाकडे असते. न्यायाचे शेवटचे आशास्थान या भूमिकेतून सर्वोच्च न्यायालयाकडे पाहिले जाते. त्याला कोणत्याही परिस्थितीत तडा जाता कामा नये. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात एक परंपरा आहे. दररोज न्यायालयाचे कामकाज सुरू होत असताना, न्यायाधीश महोदयांचे आगमन होताच, तेथे तैनात मुख्य दरबान मोठ्याने पुकारा करीत म्हणतो, 'गॉड! सेव्ह अवर सुप्रीम कोर्ट!'

न्या. वर्मा यांच्या १५ कोटींच्या प्रकरणाने नेमकी हीच स्थिती भारतात निर्माण केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत एक योग्य संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.

## वेध

अनिरुद्ध पांडे

# तामिळी स्टॅलिन..!

स्टॅलिन म्हटले की जगभरातील सर्वसामान्यांच्या डोळ्यांसमोर एकच स्टॅलिन येतो. तो म्हणजे त्यावेळच्या सोवियत संघाचा, आजच्या रशियाचा सर्वेसर्वा जोसेफ स्टॅलिन. हा भारतातला तामिळी स्टॅलिन कोणालाही आठवत नाही. तो जोसेफ स्टॅलिन १९२८ ते १९५३ असा दीर्घकाळ रशियाचा अध्यक्ष होता. रशियाला महाशक्ती करण्यात त्याचा महत्त्वाचा सहभाग असला तरी रशियासोबतच जगभरात त्याची प्रतिमा एक हुकूमशहा अशीच होती. त्या स्टॅलिनची भारतातील तामिळनाडू या एका राज्याचा मुख्यमंत्री असलेल्या मुत्थुवेल करुणानिधी (एमके) स्टॅलिनशी किंचितही तुलना होऊ शकत नाही. पण एक हुकूमशहा म्हणून रशियन स्टॅलिनसोबत या तामिळी स्टॅलिनशी तुलना होऊ शकते, इतकेच. आज रशियाचा स्टॅलिन आठवण्याचे कारण म्हणजे या स्टॅलिनची हुकूमशाही प्रवृत्ती. दीर्घकाळ तामिळनाडू राज्य आणि द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक, डीएमके) या पक्षाचे नेतृत्व केलेल्या करुणानिधी यांचा हा स्टॅलिन मुलगा. हे स्टॅलिन २०२१ पासून तामिळनाडूचे मुख्यमंत्री आहेत. २०२६ मध्ये या राज्यात होणारी विधानसभेची निवडणूक लक्षात घेऊन मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी उटपटांग राजकीय निर्णय घेणे सुरू केले आहे. केवळ तामिळी जनतेला खूष करून ही 'व्होट बँक' मजबूत करण्याच्या वेडापायी ते वेडेपणाचेच नव्हे, तर मूर्खपणाचे असा जाहीरपणे उल्लेख झालेले निर्णय घेत आहेत. त्यातलाच एक म्हणजे भारत सरकारने मान्यता दिलेले 'रुपया'चे अधिकृत चिन्ह नाकारून स्वत:चे, तमिळ भाषेतील चिन्ह राज्यात वापरण्याचा निर्णय घेऊन टाकला.

देवनागरी लिपीतील 'रु' वापरून सध्या देशभर वापरल्या जाणाऱ्या देखण्या बोधचिन्हाचा (लोगो) गंमतीदार इतिहास आहे. हा लोगो आपण १५ जुलै २०१० पासून स्वीकारला आहे. त्यावेळी 'रुपया'च्या या बोधचिन्हासाठी राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत देशभरातून ३३३१ कलावंतांनी आपापली रचना पाठविली होती. यात निवडल्या गेलेली रचना उदयकुमार धर्मलिंगम यांची होती. यात देवनागरी 'र' आणि रोमन 'आर' जोडले असून त्यातील दोन समांतर रेषा राष्ट्रध्वज तिरंग्याच्या प्रतीकात्मक आहेत. उदयकुमार या कलावंताची वेगळीच गंमत आहे. त्यांचे हे बोधचिन्ह रद्द करणाऱ्या तामिळनाडू याच राज्यातील तामिळ मातृभाषा असलेले ते एक अभियंता आहेत. तामिळनाडूतील कल्लाकुरीची येथे जन्मलेले उदयकुमार मुंबई आयआयटीचे पदव्युत्तर पदवीप्राप्त अभियंता आणि गुवाहाटीच्या आयआयटीमध्ये प्राध्यापक आहेत. आणखी गंमत म्हणजे त्यांचे वडील एन. धर्मलिंगम हे द्रमुकचेच आमदार होते. याच द्रमुकने हे बोधचिन्ह आता पंधरा वर्षांनंतर धुडकावून लावण्याचा उपद्व्याप केला आहे. आणखी हास्यास्पद बाब अशी की हे बोधचिन्ह स्वीकारले गेले त्यावेळी, म्हणजे २०१० मध्ये या तामिळनाडून याच द्रमुकची सत्ता आणि करुणानिधी मुख्यमंत्री होते. आणखी विशेष असे की, त्यावेळी केंद्रात काँग्रेसची सत्ता, तामिळी पी. चिदंबरम अर्थमंत्री आणि त्यांना याच द्रमुकचा पाठिंबा होता.

खरेतर विद्यमान मुख्यमंत्री स्टॅलिन यांचे वडील करुणानिधी यांचीही 'द्रविडी' मानसिकता अशीच फुटीरतेची होती असा इतिहास आहे. त्यांनी तर म्हणे, १९७० मध्ये चक्क भारताच्या तिरंग्याला, राष्ट्रध्वजालाच आव्हान देण्याचा प्रस्ताव तयार केला होता. मूळ तिरंगा फक्त २५ टक्के ठेवून ७५ टक्के तामिळींची अस्मिताचिन्हे वापरण्याचा पोरकट आणि फालतू असा हा प्रस्ताव त्यावेळी जोरदार विरोध झाल्यामुळे कचऱ्यात जाऊन पडला होता. यावेळी पंधरा वर्षांपासून भारत सरकारने एकमुखी मान्य केलेले, नोटांवर छापलेले रुपयाचे बोधचिन्ह तर चक्क बदलूनच टाकण्याचा उद्योग या तामिळी स्टॅलिनने केला आहे. स्टॅलिनच्या या उपद्व्यापाला विशेष म्हणजे, विविध विचारसरणीच्या बहुतेक सर्वच अर्थतज्ज्ञ, कायदेपंडित, राजकीय नेते, पक्ष, प्रसारमाध्यमे यांनी उपहास करून, कडाडून विरोध करून चांगलेच झोडून काढले आहे. भारतीय जनता पार्टीचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांनी तर 'मूर्ख' स्टॅलिनचे 'मूर्ख पाऊल' अशा शब्दांत या कृतीचा उल्लेख केला आहे. या देशात २२ अधिकृत भाषा असून त्यापैकी एक तामिळ आहे. परंतु एखाद्या राज्याने आपल्या भाषेनुसार एखादे राष्ट्रीय चिन्ह बदलण्याचा हा पहिलाच प्रसंग असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. एका अर्थाने एखादे राष्ट्रीय मानचिन्ह किंवा बोधचिन्ह बदलवून टाकणे ही कृती म्हणजे देशद्रोहच असायला पाहिजे. पण एखाद्याचा अगोचरपणा, वावदूकपणा, पोरकटपणा, मूर्खपणा किंवा फालतूपणाला असेही महत्त्व देऊन विनाकारण 'माकडाच्या हाती कोलीत' देऊ नये हेही खरेच आहे. या साऱ्या घटनाक्रमानंतर तामिळनाडूत आता भारत सरकारच्या चलनी नोटांचे नेमके काय होणार किंवा स्टॅलिन सरकार काय करणार हा प्रश्न स्वाभाविकपणेच उपस्थित होणार आहे. कारण या भारतीय नोटांवर, तेच बोधचिन्ह आहे जे या सरकारने नाकारले आहे. हे स्टॅलिन सरकार आता स्वत:च्या नोटा काढून त्या चलनात आणण्याचा बिनडोकपणाचा कळस गाठणारा निर्णय घेते की काय, हेच आता पाहायचे आहे.

९८८१७१७८२९

## कानोसा

अमोल पुसदकर

# हे ऋषिवर शत शत वंदन...!

वर्षप्रतिपदा हा सृष्टीची कालगणना सुरू झाल्याचा दिवस आहे. ब्रह्मदेवाने याच दिवशी सृष्टीची निर्मिती केली होती असे म्हणतात. हा एका युगाचा प्रारंभ दिवस आहे. जसे ज्या ज्या वेळेला सृष्टीच्या निर्मितीचा विषय येईल त्या त्या वेळेला ब्रह्मदेवाची आठवण होणे स्वाभाविक आहे. २७ सप्टेंबर १९२५ ला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. आज संघाचे समर्थक असतील किंवा विरोधक, कोणीही संघाचे या देशातील अस्तित्व, महत्त्व आणि प्रभाव नाकारू शकत नाही. ज्या ज्या वेळेस संघाचा उल्लेख येईल त्या त्या वेळेस लोकांना संघनिर्माते पूजनीय डॉ. हेडगेवार यांचीही निश्चितच आठवण होईल. ते संघसृष्टीचे निर्माते आहेत. वर्षप्रतिपदा हा त्यांचा जन्मदिवस आहे. जसे कुठलीही भौतिक गोष्ट अस्तित्वात येण्याच्या अगोदर ती गोष्ट कोणाच्या तरी मनामध्ये, बुद्धीमध्ये असते. त्याचप्रमाणे संघ प्रत्यक्षात विजयादशमीच्या दिवशी जरी अस्तित्वात आला होता तरीही संघनिर्माते पू. डॉ. हेडगेवार यांच्या मनामध्ये हिंदूंचे संघटन झाले पाहिजे यासाठी काहीतरी व्यवस्था असली पाहिजे, अशा पद्धतीचा विचार होता. त्यांच्या जीवनाच्या सुरुवातीच्या काळात ज्यावेळेस ते कोलकाता येथे वैद्यकीय शिक्षण घ्यायला गेले त्यावेळेस ते 'अनुशीलन समिती' या क्रांतिकारकांच्या संघटनेमध्ये सामील झाले. त्या कार्याचा त्यांनी अनुभव घेतला. परंतु अनुभवाअंती त्यांच्या असे लक्षात आले की, क्रांतिकार्याचा मार्ग हा गुप्त आहे. क्रांतिकार्याच्या या मार्गामध्ये पकडले गेलो तर अनेक हालअपेष्टांना सामोरे जावे लागेल, अशी परिस्थिती होती. त्यामुळे सर्वसामान्य व्यक्ती जी आपल्या कुटुंबाला घेऊन जगते, ती या मार्गाचा अवलंब करू शकणार नाही, याची पूजनीय डॉक्टरांना जाणीव झाली.

डॉक्टरांनी आपल्या देशाच्या इतिहासाचा अभ्यास केलेला होता. त्यावरून त्यांच्या असे लक्षात आले की, या देशातील माणसांमध्ये 'मला काय त्याचे' अशी भावना मोठ्या प्रमाणावर आहे. याच स्वार्थकेंद्री वृत्तीमुळे देश पारतंत्र्यात गेला. आपल्या देशातील लोकांमध्ये एकत्र येऊन एखादे मोठे कार्य उभे करण्यासाठी लागणारे अनुशासन, नियोजन या गोष्टींची कमतरता त्यांना आढळून आली. सोबतच हा समाज माझा आहे. हा देश माझा आहे. यासाठी माझे काहीतरी कर्तव्य आहे या भावनेचा मोठ्या प्रमाणावर लोप झालेला त्यांना दिसला. त्यामुळे त्यांना वाटले की, याच कारणांमुळे करोडो लोकांच्या समाजावर मूठभर इंग्रज राज्य करीत आहेत. या जर गोष्टी समाजामध्ये निर्माण झाल्या नाही तर आज आपण इंग्रजांच्या जाचातून मुक्त झालो तरी हे स्वातंत्र्य अल्पजीवी ठरेल. त्यामुळे त्यांच्या मनामध्ये विचार आला की, हिंदू समाजाचे संघटन केले पाहिजे. असे अभेद्य संघटन उभे केले पाहिजे की, ज्याकडे



वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत विश्वातील कोणत्याही शक्तीला होणार नाही. पूजनीय डॉक्टरजी म्हणायचे की, जसा अमेरिका हा अमेरिकन माणसांचा आहे, जपान हा जपानी माणसांचा आहे, त्याचप्रमाणे हिंदुस्तान हा हिंदूंचा आहे व या देशांमध्ये हिंदू म्हणतील तीच पूर्व दिशा असली पाहिजे. या सर्व विचारमंथनातून त्यांनी संघाची स्थापना केली.

ज्यावेळेला संघाची स्थापना झाली त्यावेळेला समाजाची मानसिकता कशी होती, हे समजून घेणे आवश्यक ठरेल. त्याकाळी लोक म्हणायचे की, चार हिंदू एका दिशेने त्याच वेळेला जातील ज्यावेळेस पाचवा त्यांच्या खांद्यावर आडवा झोपलेला असेल. त्यानंतर लोक म्हणायचे की, 'हिंदू इज अ डाईंग रेस-' हिंदू हा मरणपंथाला लागलेला संप्रदाय आहे. या देशामध्ये तेली आहेत, माळी आहेत, कुणबी आहेत, ब्राह्मण आहेत, जैन आहेत परंतु हिंदू कोण आहे, अशाही पद्धतीचा तर्क काही लोक द्यायचे. काही लोक म्हणायचे, 'जसे डॉंकी बट डोन्ट से हिंदू-' आम्हाला गाढव म्हणा, परंतु हिंदू म्हणू नका. असा तो काळ होता.

पूजनीय डॉक्टरांनी ज्या वेळेला समाजाचे निरीक्षण केले त्यावेळेस त्यांच्या असे लक्षात आले की, या समाजामध्ये अनुशासनाची कमतरता आहे, देशभक्तीची कमतरता आहे, संघटितपणे काम करण्याची कमतरता आहे, एखादे ध्येय घेऊन दीर्घकाळ कटिबद्ध राहण्याची कमतरता आहे. या सर्व गोष्टी व्यक्तीमध्ये निर्माण करण्यासाठी एखादी व्यवस्था असायला पाहिजे. परंतु नेमके काय केले पाहिजे, असे काही ठरलेले नव्हते. आज जिला शाखा म्हणतात ती शाखासुद्धा प्रत्यक्ष संघ स्थापनेच्या बैठकीनंतर काही महिन्यांनी प्रत्यक्षात मोहिते वाड्यात सुरू झाली. सुरुवातीला या शाखेचे स्वरूप विद्यार्थ्यांनी एकत्र यावे, कबड्डी खेळावी, विविध खेळ खेळावे, शारीरिक कार्यक्रम करावे व प्रार्थना म्हणून घरी जावे असे होते. पुढे हेच विद्यार्थी स्वयंसेवक झाले. स्वयंसेवक म्हणजे काय तर स्वयंप्रेरणेने देशाकरिता काम करायला सज्ज झालेली व्यक्ती. वास्तविक पाहता जिला शाखा म्हणतात त्या संघाच्या शाखेमध्ये शिशु, बाल, तरुण, प्रौढ असे वेगवेगळ्या वयोगटाचे लोक येतात. आपल्या वयाला साजेसे शारीरिक कार्यक्रम करतात. खेळ, योगासन, बौद्धिक चर्चा, गीत गायन इत्यादी. या सर्व गोष्टी जरी होत असल्या, तरीही संघ म्हणजे व्यायामशाळा नाही, संघ म्हणजे गीत गायनाचे केंद्र नाही, संघ म्हणजे योगा क्लब नाही. विविध प्रकारच्या शारीरिक आणि बौद्धिक कार्यक्रमांच्या द्वारे व्यक्तीच्या जीवनामध्ये परिवर्तन आणण्याचे एक साधन म्हणजे शाखा आहे. या साधनांमुळे व्यक्तीच्या मनामध्ये हा समाज माझा आहे, हा देश माझा आहे, या समाजाकरिता व देशाकरिता मी काही देणे लागतो अशा पद्धतीची भावना निर्माण होते. सामाजिक मन निर्माण होते. याच प्रेरणेतून पंडित दीनदयाल उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, नरेंद्र मोदी यांच्यासारखे लोक तयार झाले. यांच्यासारखे क्षमतावान, कर्तृत्ववान लोक संघात विद्यमान आहेत. सर्वसामान्य समाज त्यांना ओळखत नाही. कारण त्यांनी स्वतःला एका प्रसिद्धिपराङ्मुख कार्यपद्धतीमध्ये गाडून घेतलेले आहे. अनेक वेळा अनेक गोष्टी व्हायला पाहिजे असे सर्वांनाच वाटत असते, परंतु ते करेल कोण हा प्रश्न सर्व लोक एकमेकांना विचारीत असतात. संघाद्वारे निर्माण होणारे हे स्वयंसेवक, कार्यकर्ते हेच या सर्व प्रश्नांचे उत्तर आहे. कोणालाही सत्तेमध्ये बसविण्यासाठी हे कार्य सुरू नाही. ही भारत मातेची आराधना आहे. या आराधनेला आता १०० वर्षे पूर्ण होत आहेत. जो संघ पूजनीय डॉक्टरांनी आपल्याला दिलेला आहे तो नवीन पिढीपर्यंत जसाच्या तसा पोहोचविण्याची जबाबदारी विद्यमान पिढीवर आहे. लाखो स्वयंसेवक आज पूजनीय डॉक्टरांनी सांगितलेल्या या भारतभक्तीच्या मार्गावर चालत आहेत. ही एक अशक्यप्राय व जगाला अचंबित करणारी गोष्ट आहे की, ज्यांनी पूजनीय डॉक्टरांना पाहिले नाही असेही लोक व्यक्तिपूजेच्या या काळामध्ये तत्त्वाची पूजा करीत मार्गक्रमण करीत आहेत.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## राजकारणाला उतरती कळा

देशातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या एका दैनिक समूहामार्फत आजच्या घडीला देशामधील सर्वांत शक्तिशाली शंभर नेत्यांची यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील सहा नेत्यांची नावे प्रामुख्याने झळकली आहे. त्यामध्ये केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, शिवसेनेचे एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे शरद पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार आहेत.

यामध्ये राजकीय नेत्यांची संबंधित राज्यातील लोकप्रियता, राजकीय पकड, निर्णय घेण्याची क्षमता, प्रसार माध्यमात प्रभाव आदी गोष्टी पाहिल्या जात असतील असे या यादीवरून दिसते. या वर्षाच्या यादीचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे, उबाठाचे उद्धव ठाकरे यांच्यापैकी एकाचे नाव सुद्धा या शक्तिशाली यादीत नाही.

विधानसभा निवडणूक २०१९ चा कौल भाजप सेना युतीला मिळाला असताना उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रिपदासाठी हिंदुत्वाला तिलांजली देत काँग्रेस, राष्ट्रवादी सोबत जाऊन सत्ता स्थापन करीत मख्यमंत्रिपद पटकावले होते. ज्या काँग्रेस पक्षा संदर्भात आपले स्पष्ट विचार शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनी आपल्या भाषणात वेळोवेळी मांडले होते, त्यांच्या पुत्राने त्यांनाच तिलांजली दिली होती. या सगळ्याचा परिणाम प्रामुख्याने त्याची स्वतःची लोकप्रियता कमी होण्यात तर झाला पण त्याचा मोठा फटका विधानसभा निवडणुकीतील निकालात त्यांच्या गटाला बसला होता. त्याच्या गटाचे अवघे सतरा आमदार निवडणुकीत निवडून आले. यापेक्षा तिप्पट अधिक आमदार एकनाथ शिंदे यांचे निवडून आले होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरेंच्या बाबतीतसुद्धा हेच लागू होते. गेल्या कित्येक वर्षात राजकारणातील त्यांची धरसोड वृत्ती, सातत्य नसणे, नुसती टीका टिप्पणी शिवाय त्यानंतर कृती काहीच नाही. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांच्या राजकारणालासुद्धा उतरती कळा लागली. शक्तिशाली शंभर नेत्यांच्या यादीमध्ये आपले नाव येत नाही याचा त्यांनी साकल्याने विचार केला पाहिजे. नुसत्या टीका, टिप्पणी, भावनात्मक आवाहन करून आजचे राजकारण करता येत नाही, काळ बदलला आहे. मुख्य म्हणजे तरुण पिढीला तुमचे राजकारण भावत नाही हे कटू सत्य आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

मानव जीवनात अनेक गोष्टींचे महत्त्व आहे, पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जीवन. जीवन वाचवण्यासाठी आपल्याला अनेक वेळा एकमेकांची मदत करावी लागते. रक्तदान हे त्यातलेच एक आदर्श उदाहरण आहे. रक्तदान हे एक अनमोल दान आहे, ज्यामुळे आपल्यासारख्या अनेकांचे जीवन वाचू शकते. रक्तदानाची महानता आणि त्याचे महत्त्व आपल्याला समजून घेणे आवश्यक आहे.

रक्तदान म्हणजे काय? रक्तदान म्हणजे आपला रक्ताचा एक थेंब दुसऱ्या कोणाच्या जीवनात प्रवेश करणे. आपले रक्त, आपली सेवा, आपली मानवता यांचा एक अद्वितीय संगम असतो. प्रत्येक स्वस्थ व्यक्तीला रक्तदान करायला हवे. रक्तदानाची प्रक्रिया अत्यंत सोपी आहे. निर्धारित ठिकाणी, जसे की रक्तदान शिबिर, हॉस्पिटल किंवा क्लिनिकमध्ये जाऊन, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान करता येते. रक्तदानानंतर शरीरातील रक्ताची कमी झालेली मात्रा काहीच काळात भरून निघते. त्यामुळे रक्तदान करणे हे आरोग्यासाठी देखील फायद्याचे ठरते. रक्तदानाचा सामाजिक दृष्टिकोनदेखील फार महत्त्वाचा आहे. आजच्या युगात स्वार्थीपणा खूप वाढलेला आहे. प्रत्येकजण स्वतःच्या जीवनाचा विचार करतो आणि एकमेकांच्या दुःखात कमी पडतो. पण रक्तदानामुळे आपण एकमेकांच्या जीवनात सहानुभूती आणि मानवता दाखवू शकतो. रक्तदान हे आपल्या सृष्टीतील एक अद्वितीय योगदान आहे आणि म्हणूनच रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान आहे.

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

### संविधानाची बूज अशीच आहे का?

ज्या खाजगी कंपनीतील कामगारांना ८०५ रुपये पेन्शन आहे त्यांना महागाई नाही व ते तेवढ्या पेन्शनमध्ये जगू शकतात ही भूमिका सरकारची आहे. हे वास्तव दिसते ; कारण अनेकदा सरकारच्या दारी याचना करून १९९५ पासन त्यात वाढ नाही परंतु सरकारी दरबारात जनसेवा करणारे जे सातत्याने गोंधळ घालून कामकाज बंद पाडतात,विकासाच्या मुद्यांना कचऱ्यात ढकलतात, भ्रष्टाचाराला खतपाणी घालतात , सभागृहात हजेरी लावणे त्यांना अनेकवेळा आवडत नाही अशा खासदारांचे वेतन, अधिवेशन काळातील भत्ते, माजी खासदारांचे पेन्शन, अतिरिक्त पेन्शन यामध्ये सातत्याने वाढ होत आहे . सध्या खासदारांचे मासिक वेतन एक लक्ष चोवीस हजार रुपये, अधिवेशन काळातील भत्ता प्रतिदिन दोन हजार पाचशे रुपये आहे. हे सर्व पाहिल्यावर असे वाटते की सामान्यांसाठी स्वेच्छामरणाचा तरी सरकारने संविधानात बदल करून कायदा आणला बरे होईल.

**अमोल करकरे**/९१६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### डॉ. रविंद्र पाटील यांना राज्यस्तरीय टीपीओ पुरस्कार

**सोलापूर, दि.३० मार्च-**

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उद्योग व शिक्षण क्षेत्रात प्रभावी समन्वय साधत उल्लेखनीय कार्य करणारे नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, सोलापूरचे ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिष्ठाता डॉ. रविंद्र रघुनाथ पाटील यांना महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर्सतर्फे प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट इंडस्ट्री-अकॅडेमिया कोलॅबोरेशन हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यास पिंपरी-चिंचवडचे आमदार अमित गोरखे, लोणावळा नगराध्यक्षा सुरेखा जाधव आणि प्रसिद्ध मराठी अभिनेत्री रूपाली भोसले यांच्या हस्ते डॉ. पाटील यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. शितलकुमार रवंदळे, डॉ. संजय जाधव तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. संस्थेच्यावतीने मुख्य विश्वस्त, प्राचार्य व दोन्ही उपप्राचार्य यांनी डॉ. पाटील यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल अभिनंदन केले. डॉ. पाटील यांनी उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील सुसंवाद प्रस्थापित करून विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या सहकार्याने इंटर्नशिप, प्लेसमेंट ड्राइव्ह आणि उद्योग-समन्वय उपक्रम यशस्वीरित्या राबवले जात आहेत. या पुरस्कारामुळे संस्थेच्या कार्यक्षमतेला आणि ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाच्या योगदानाला राज्यभरात मान्यता मिळाली आहे.



### लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयात वैभव गायकवाड यांचे व्याख्यान

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात कृषी क्षेत्रातील उच्चशिक्षण संधी या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला व्याख्याते म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी वैभव गायकवाड (एम. एस. सी. पर्यावरणशास्त्र) हे लाभले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गायकवाड यांनी कृषी जैवतंत्रज्ञान या शाखेबदल माहिती सांगितली तसेच कृषी जैवतंत्रज्ञान क्षेत्रात पदवीधरांसाठी राष्ट्रीय बियाणे कंपन्या वनस्पती उतीसंवर्धन प्रयोगशाळा याठिकाणी शास्त्रज्ञ, तांत्रिक अधिकारी, याचबरोबर महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून कृषी अधिकारी, कृषी सहायक यामध्ये असलेल्या करियरच्या संधी तसेच कृषी आधारीत कृषी सेवा केंद्र, फळप्रक्रिया उद्योग, कृषी विपणन यासारख्या व्यवसायाच्या विविध संधी यांची माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषदेमार्फत व राष्ट्रीय कृषी संशोधन परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या एम. एस. सी. कृषी व पी. एच. डी. कृषी या परिक्षांविषयी, त्यामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक तयारीविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा करून आपल्या शंकाचे निरसन करून घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन होते. या कार्यक्रमास प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा मानदेशमुख, प्रा. अंकिता पवार, प्रा. आशिष सरकाळे तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



### 'डब्ल्यूआयटी'च्या टीमने अग्रिवचे टेकेथॉनमध्ये लाखाचे पारितोषिक जिंकले

**सोलापूर, दि.३० मार्च-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या इलेक्ट्रॉनिक्स शाखेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर गौरवास्पद कामगिरी करत टेकेथॉन २.० २०२५ स्पर्धेत स्मार्ट कीटकनाशक फवारणी रोबोट हा प्रकल्प यशस्वीरित्या सादर करून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. या पारितोषिकाचे स्वरूप सन्मानचिन्ह आणि एक लाखांचे धनादेश असा आहे. पुणे येथील ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी (एआयएसएसएसएस) कॉलेजमध्ये हा प्रकल्प प्रा. दिपाली वाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ऋग्वेदी पाटील, रितेश पाटील, वरुण दोरणाल, ओमकार आवडे या विद्यार्थ्यांनी सादर केला. स्मार्ट कीटकनाशक फवारणी रोबोट एक अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा आहे, जी फवारणी प्रक्रियेत अचूकता आणि कार्यक्षमता वाढवते. हा रोबोट कृषी क्षेत्रात कीटकनाशकांचा वापर अधिक प्रभावी आणि सुरक्षित पद्धतीने करण्यासाठी डिझाइन केला आहे. त्यात सेंसर्स आणि ए.आय. प्रणालींचा वापर केला आहे. स्मार्ट रोबोट्सच्या मदतीने पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होतो आणि शेतकऱ्यांची कामे सोपी होतात. शेतीचे यांत्रिकीकरण व त्यासोबत ए.आय. व इलेक्ट्रॉनिक्स सेन्सर अ‍ॅप्लिकेशन या मध्ये पुढील वर्षामध्ये इलेक्ट्रॉनिक्स शाखेच्या अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्याप्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. टेकेथॉन स्पर्धेमध्ये देशभरातून ३०० हून अधिक गटांनी सहभाग घेतला होता. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी आणि समस्त विश्वस्त, प्राचार्य डॉ. विजय आठवले, डॉ. सचिन गेंगजे यांनी केले.




# मराठा सेवा संघ जातीय संघटना नाही

## पत्रकारांच्या स्नेहमेळाव्यात अमोल शिंदे यांची स्पष्टोक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

मराठा सेवा संघ ही कुठल्याही जातीची संघटना नाही. अठरा बलुतेदार व सर्व जाती धर्मांना घेऊन एकत्र काम करणारी ही संघटना आहे. मात्र आजकाल काही विघ्नसंतुष्ट लोक मराठा समाजामध्ये आणि इतर समाजामध्ये दुफळी निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. याबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून पत्रकारांनी आपली लेखणी चालवावी आणि वास्तव समाजापुढे आणावे अशी स्पष्टोक्ती शिवसेना जिल्हाप्रमुख तथा मराठा नागरी पतसंस्थेचे चेअरमन अमोल शिंदे यांनी व्यक्त केली.

तानुबाई बिरजे पत्रकार कक्षाच्या वतीने रविवार, दि. ३० मार्च रोजी गुढीपाडवा आणि नूतन मराठी वर्षानिमित्त पत्रकारांच्या स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अमोल शिंदे बोलत होते. या प्रसंगी विचार मंचावर मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ. जे. के. देशमुख, शहराध्यक्ष चंद्रकांत पाटील, समन्वयक दत्ता मुळे, संभाजी ब्रिगेडचे सोमनाथ राऊत, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य गायकवाड, पत्रकार सिद्धाराम पाटील आदी उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून जिजाऊ वंदना घेण्यात आली. तानुबाई बिरजे पत्रकार कक्षाचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी प्रास्ताविक भाषणातून कार्यक्रम घेण्यामागची भूमिका विशद केली. मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. जे. के. देशमुख, पत्रकार सिद्धाराम पाटील यांचीही भाषणे झाली. पत्रकार प्रमोद बोडके यांनी सत्कारमूर्तींच्या वतीने सत्कारास उत्तर दिले. त्यानंतर उपस्थित पत्रकार बांधवांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन लक्ष्मण महाडिक, आभार उपाध्यक्ष सदाशिव पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आर. पी. पाटील, प्रकाश ननवरे यांनी परिश्रम घेतले.

> **या पत्रकारांचा गौरव :** दै. तरूण भारत मुख्य संपादक प्रशांत माने, राकेश कदम लोकमत, संतोष शिरसट पुढारी, प्रमोद बोडके सकाळ, सागर सुरवसे टीव्ही ९, तात्यासाहेब लांडगे सकाळ, अरविंद मोटे, अविनाश गायकवाड सोलापूर तरुण भारत , कृष्णकांत चव्हाण पुण्यनगरी, संदीप वाडेकर संचार, रामदास काटकर दिव्य मराठी, पांडुरंग सुरवसे कटूसत्य यांच्यासह विजय बाबर, विशाल भांगे, मकरंद ढोबळे, लक्ष्मीकांत शिंदे या चॅनल प्रतिनिधींचाही गौरव झाला.



### नामांकित शाळेतील चिमुकलीचे लैंगिक छळ प्रकरण

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडी आक्रमक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

शहरातील त्या नामांकित शाळेतील चिमुकलीच्या लैंगिक छळाप्रकरणी संबंधित कर्मचारी तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, संचालक मंडळ यांच्यावर पोस्कोअंतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ अटक कारण्यात यावी अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख प्रिया बसवंती, उपशहर प्रमुख ज्योती चितकोटी, उपशहर प्रमुख गीतांजली माने यांनी निवेदनाद्वारे केली आहे. पोलीस आयुक्त कार्यालयात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीच्या वतीने निवेदन देण्यात आले. तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे

अन्यथा शाळा व प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.शहरातील नामांकित शाळेतील शिशू वर्गात शिकत असलेल्या लहानग्या चिमुरडीवर गेल्या सहा महिन्यापासून शाळेतील कर्मचारी शिपाई वय ५५ वर्ष असणाऱ्या नराधमाने लैंगिक छळ केला असून, बदलापूर घटनेची पुनरावृत्ती घडली आहे. या घटनेमुळे सर्व पालक वर्गात व नागरिकांत प्रचंड प्रमाणात भीती, असुरक्षितता निर्माण झाली आहे. शाळेत सी सी टीव्ही कॅमेरे बंधनकारक असूनही यंत्रणा कार्यान्वित नाही. मुलींना प्रसाधन गृह ने जा करण्यासाठी महिला कर्मचारी नियुक्ती नाही. कर्मचारी चारित्र्य पडताळणी पत्र नाही. ६ महिने पासून हे कृत्य घडत आहे.यात पूर्णपणे शाळेचा हलगर्जीपणा दिसून येत आहे, असा आरोप केला आहे.

# हिंदू नववर्षानिमित्त मंद्रुपमध्ये शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३० मार्च-**

हिंदू नववर्ष आणि गुढीपाडवा सणानिमित्त मंद्रूप येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पारंपरिक वेशभूषा, भगव्या टोप्या आणि विविध सजवलेल्या वाहनांसह शोभायात्रेने संपूर्ण गावात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण केले. शोभायात्रेची सुरुवात मळसिद्धप्पा मंदिर येथून झाली.

या शोभायात्रेत पारंपरिक बैलगाड्यांचा देखील समावेश होता. यावर्षीच्या शोभायात्रेचे खास वैशिष्ट्य म्हणजे सायकलींचा मोठा ताफा. युवकांनी सायकलींना भगवे ध्वज लावून पारंपरिक उत्सवात पर्यावरणपूरक संदेश दिला.शोभायात्रेत लहान मुलांनी विशेष रुची घेतली. पारंपरिक परिधान केलेल्या बालकांनी भगवे ध्वज हातात घेऊन उत्साह वाढवला. त्यांच्या उपस्थितीने यात्रेला एक वेगळेच चैतन्य प्राप्त झाले. यंदा बैलगाड्यांचाही शोभायात्रेत समावेश करण्यात आला. देखण्या सजावटीच्या बैलगाड्या, पारंपरिक पोशाखातील शेतकरी आणि भगव्या




ध्वजांनी यात्रेचे वातावरण अधिकच भारावून टाकले. गुढीपाडवा हा हिंदू नववर्षाचा प्रारंभ मानला जातो. त्यामुळे या दिवशी आयोजित शोभायात्रा उत्साहात पार पडली. संपूर्ण गावात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते. आयोजकांनी उपस्थित सर्व भाविकांचे आभार मानले.

# मंद्रुपमध्ये गुडी पाडव्या दिवशी दहा क्विंटल गूळ व साखरेचे वाटप

### पन्नास पोते नारळ फोडले

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

गुडी पाडवा हा हिंदु नववर्षारंभ असल्याने व नवस पूर्ण झाल्याने मंद्रुपमधील शेकडो भक्तांनी मळसिध्द मंदिरात दहा क्विंटल गूळ व साखर वाटप केले. पन्नास पोत्यापेक्षा अधिक नारळ फोडण्यात आले.

नवस पूर्ण झाल्यानंतर शेतकरी व भक्तांकडून गोड प्रसाद म्हणून गूळ वाटण्याची अनेक वर्षापासून प्रथा सुरू आहे. यादिवशी संध्याकाळी चार वाजल्यानंतर नवस पूर्तीसाठी भक्तांकडून अकरा, एकवीस, एकावन्न, एकशे एक असे नारळ फोडण्यात येते. मंदिराच्या पायरीवर नारळ



फोडून नवस पूर्ण होतो. मळसिध्द मंदिरातील पुजारी व भाविकांना प्रसाद म्हणून गूळ आणि साखर वाटप करण्यात आले. मंद्रुपमधील महात्मा बसवेश्वर चौकामधील राम कुंभार यांनी नारळ विक्री तर दुकानदार मळसिध्द पाचवे यांनी दोन क्वींटल गूळ आणि साखर विक्री झाल्याचे सांगितले. भाविकांसाठी प्रसाद असणाऱ्या गूळाला ऊन्हाळ्यात विशेष महत्व आहे. ऊन्हाळ्यात शरीरातील तापमान नियंत्रित ठेऊन साखर पुरवठा करण्याचे काम गूळामुळे होते. म्हणून शास्त्रीयदृष्टया व परंपरा म्हणून गूळ वाटून आनंद व्यक्त केला जातो. कुंभार गल्लीतील चाळीस ते पन्नास भक्तांनी एकत्र येऊन मंदिरात गूळ व साखर वाटप केले. काही भक्तांकडून गूळाऐवजी साखरेला पसंती देण्यात आल्याचे सांगण्यात आले.



# आस्था रोटी बँकने अनाथांसोबत साजरा केला गुढीपाडवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३०मार्च -**

आस्था रोटी बँकचे अध्यक्ष विजय छंचुरे यांनी हा गुढीपाडवा मातोश्री अनाथआश्रम सोलापूर यांच्या बरोबर साजरा केला. अनाथ मुलींच्या आश्रमात प्रथमच गुढीपाडवा साजरा करण्यात आला. यावेळी त्या मुलींनी आरती करून सरस्वती पूजा केली.यावेळी आस्था रोटी बँकेचे महिला अध्यक्ष नीलिमा हिरेमठ यांनी मुलींना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. गुढीपाडवानिमित्त अनाथ मुलींच्या मिष्ठान्न भोजनाची व्यवस्था देखील आस्था रोटी बँक देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजय छंचुरे, नीलिमा हिरेमठ, छाया गंगणे, संगीता छंचुरे, सुवर्णा पाटील आदींनी परिश्रम घेतले.

# मंगळवेढ्यातील अरळी बंधाऱ्याचे भूमिपूजन; २२ कोटींचा निधी मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.३० मार्च-**

पंढरपूर, मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या २२ कोटी २२ लाख विकास निधीतून मंजूर झालेल्या अरळी बंधारा व इतर विविध विकास कामांचे भूमि पूजन आ. आवताडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ. समाधान आवताडे यांनी गुढीपाडवा व हिंदू नववर्ष शुभ मुहूर्तावर ग्रामदैवत नरसिंह प्रभूंचे दर्शन घेऊन सर्वांच्या भल्यासाठी प्रार्थना केली.

रात्रीचा-दिवस करून निवडणुकीत अरळी गावातील अनेक सहकाऱ्यांसोबत जेष्ठांनी देखील मीच उमेदवार आहे असा प्रचार करून मतदारसंघातील कानाकोपऱ्यात पोहचले. तुम्ही सर्वांनी कष्ट घेऊन मला आमदार' म्हणून काम करण्याची संधी दिलीय याची जाणीव आणि जबाबदारी कायम ठेवून आपणा सर्वांच्या विकासासाठी व गावाच्या धोरणात्मक वैभवासाठी मी नेहमी बांधील राहून आपली सेवा करेन असे अभिवचन आमदार आवताडे यांनी यावेळी व्यक्त करून कृतज्ञता मांडली. यावेळी माजी जि.प.सदस्य बापूराया उर्फ सिद्धू चौगुले, उपसभापती रमेश भांजे, संचालक अशोक केदार, जगन्नाथ कोकरे चनबसू येणपे, माजी सरपंच गणेश गावकरे, शिवयोगाप्पा पुजारी, रावसाहेब राजमाने, राजू पाटील, श्रीमंत मेहेत्रे, शैल्य गोडसे, गंगाधर काकणकी, पावले, विजय भोसले, तिपन्ना सिंदखेड, सतिश पाटील, संतोष गणेशकर, अशोक भिंगे, शिवाजी मोहिते, शिवशंकर भांजे, तात्या पवार, मल्लिकार्जुन भांजे तसेच अरळी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते.



# ठोकळ प्रशालेचा अजिंक्य वसपटे महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघात

**सोलापूर, दि. ३० मार्च-**



लुधियाना, पंजाब येथे होत असलेल्या १८ व्या सब-ज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्ट टेनिस स्पर्धेसाठी श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेच्या अजिंक्य वसपटे याची महाराष्ट्र सॉफ्ट टेनिस संघात निवड झाली. त्यास महाविद्यालयाचे प्राचार्य. डी. डी. गाजरे व क्रीडाशिक्षक अर्जुन सुरवसे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थापक अध्यक्षा निर्मलाताई ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका शिल्पाताई ठोकळ, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे यांनी अजिंक्य यास शुभेच्छा दिल्या.


## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४/२०२५
निशाण नं.६

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज सि. डि. सो. यांचे कोर्टात..**

**१) सरस्वती अनिल अंधारे,**
वय-३१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कारी, ता. बाशी, जि. सोलापूर
**२) कु. अरुंधती अनिल अंधारे,**
वय-११ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर
अ.पा.क. जनक आई अर्जदार नं. १
**३) आरती रतन अंधारे,**
वय-३१ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर
— **अर्जदार**

**विरुध्द**
**कोणीही नाही** - **सा.वाला**

**ज्या अर्थी** यातील अर्जदार नं. १ चे पती अर्जदार नं. २ चे वडिल व अर्जदार नं. ३ चे भाऊ अनिल रतन अंधारे हे दि. १६/०५/२०२४ रोजी मौजे कारी, ता. बार्शी, येथे मयत झालेले आहेत. मयत अनिल रतन अंधारे यांना अर्जदार नं. १ व २ शिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत अनिल रतन अंधारे वाहक क्रं. १२५२१३ हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात वाहक म्हणून नोकरीस होते. मयत अनिल रतन अंधारे यांचे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ येथे भविष्य निर्वाह निधीचे खाते असून सदर खात्यामध्ये तसेच उपदान/पुरवणी उपदार व शिल्लक रजा असे एकूण र.रु.५,८२,१५०/- एवढी अंतिम देयकाची रक्कम आहे. यातील अर्जदार नं. १ याने सदरची रक्कम वारस नात्याने अर्जदार नं. १ यांना मिळावी म्हणून ता. २१/१०/२०२४ रोजी विनंती केली असता संबंधीत विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ यांनी वारसचा दाखल्याची मागणी केली त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांना वारस दाखला मिळण्यासाठी मे. कोर्टात केलेला आहे.

**त्या अर्थी** वर नमूद अर्जदार नं. १ ते २ यांचे शिवाय मयत अनिल रतन अंधारे यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख दि.३/५/२०२५ रोजी याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना मयत अनिल रतन अंधारे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. दि.२६/०३/२०२५

**सही/-**
**क. लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**



## सोलापूर जनता सहकारी बँक लि.

SJSB Multi-State Scheduled Coop. Bank

मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - 413007
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

**जाहीर ताबा नोटीस**
नियम 8(1)
**(दि सेक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेटस अ‍ॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट 2002 अन्वये)**

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी सोलापूर जनता सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम 13(12) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम 13(2) अन्वये खालील नमूद कर्जदार, जामीनदार व गहाणकार -

| कर्जदार व गहाणकार व जामीनदार | 13(2) नोटीस व येणेबाकी | प्रत्यक्ष ताबा दिनांक |
|---|---|---|
| **शाखा - नवी पेठ**<br>**श्री.उमाकांत तुळशीराम बनसोडे,**<br>पत्ता-65, सम्राट चौक, चंडक हायस्कूल जवळ, न्यू बुधवार पेठ, उत्तर सोलापूर, सोलापूर मार्केट, सोलापूर.<br>**जामीनदार - 1) श्री.अंकुर अनिल पंधे, 2) श्रीमती रोहिणी अनिल पंधे** | दि. **21/09/2024**<br>रु.**8,07,827** + दि. **01/09/2024** पासूनचे व्याज व इतर खर्च<br>प्रतिकात्मक ताबा<br>दि. **10/12/2024** | मा.जिल्हादंडाधिकारीसो सोलापूर गृह शाखा यांचे कडील आदेश क्र.सिक्यु./एस.आर./93/2024 दि.10/01/2025 रोजीच्या आदेशानुसार मा.मंडल अधिकारी, सिटी सर्व्हे सोलापूर यांनी दि.25/03/2025 रोजी प्रत्यक्ष ताबा घेऊन बँकेकडे हस्तांतर केलेला आहे. |
| श्री. उमाकांत तुळशीराम बनसोडे यांचे मालकीची जिल्हा व उपजिल्हा सोलापूर, ता.उत्तर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकत यासी जुना सर्व्हे नं.489 नवीन सर्व्हे नं.505, प्लॉट नं.13 वसंत विहार फेज नं.III या इमारतीमधील, T-2 टॉवरमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.111 यांचे क्षेत्र 29.56 चौ.मी. यासी चतु:सीमा पुढील प्रमाणे :- पूर्वेस - मोकळी जागा दक्षिणेस - T-2-112 पश्चिमेस - ओपन डक्ट / कॉमन पॅसेज उत्तरेस - T-2-110 | | |

वरील कर्जदार व जामीनदार यांना मागणी नोटीस पाठवून संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून 60 (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीसीनंतर आलेला भरणा वजा जाता उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उर्वरित रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली होती. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, मा.जिल्हादंडाधिकारीसो सोलापूर गृह शाखा यांचे आदेशान्वये वरील परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा वर नमूद तारखेस दि सेक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेटस अ‍ॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट 2002 चे कलम 14 अन्वये प्रत्यक्ष ताबा घेऊन बँकेकडे हस्तांतर केलेला आहे. सदर तारण स्थावर बँकेच्या ताब्यात दिली आहे. त्याप्रमाणे बँकेने सदर मिळकत लिलावामध्ये विकून खरेदीदारास स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा दिलेला आहे.

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**दिनांक : 25/03/2025**
**ठिकाण : सोलापूर**

शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को ऑप बँक)**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### मानव ठक्करचे आव्हान संपुष्टात

**चेन्नई** : डब्ल्यूटीटी स्टार स्पर्धक चेन्नई २०२५ स्पर्धेत मानव ठक्करची ऐतिहासिक विजयी मालिका रविवारी संपुष्टात आली. मानवला जागतिक क्रमवारीत ५४ व्या क्रमांकावर असलेल्या थिबॉल्ट पोरेटकडून ३-१ अशा संघर्षपूर्ण उपांत्य फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. यापूर्वी, मानवने जर्मनीच्या आंद्रे बर्टेलस्मेयर आणि दक्षिण कोरियाच्या ऑलिंपिक पदक विजेत्या लिम जोंग-हून यांना सलग पाच सामन्यांच्या थरारक सामन्यांमध्ये पराभूत करून उपांत्य फेरी गाठली होती.एक दिवस आधी डब्ल्यूटीटी स्टार स्पर्धक उपांत्य फेरीत पोहोचणारा पहिला भारतीय पुरुष खेळाडू ठरलेल्या मानवने जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमवर उत्साही कामगिरी केली व फ्रान्सच्या २० वर्षीय खेळाडूला पराभवाचा धक्का दिला. इतिहासात आपले स्थान मिळवण्याशिवाय मानवने आपल्या खळबळजनक उपांत्य फेरीत २१० महत्त्वपूर्ण रँकिंग गुण व ३.४२ लाख रुपयांची कमाई केली. या स्पर्धेत अचंता शरथ कमलच्या दोन दशकांच्या दिग्गज कारकिर्दीचा शेवट झाला. त्याचा डब्ल्यूटीटी स्टार स्पर्धक चेन्नई २०२५ मध्ये पुरुषांच्या एकेरीत स्नेहित सुरवज्जुलाकडून १६ व्या फेरीत पराभव झाला.



### जुनागड, त्रिवेंद्रम्‌मध्ये फिट इंडिया सायकल रॅली

**नवी दिल्ली** : केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी रविवारी गुजरातमधील जुनागढ येथे फिट इंडिया संडेज ऑन सायकलचे नेतृत्व केले. त्याच वेळी, केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांनी त्रिवेंद्रम येथील क्लिफ हाऊस येथून सायकलिंग रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. जुनागढमध्ये, ५०० हून अधिक सायकलस्वारांनी प्रतिष्ठित गिरनार प्रवेशद्वारापासून भवनाथ महादेव मंदिरापर्यंतच्या मार्गावर सुरुवात केली, जी गांधीनगर येथील भारतीय क्रीडा प्राधिकरण (एसएआय) प्रादेशिक केंद्राने आयोजित केली होती. त्रिवेंद्रममध्ये, रॅली क्लिफ हाऊसपासून सेंट्रल स्टेडियमपर्यंत ७ किमीच्या प्रतिष्ठित मार्गावरून गेली. ही रॅली एसएआय लक्ष्मीबाई नॅशनल कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनने (एसएआय एलएनसीपीई) आयोजित केली होती. या आठवड्यातील सायकलवरील संडेजमध्ये देशभरातील शालेय विद्यार्थ्यांच्या सहभागावर विशेष भर देण्यात आला, यात पालकांसह आणि शिक्षकांसह सायकलिंग केले. सायकलिंगशी तुम्ही आयुष्यभराची मैत्री करू शकता, असे मांडविया म्हणाले.

### बळी टिपण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधावे लागेल : स्टार्क

**विशाखापट्टणम्** : जेव्हा एखादा गोलंदाज वयस्कर होतो, तेव्हा त्यांना सामन्यात फलंदाजांना बाद करण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधावे लागतील, असे अनुभवी डावखुरा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क म्हणाला. अविवारी आयपीएल सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने सनरायझर्स हैदराबादवर ७ गड्यांनी विजय नोंदविला. या विजयात स्टार्कने टी-२० मध्ये प्रथमच पाच बळींची नोंद केली. त्याने ईशान किशन, नितीश कुमार रेड्डी व ट्रॅव्हिस हेडला बाद करून हैदराबादचे कंबरडे मोडले, तर उर्वरित दोन बळी डावाच्या शेवटी टिपले. आजकाल गोलंदाजांमध्ये अहंकार नाही. गोलंदाज म्हणून तुम्हाला चौकटीबाहेर विचार करायला हवा. गोलंदाज सामान्यतः जे करत नाही, त्या गोष्टी कराव्या लागतील. आजच्या विजयात योगदान देणे खरचं चांगले वाटते. आता आणखी पुढे जाऊ या, असेही तो म्हणाला. फलंदाजांना बाद करण्यासाठी वेगवेगळे मार्ग शोधण्याची आवश्यकता आहे. आज वेगवेगळे चेंडू टाकण्याचा प्रयत्न केला व ते खूप प्रभावी होते, असे स्टार्क सामना संपल्यानंतर म्हणाला.

### सोलापूरच्या स्वरीत ढवनला राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत २ रौप्य

**सोलापूर** : गुंटूर (आंध्र प्रदेश) येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत येथील धनुर्धर आर्चरी अकादमीच्या स्वरीत ढवन याने सांघिक व वैयक्तिक एलिमेशनमध्ये अशी २ रौप्य पदके प्राप्त केली. स्वरीत सध्या कुमठा नाका येथे सुरू असलेल्या धनुर्धर आर्चरी अकादमी येथे धनुर्विद्या प्रशिक्षक दिपक चिकणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे.स्वरीतचे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना उपाध्यक्ष व जिल्हा संघटना सचिव प्रा. हरिदास रणदिवे, अकादमीचे मार्गदर्शक प्रा. संतोष गवळी, विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. सचिन गायकवाड यांनी अभिनंदन केले.



# दिल्लीचा हैदराबादवर ७ गड्यांनी विजय

### सामनावीर मिचेल स्टार्कचे ५ बळी

◆ **विशाखापट्टणम्, ३० मार्च**

डावखुरा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कचा (३५ धावांत ५ बळी) अचूक मारा व फाफ डु प्लेसिसच्या (५०) अर्धशतकाच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सने रविवारी आयसीएल सामन्यात सनरायझर्स हैदराबादवर २४ चेंडू शिल्लक ठेवत ७ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. स्टार्क सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

नाणेफेक जिंकून सनरायझर्स हैदराबादने १८.४ षटकांत सर्वबाद १६३ धावा काढल्या आणि दिल्ली कॅपिटल्ससमोर विजयासाठी १६४ धावांचे लक्ष्य ठेवले. दिल्ली कॅपिटल्सने १६ षटकांत ३ बाद १६६ धावा काढून आपला विजय साकार केला. अक्षर पटेलच्या नेतृत्वाखालील दिल्ली कॅपिटल्सचा हा दोन सामन्यातील दुसरा विजय असून हैदराबादचा तीन सामन्यातील हा सलग दुसरा पराभव ठरला.

हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्याच्या सवंगड्यांनी अपेक्षेनुसार कामगिरी केली नाही. दिल्लीच्या वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने डावाच्या प्रारंभीच हैदराबादला जोरदार धक्के दिले. सलामीवीर अभिषेक शर्मा (१) लवकरच धावबाद झाल्यानंतर स्टार्कने ईशान किशन (२), नितीश कुमार रेड्डी (०) व ट्रॅव्हिस हेड (२२) या हुकमी खेळाडूंना तंबूत परत पाठवले. झांशी, उत्तर प्रदेशच्या २३ वर्षीय अनिकेत वर्माने हेनरिक क्लासेनच्या मदतीने चिवट झुंज दिली. या दोघानी ४ बाद ३७ धावसंख्येवरून संघाला ५ बाद ११४ धावांचा टप्पा गाठून दिला. यावेळी क्लासेन (३२) मोहित शर्माच्या गोलंदाजीला बळी पडला.

अनिकेतने ४१ चेंडूंत ५ चौकार व ६ षट्कारांच्या मदतने ७४ धावांची खेळी केली. मिचेल स्टार्कने तळाच्या फळीतील आणखी दोन फलंदाजांना बाद केले. स्टार्कने ३५ धावांत ५ बळी टिपले. कुलदीप यादवने ३ बळी, तर मोहित शर्माने एक बळी घेतला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना जेक फ्रेझर-मॅकगर्क (३८) व फाफ डु प्लेसिसने (५०) पहिल्या गड्यासाठी ८१ धावांची भागीदारी केली.

अभिषेक पोरेलने के. एल. आहुल (१५) व ट्रिस्टन स्टब्सच्या (नाबाद २१) सहकार्याने नाबाद खेळी करत दिल्ली कॅपिटल्सच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. अभिषेक पोरेलने अवघ्या १८ चेंडूंत २ चौकार व २ षट्कारांसह नाबाद ३४ धावांची विजयी खेळ केली. (वृत्तसंस्था)



ईशान किशनला बाद केल्यावर आनंद साजरा करताना मिचेल स्टार्क



फाफ डु प्लेसिसचे अर्धशतक

# हार्दिक पांड्याला दंड

**अहमदाबाद** : गुजरात टायटन्सविरुद्धच्या इंडियन प्रीमियर लीग सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. पाच वेळा विजेत्या मुंबईला शनिवारी गुजरातकडून ३६ धावांनी पराभव पत्करावा लागला. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिकला गुजरात टायटन्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल दंड ठोठावण्यात आला आहे.

### नामधारी एफसीचा एससी बंगळुरूवर विजय

**लुधियाना** : नामधारी एफसीने रविवारी नामधारी स्टेडियमवर रेलीगेशनचा धोका असलेल्या एससी बंगळुरूचा २-१ असा पराभव करून इंडिया लीग (आय-लीग) २०२४-२५ फुटबॉल हंगामातील आपला नववा विजय नोंदवला. आकाशदीप सिंगने २८ व्या मिनिटाला गोल करून पूर्वार्धात नामधारीला आघाडी मिळवून दिली, त्यानंतर फ्रान्सिस अॅडोने (८५) नंतर आघाडी दुप्पट केली. क्लेरेन्स फर्नांडिस (९०) ने शेवटच्या दिशेने एक गोल केला, परंतु तोपर्यंत खूप उशीर झाला होता. नामधारी २१ सामन्यांतून ३२ गुणांसह आय-लीग २०२४-२५ च्या टेबलमध्ये सहाव्या स्थानावर आहे.

# मुंबईला केकेआरविरुद्ध मुसंडी मारण्याची आशा



### आजचा सामना

मुंबई इंडियन्स वि. कोलकाता नाईट रायडर्स
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्‌सवर

◆ **मुंबई, ३० मार्च**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी पाच वेळचा विजेता मुंबई इंडियन्सचा सामना गत विजेत्या कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध (केकेआर) होणार आहे.या हंगामाच्या सुरुवातीलाच दोन जबरदस्त हादरे बसल्यानंतर आता मुंबई इंडियन्सला आपल्या घरच्या मैदानावर केकेआरविरुद्ध खेळताना जोरदार मुसंडी मारण्याची आशा आहे.

आयपीएल हंगामाची सुरुवात सलग पराभवाने होणे मुंबई इंडियन्ससाठी नवीन नाही. यापूर्वीही मुंबई इंडियन्सने अशा सलग पराभवाचा सामना कलेला आहे. या हंगामात मुंबईने आतापर्यंत चेन्नई सुपर किंग्ज व गुजरात टायटन्सकडून दोन सामने गमावले आहेत. ते अद्याप खाते उघडू शकले नाहीत.

मुंबई इंडियन्सला पुन्हा आयपीएल चषक जिंकायची असेल, तर त्यांना एकजुटीने सांघिक कामगिरी करण्याची गरज आहे. त्यांच्या गोलंदाजांकडून प्रभावी कामगिरीची तसेच फलंदाजांकडून सातत्य आवश्यक आहे. विशेषतः तळाच्या फळीत एखादा विशेषज्ञ फिनिशर असणे आवश्यक आहे. रोहित शर्मा थंड खेळ करत आहे, तर रायन रिकल्टनला भारतीय खेळपट्ट्यांवर अद्याप त्याची लय सापडलेली नाही. रोहित दोन वेळा एकाच अंकात बाद झाला, ज्यामध्ये शून्य धावांचा समावेश आहे. सूर्यकुमार यादवने गुजरातविरुद्ध ४८ धावा करून आपण फॉर्ममध्ये परींशयाचे दाखवून दिले. सातत्याने संघात बदल केल्यामुळे मुंबई इंडियन्स अजूनही योग्य संघ बांधणीच्या शोधात आहे. मुंबईला सूर्यकुमार व तिलक वर्माकडून खूप आशा आहे.

कर्णधार हार्दिक पांड्या वानखेडे स्टेडियमवर चमकदार कामगिरी करण्यास उत्सुक असेल. गत वर्षी रोहितकडून मुंबई इंडियन्स संघाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्याला प्रेक्षकांच्या टीकेला सामोरे जावे लागले होते.

जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीमुळे मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजीची जबाबदारी ट्रेंट बोल्ट, रीस टॉपल व दीपक चहर यांच्यावर अवलंबून आहे.

कोलकाता नाईट रायडर्सला सलामीच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुकडून पराभव पत्करावा लागला होता.परंतु त्यानंतर त्यांनी राजस्थान रॉयल्सवर विजय मिळविला. या विजयामुळे केकेआर संघाचे मनोबल उंचावलेले असेल.

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली केकेआरकडे आवश्यक असलेली ताकद आहे, परंतु क्विंटन डी कॉकचा सलामीचा जोडीदार म्हणून सुनील नारायण नसल्यामुळे सलामीवीर म्हणून मोईन अली खेळण्याची शक्यता आहे. त्यांच्या फलंदाजी क्रमवारीत रहाणे, व्यंकटेश अय्यर व अंगकृष्ण रघुवंशीचा समावेश आहे.

रिंकू सिंग व आंद्रे रसेल यांच्यामुळे केकेआरकडे डेथ ओव्हर्समध्ये आक्रमक कामगिरी अशा आहे तर त्यांची गोलंदाजीही तितकीच प्रभावी आहे. हर्षित राणा व वैभव अरोरा हे ऑस्ट्रेलियन डावखुरा गोलंदाज स्पेन्सर जॉन्सन यांच्यासह नवीन चेंडूवर प्रभावी आक्रमण करतात, परंतु केकेआरची खरी ताकद त्यांच्या फिरकी हल्ल्यात आहे. या फिरकी आक्रमणांत सुनील नरेन व वरुण चक्रवर्ती आहेत व त्यांच्यामध्ये प्रतिस्पर्धी संघाच्या फलंदाजीला धक्का देण्याची श्रक्ष मता आहे.

**सुनील नरेनचे आजारातून बरे होण्याचे संकेत**

सुनील नरेनने शनिवारी येथे सराव केला व त्याने आजारातून बरे होण्याचे संकेत दिले आहे. त्याच्या संभाव्य पुनरागमनामुळे केकेआर उत्साहित असेल.

गत वर्षी केकेआरने मुंबई इंडियन्सवर २४ धावांनी विजय मिळविला होता व १२ वर्षांत वानखेडे स्टेडियमवर त्यांचा हा पहिलाच विजय होता. हे मैदान अलिकडच्या काळात पाच वेळा विजेत्यांसाठी बालकिल्ला राहिला नाही. (वृत्तसंस्था)

# सोलापूरचे प्रकाश कंपलींना शिवस्वराज्य प्रेरणा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

येथील क्रिकेट प्रशिक्षक प्रकाश कंपली यांना क्रिकेट क्षेत्रातील बहुमोल योगदानासाठी पुणे येथील लोकशाहीर श्री.अण्णाभाऊ साठे हॉलमध्ये महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डच्या वतीने शिवस्वराज्य प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डस्‌ व टाइम्स ऑफ पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने हा सोहळा पार पडला. महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्डचे अध्यक्ष आदम सय्यद, भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई, राष्ट्रवादी काँग्रेसच्या रूपाली ठोंबरे, काँग्रेस नेत्या संगीता तिवारी, माजी राज्यमंत्री ज्ञानेश्वर कांबळे, आमदार बापूसाहेब पठारे, सतीश राठोड, महबूब सय्यद, स्नेहा कुलकर्णी यांच्या हस्ते हा पुरस्कार श्री. कंपली यांना सन्मानचिन्ह व सन्मान प्रमाणपत्र, शाल श्रीफळ व गिफ्ट हॅम्पर देऊन प्रदान करण्यात आला. कंपली हे क्रिकेटचे नॅशनल खेळाडू व आघाडीचे मध्यमगती गोलंदाज होते. ते हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात क्रीडा मार्गदर्शक तसेच के. पी.क्रिकेट अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत. त्यांनी मार्गदर्शन केलेल्या संघाने अनेक वेळा राज्य स्पर्धेत विजय प्राप्त केला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक खेळाडू घडले आहेत. पुरुष खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय संघातून खेळावे व सोलापूरचे व अकॅडमीचे नाव देशभर करावे आज हाच त्यांचा ध्यास आहे.



# शूटिंग बॉल स्पर्धेत संगमेश्वला विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

करमाळा येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन शूटिंग बॉल स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजने विजेतेपद पटकाविले.

अंतिम सामन्यात त्यांनी के एन भिसे कॉलेज कुर्डूवाडी २-0 सेटने पराभव केला. तत्पूर्वी उपांत्य सामन्यात त्यांनी करमाळ्याच्या प्रतापसिंह मोहिते पाटील कॉलेजचा २-0 सेटने मात केली. कैफ इनामदार, झैद हिरापुरे, उमरान रायचूरकर, फरहान पठाण, प्रताप सुरवसे, मलिक नदाफ, अजिंक्य पाटील यांनी संघास विजेतेपद मिळवून दिले.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक संतोष खेंडे, विक्रांत विभुते व शरण वांगी यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे संस्थेचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.



# रामशेजगड संघ मराठा प्रीमियर लीगचा विजेता

## शिवनेरी उपविजेता, अजिंक्यतारा तृतीय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

रामशेजगड संघाने मराठा प्रीमियर लीग २०२५चे विजेतेपद पटकावले. शिवनेरी संघाने उपविजेते तर अजिंक्यताराने तृतीय स्थान मिळवले.

येथील विजापूर रोडवरील शासकीय मैदानावर रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात ग्रामीण विभागातील उत्तर सोलापूर तालुक्यातील काकासाहेब काळे यांच्या रामशेजगड संघाने शहरातील मुन्ना वानकर यांच्या शिवनेरी संघाचा पराभव करत सिझन २ चे विजेतपद पटकाविले. त्यांना राजमाता जिजाऊ माँ साहेब यांचे वडील लखोजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजीराजे जाधव (सिंदखेडराजा) यांच्या हस्ते मानाचा प्रथम क्रमांकाचा कै.विजयराव मुळीक यांचे स्मरणार्थ चषक तसेच १ लाख ३९५ रुपयाचे रोख पारितोषक देण्यात आले. उपविजेत्या शिवनेरी संघाला कै.देवीदास पवार यांचे स्मरणार्थ चषक व रोख ५0 हजार ३९५ रुपये आणि तृतीय क्रमांकांचे बक्षीस कै.अंबादास पवार यांचे स्मरणार्थ चषक व रोख २५ हजार ३९५ पेनुरचे रणजीत चवरे यांच्या अंजिंक्यतारा संघाला देण्यात आले.

यावेळी प्रमुख मान्यवर माजी आमदार दिलीप माने, श्रीकांत मोरे, अनंत जाधव, रवी भोपळे, सुनील जाधव, योगेश गवळी, विक्रांत पवार, राम साठे, नामदेव पवार, श्रद्धा जवंजाळ, दत्तामामा मुळे, विनोद भोसले, आयोजक प्रशांत बाबर यांच्यासमवेत सर्व संघाचे मालक/प्रायोजक उपस्थित होते.

त्यापूर्वी सकाळी पहिला उपांत्य सामन्यात शहरी विभागातील शिवनेरी संघाने सिंधुदुर्ग संघावर ६ गड्यांनी विजय प्राप्त केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात ग्रामीण विभागातील रामशेजगड संघाने अजिंक्यतारा संघावर ६ धावांनी मात केली. तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात अजिंक्यतारा संघाने सिंधुदुर्ग ५0 धावांनी हरविले.या सामन्यांसाठी पंच म्हणून इर्षाद बिराजदार, महेश सोनवणे तर गुणलेखक म्हणून मिलिंद गोरे व गेनबा सुरवसे यांनी तर समालोचक म्हणून वीरेश कोळी व मनीष काळे यांनी काम पाहिले. बक्षीस समारंभाचे सूत्रसंचालन शंकर पवार यांनी केले. ही स्पर्धा पार पाडण्यासाठी संयोजक सागर गव्हाणे, राजा जाधव, अमोघ जगताप, शंकर पवार यांचे सहकार्य लाभले. या संपूर्ण स्पर्धेचे थेट प्रक्षेपण युट्युब वर स्टुडिओ स्पोर्ट्स मार्फत करण्यात आले.



### संक्षिप्त धावफलक

**अंतिम सामना-रामशेजगड** : १0५/५ (७) विजय वीर ३३, अरुण कोकाटे २0, विनायक शितोळे ३२, नितीन गायकवाड व मनोज पवार प्रत्येकी २ बळी विजयी विरुद्ध **शिवनेरी** : ८२/८ (७) सौरभ जाधव १४, तुषार पवार १६, दत्ता चव्हाण १३, माउली सिरसट २0/४ बळी, विजय वीर २ बळी, नवनाथ निंबाळकर व समाधान मसाळ प्रत्येकी १ बळी. सामनावीर - माउली सिरसट

**१ला उपांत्य सामना- सिंधुदुर्ग** : ६४/७ (८) विष्णु शिंदे ११, विनोद गुंड १५, मनोज पवार २ बळी, सौरभ जाधव, निरंजन कदम, नितीन गायकवाड प्रत्येकी १ बळी पराभूत विरुद्ध **शिवनेरी** : ६७/४ (४.४) सौरभ जाधव ३६, निरंजन कदम १४, आकाश चव्हाण २ बळी, गणेश जांधव व तानाजी जाधव प्रत्येकी १ बळी. सामनावीर सौरभ जाधव

**दुसरा उपांत्य सामना : रामशेजगड** : ८६/५ (८) विजय वीर २१,अरुण कोकाटे नाबाद ४१, विनायक शितोळे १५, योगेश खलाटे २ बळी, राजेश माने व सुभाष केदार प्रत्येकी १ बळी विजयी विरुद्ध **अजिंक्यतारा** : ८0/७ (८)राजेश माने १५, विठ्ठल चव्हाण १४, समाधान माने १८, योगेश खलाटे २१, माऊली शिरसाट १६/३ बळी, प्रथमेश माने ४/३ बळी. सामनावीर प्रथमेश माने.

**तृतीय क्रमांक सामना : अजिंक्यतारा** : ११३/४ (८) त्रिपाल पवार १५, विठ्ठल चव्हाण ४0, राजेश माने २२, योगेश खलाटे २१, विजयी विरुद्ध सिंधुदुर्ग : ६३/५ (८) विष्णु शिंदे ३२, उमेश भोसले १३, राजेश माने व सुभाष केदार प्रत्येकी २ बळी, योगेश खलाटे १ बळी. सामनावीर - राजेश माने.

**या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू**
मालिकावीर विजय वीर, फलंदाज विठ्ठल चव्हाण, गोलंदाज माऊली सिरसट, क्षेत्ररक्षक सौरभ जाधव, यष्टिरक्षक आकाश चव्हाण, झेल प्रथमेश माने.

# ठाण्याचा गवस व धाराशिवची शिंदे महाराष्ट्रचे कर्णधार

**मुंबई, दि. ३0 मार्च-**

जगन्नाथ पुरी (ओडिशा) येथे ३१ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत होणाऱ्या ५७ व्या पुरुष व महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे दोन्ही संघ रवाना झाले.

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या राज्य निवड चाचणी स्पर्धेतून पुरुष आणि महिला गटातील खेळाडूंची निवड करण्यात आली होती. सांगली येथील सराव शिबिरानंतर दोन्ही संघांनी राष्ट्रीय स्पर्धेसाठी तयारी पूर्ण केली.संघाच्या निरोपप्रसंगी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक-निंबाळकर, खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाचे सहसचिव तथा राज्य खो-खो असोसिएशनचे सचिव डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार अॅड. गोविंद शर्मा यांच्यासह राज्य असोसिएशनचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

''महाराष्ट्राचा संघ राष्ट्रीय स्पर्धेत चमकदार आणि सुवर्णमय कामगिरी करेल,'' असा विश्वास डॉ. जाधव यांनी व्यक्त केला.

**महाराष्ट्राचे संघ : पुरुष:** लक्ष्मण गवस (कर्णधार, ठाणे), प्रतीक वाईकर, सुयश गरगटे, रूद्र थोपटे, रविकिरण कच्छवा, शुभम थोरात (सर्व पुणे), ऋषिकेश मुर्चावडे, अनिकेत चेदवणकर, निहार दुबळे (मुंबई उपनगर), विजय शिंदे, श्याम ढोबळे (धाराशिव), मिलिंद चावरेकर, अक्षय मासाळ (सांगली), पियुष घोलम (मुंबई), नरेंद्र कातकडे (अहिल्यानगर). प्रशिक्षक : डॉ. नरेंद्र कुंदर (मुंबई उपनगर), सहाय्यक प्रशिक्षक : डॉ. पवन पाटील (परभणी), व्यवस्थापक : रमेश लव्हाट (अहिल्यानगर).



**महिला:** अश्विनी शिंदे (कर्णधार), संपदा मोरे, प्रीती काळे, संध्या सुरवसे, सुहानी धोत्रे, तन्वी भोसले (धाराशिव), सानिका चाफे, रितिका मगदूम, प्रगती कर्नाळे (सांगली), प्रियांका इंगळे, दिपाली राठोड, ऋतिका राठोड (पुणे), पायल पवार (रत्नागिरी), मनिषा पडेल (नाशिक), रेश्मा राठोड (ठाणे). प्रशिक्षक : नरेंद्र मेंगळ (ठाणे), सहाय्यक प्रशिक्षक : अनिल रौंदाळ (नंदुरबार), व्यवस्थापक : संध्या लव्हाट (अहिल्यानगर).

## संक्षिप्त वृत्त



### पंढरपूर नगर परिषदेचे हॉस्पिटल पुन्हा नागरिकांच्या सेवेत

**पंढरपूर,दि.३० मार्च -**

अनेक वर्षापासून बंद अवस्थेत असलेले पंढरपूर नगर परिषदेचे हॉस्पिटल पुन्हा नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आले आहे. या हॉस्पिटलचा शुभारंभ पाडव्याच्या मुहूर्तावर आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, रा.पा कटेकर, किरणराज घाडगे, विक्रम शिरसट,नागेश जाधव यांच्यासह आरोग्य विभागाचे डॉक्टर,कर्मचारी उपस्थित होते. १०० वर्षांची परंपरा असलेल्या पंढरपूर नगरपालिकेचे हॉस्पिटल अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत होते. आमदार अभिजीत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच पार पडलेल्या आमसभेत पंढरपूर शहरातील नागरिकांनी नगरपालिकेचे हॉस्पिटल बंद असल्याच्या तक्रार केल्याने आमदार पाटील यांच्या पाठपुराव्यातून नगरपालिकेचे हॉस्पिटल गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सुरू करण्यात आले. सामान्य नागरिकांच्या सेवेसाठी हॉस्पिटल सुरू झाल्याने पंढरपूर शहर व परिसरात हजारो गरजू रुग्णांना माफक दरात आरोग्यसेवा मिळणार आहे.

### 'त्या' खून प्रकरणातील आरोपीस १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मंजूर

**मंगळवेढा, दि.३० मार्च-**

बोराळे येथील महेश उदयकुमार गोवर्धन (वय२९) याच्या खून प्रकरणी अटकेत असलेले आरोपी भिमराव उर्फ बाळू कृष्णा चौगुले या आरोपीस पोलिस कोठडीत मंगळवेढा न्यायालयाने चौदा दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. २३ मार्चाला ९.३० वा. बोराळे गावातील छत्रपती चौकात उधारीने दिलेल्या शेतीच्या साहित्याचे पैसे फोनवर मागितल्याने वाद विवाद होवून आरोपीने चाकूने भोकसून खून केला होता. या घटनेचा तपास स.पोलिस निरीक्षक अंकुश वाघमोडे यांनी करून खुनात वापरलेले चाकूसारखे दिसणारे धारदार हत्यार जप्त केले होते. न्यायालयाने चार दिवसाची पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर चौदा दिवसाची न्यायालयीन कोठडी मंजूर केली. सरकार पक्षाच्या वतीने सरकारी वकील ॲड.अमोल क्षीरसागर यांनी तर आरोपीच्या वतीने ॲड.धनंजय हजारे यांनी काम पाहिले.

### पीएनजीकडून नववर्षानिमित्त खास कलेक्शन सादर

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

महाराष्ट्रातील सर्वात विश्वासार्ह ब्रँड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएनजी ज्वेलर्स ने नववर्षाच्या निमित्ताने आपले खास कलेक्शन सादर केले आहेत, ज्यात पोल्मी, प्रथा, कथा, सप्तम आणि इना या कलेक्शन्सचा समावेश आहे. गुढीपाडव्याच्यानिमित्ताने २४ मार्च ते ३० एप्रिल दरम्यान सर्व पीएनजी ज्वेलर्सच्या स्टोरमध्ये ग्राहकांसाठी आकर्षित सवलती दिल्या जाणार आहेत. गुढीपाडवा हा नवीन वर्षाची आणि समृद्धतेची सुरुवात मानला जातो. या शुभप्रसंगी पीएनजी ज्वेलर्सच्या मोहिमेत पारंपरिक आणि आधुनिक अशा दोन्ही प्रकारातील सोने,चांदी,हीरे,आणि प्लॅटिनमच्या दागिन्यांवर खास सवलती देण्यात आल्या आहेत. यंदाचा गुढीपाडवा सर्वांसाठी तेजस्वी आणि उत्साही असेल असा विश्वास, अशी पीएनजी ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष डॉ. सौरभ गाडगीळ यांनी व्यक्त केला.

### खुनाचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणात आरोपीस सत्र न्यायालयाकडून जामीन मंजूर

**बार्शी, दि. ३० मार्च-**

मोहोळ पोलीस ठाणे येथे दि. ३१ मे २०२५ रोजी घरगुती वादातून अनेक अन्सार शिंदे रा. वैराग व इतर दोघांनी मिळून फिर्यादी व फिर्यादीची आई त्यांना तलवार व काठीने मारहाण करुन जिवे मारण्याचा प्रयत्न करत जबर मारहाण केल्याने मोहोळ पोलिसांत गुन्हा दाखल होऊन आरोपींना पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी अनिल अन्सार शिंदे यांचा जामीन अर्ज सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी मंजूर केला आहे. अनिल शिंदे यांनी व इतर दोघांनी मिळून फिर्यादी व त्याची आई यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करत तलवार व काठीने मारहाण केल्याची फिर्याद पोलिसांत दिली होती. यात अनिल शिंदे यांनी मे. सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. या जामीन अर्जाचे सुनावनी त्यांचे विधीज्ञांमार्फत युक्तिवाद ग्राह्य धरत जिल्हा व सत्र न्यायाधीश सोलापूर यांनी सदरचा जामीन अर्ज मंजूर केला. याकामी अर्जदार आरोपीतर्फे ॲड. प्रशांत एडके व ॲड. सुहास कांबळे यांनी काम पाहिले.

## निधन वार्ता

### मारुती जगताप



**मंगळवेढा, दि. ३० मार्च-**

तुकाईनगरमधील व श्री संत दामाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मारूती एकनाथ जगताप (वय ७६) यांचे रविवार दि.३० मार्च रोजी दुपारी १ वाजता अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. रतनचंद शहा बँकेचे व्हाईस चेअरमन रामचंद्र जगताप यांचे ते बंधू तर माजी नगरसेवक अजित जगताप यांचे चुलते होत.

### शंकर वाघमोडे



**अक्कलकोट दि ३० मार्च**

समर्थ विहार, मैंदर्गी रोड येथील शंकर तुळजप्पा वाघमोडे (वय ७२ वर्षे) यांचे रविवारी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

### विठाबाई जमादार



सोलापूर, दि. ३० मार्च-

हालचिंचोळी (ता. अक्कलकोट) येथील विठाबाई शंकर जमादार (वय ८२) यांचे रविवारी (दि.३०) निधन झाले. त्यांची अंतयात्रा त्यांच्या निवासस्थानापासून सोमवारी (दि. ३१) सकाळी १० वाजता निघणार आहे. त्यांच्या मागे २ मुली, १ मुला व सून व नातवंडे असा परिवार आहे. मुख्याध्यापक अंबादास जमादार यांच्या त्या मातोश्री होत.

# शिधापत्रिका ईकेवायसीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

### जिल्ह्यातील अजून २६ टक्के ई-केवायसी पेंडिंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

राज्यात रेशनकार्ड धारकांना घरबसल्या ई-केवायसी करण्यासाठी केंद्र सरकारने 'मेरा ई-केवायसी ॲप' सुरू केले आहे. इतकेच नाही तर जिल्ह्यातील रास्त भाव धान्य दुकानदारही शिधापत्रिकाधारकांची ईकेवायसी मागे लागून करून घेत आहेत; तरीही राशन कार्डधारकांतून उत्साहाने हे ई-केवायसीचे काम होत नसल्याची खंत जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी व्यक्त केली. दरम्यान, आता शासन स्तरावरून ३० एप्रिलपर्यंत शिधापत्रिकाधारकांना ईकेवायसी करण्यासाठी मुदतवाढ दिली असून, आता ही शेवटचीच संधी असल्याचा इशाराही सरडे यांनी दिला आहे.



आजतागायत जिल्ह्यातील ११ तालुक्यातून अजून २६.२५ टक्के लोकांनी ई-केवायसी केली नाही आणि या नागरिकांनी एप्रिल एन्डपर्यंत ई-केवायसीकडे पाठ फिरविल्यास ३० एप्रिलनंतर त्यांचा धान्य पुरवठा बंद केला जाईल, असा गंभीर अन् शेवटचा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी आज (दि. ३०) दिला. राशन कार्डसाठी ई-केवायसी शासनाने मागील ६-७ महिन्यांपासून सुरू केली आहे. मध्यंतरी सर्व्हर डाऊनच्या अडचणीमुळे या मोहिमेला गती येत नव्हती. यामुळे शासनाच्यावतीने वरचेवर मुदतवाढ देण्यात आली. मागील मुदतीनंतर २८ फेब्रुवारी, ३१ मार्च आणि आता एप्रिल ३० पर्यंतपर्यंत म्हणजे ३ महिने मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे या महिन्यात कार्डधारकांनी ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. अनेक कार्डधारकांचे अंगठे ई-पॉस मशीनवर स्कॅन होत नव्हते; यामुळे आता या राशन कार्डधारकांचे ई-पॉस मशीनवर डोळे स्कॅन करून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करता येत आहे. यामुळे ज्या-त्या भागातील नागरिकांनी आपल्या जवळच्या राशन दुकानात जावून तत्काळ ई-केवायसी करावी, असेही त्यांनी आवाहन केले आहे.

> राज्य शासनाकडून वाढविण्यात आलेली ही एप्रिल एन्डची शेवटची मुदत असणार आहे. त्यानंतर ई-केवायसी करण्यात येणार नाही, असाही इशारा सरडे यांनी दिला आहे. अजून जिल्ह्यातील २६ टक्के नागरिकांची ई-केवायसी अपूर्ण आहे. ज्या कार्डधारकांचे ई-केवायसी पूर्ण झाले नाही. त्यांचे रेशन ३० एप्रिलनंतर बंद होणार आहे. याला जबाबदार कार्डधारकच राहणार आहेत.
>
> **- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर**

# बार्शीत युवासेनेतर्फे सीईटी, नीट सराव परीक्षा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३० मार्च-**

युवासेना आयोजित सीईटी, नीट सराव परीक्षेला बार्शी शहरांत व तालुक्यातील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद मिळाला. बार्शी शहरात दोन परीक्षा सेंटरवर २७४ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित होते. परीक्षा संपल्यानंतर सोल्यूशन सेट https://yuvasenacet.com या संकेतस्थळावरुन आपला निकाल विद्यार्थ्यांना पाहता आला. याच संकेतस्थळावर सराव परीक्षेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा संच ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

बारावीनंतर इंजिनीअरिंग, फार्मसी, लॉ व मेडिकल अभ्यासक्रमास प्रवेशासाठी सीईटी आणि नीट या प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. या परीक्षांबाबत विद्यार्थ्यांच्या मनात असलेली भीती दूर करण्यासाठी व त्यांना पेपर सोडवण्याचा अनुभव मिळण्यासाठी युवासेनेच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून बार्शीसारख्या ग्रामीण भागात ही युवासेनेच्यावतीने उपक्रम राबवण्यात आला. बार्शीमध्ये यंदाचे पहिले वर्ष होते. या सराव परीक्षेसाठी बार्शी तालुक्यात शिकणाऱ्या तसेच बार्शी तालुक्याच्या बाहेर शिकणाऱ्यां विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. तसेच परीक्षेस १३६ विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी झाली होती. तसेच काही विद्यार्थ्यांनी नोंदणी नसतानादेखील थेट परीक्षा केंद्रावर येऊन परीक्षा दिली. या उपक्रमाचे उद्घाटन डॉ. प्रा. शशिकांत गायकवाड, डॉ. सुचिता जवान, प्रा. पेटकर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच ॲड. उषा पवार, हेमंत रामगुडे, दीपक तिवाडी यांच्या उपस्थितीत परीक्षा घेण्यात आली. यावेळी स्वराज क्षीरसागर, पांडुरंग घोलप, कोकिळा जंगले, अर्जुन सोनवणे, दीपक कसबे, अजिंक्य बारंगुळे, रणजीत घुमरे, तृप्ती दिक्षीत, मैथिली मेमाणे, सोनल पाटील, सानिका लावंड उपस्थित होते. प्रस्ताविक पांडुरंग घोलप, आभार दिपक तिवाडी यांनी मानले.

# उत्तर तहसिलच्या मार्फत अकृषिक सनद देण्यासाठी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

जिल्हाधिकारी सोलापूर यांनी त्यांचेकडील दि. १७ मार्चच्या परिपत्रका नुसार महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४२ (ब) या नियमान्वये केलेल्या सुधारीत तरतुदीच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अकृषिक आकारणी व रुपांतरीत कर भरुन घेवून नियमानुसार संबधित खातेदारांना अकृषिक सनद देण्यात यावी, असे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने उत्तर सोलापूर तहसीलदारांनी अकृषिक सनद देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन केले आहे.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० दि. १५ एप्रिल २०१७ अन्वये कोणत्याही क्षेत्रामध्ये अंतिम विकास योजना प्रसिध्द केल्यावर, अशा ठिकाणी अनुज्ञेय असलेल्या वापरासाठी अशा जमिनीच्या वापराकरिता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ प्रमाणे, कोणतीही स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. अशा स्वरुपाची महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ (ब) ही सुधारणा करण्यात आलेली आहे. तसेच शासनाच्या दि. १३ एप्रिल २०२२ परिपत्रकान्वये महाराष्ट्र जमीन महसूल कलम ४२ ब मधील तरतुदीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना दिशानिर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने सदर प्रकरणी कार्यवाही चालू आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ ब नुसार अकृषिक सनद मिळणेकामी अर्जदार यांनी अर्ज व कागदपत्रे तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर येथे सादर करणे व चलन भरणेकामी नोटीस प्राप्त करून घेणे - दि.०१ एप्रिल २०२५ ते दि.०३ एप्रिल २०२५. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ ब नुसार नोटीस दिल्यापासून अकृषिक आकारणी करुन नोटीस दिलेनंतर संबधित खातेदारांनी ते दि.०५ एप्रिल २०२५ शासकीय खजिन्यात अकृषिक आकारणीची रक्कम जमा करून चलन पर्यंत जमा केलेबाबतची पोहोच तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर येथे सादर करणे.-नोटीस दिल्यापासून ते ३ एप्रिल २०२५ पर्यंत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ब नुसार अकृषिक सारा व रुपांतरीत कर शासन जमा करुन घेतलेनंतर शिबीर आयोजीत करुन विहीत नमून्यात सनद देणेबाबत कार्यवाही करणे- दि. ९ एप्रिल २०२५ वरील कार्यक्रमाप्रमाणे तहसिलदार उत्तर सोलापूर यांचेमार्फत सदर शिबिर आयोजीत केलेले आहे. तरी सदर शिबिराचा सर्व खातेदारांनी लाभ घ्यावा असे आवाहन उत्तर सोलापूरचे तहसिलदार यांचेमार्फत करण्यात येत आहे. यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे- अर्ज, चालू तारखेचा ७/१२ उतारा, खरेदीखत, इंडेक्स, झोन दाखला (तहसिल स्तरावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.), स्वयंघोषणापत्र (तहसिल कार्यालय येथे उपलब्ध करून दिले जाईल.)

# आदिनाथ कारखान्याच्या निवडणुकीतून बागल गटाची माघार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.३० मार्च-**

बागल गटाच्या राजकीय अस्तित्वाला खोडा घालण्यासाठी आजपर्यंत करमाळा तालुक्यातील विविध गटांनी आदिनाथ कारखान्याला टार्गेट केले त्यामुळे आदिनाथ सहकारी कारखाना व्यवस्थित चालू शकला नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता या कारखान्याच्या निवडणुकीतून आम्ही बागल गट माघार घेत आहोत. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरलेल्या सर्वांनी आपले उमेदवारी अर्ज येत्या दोन दिवसांत माघारी घेण्याचे आवाहन बागल गटाचे मार्गदर्शक व आदिनाथ कारखान्याचे प्रशासकीय संचालक विलासराव घुमरे यांनी केले.

बागल गटाच्या संपर्क कार्यालयात झालेल्या विचार विनिमय मेळाव्यामध्ये बागल गटाच्या नेत्या, भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्षा व साखर संघाच्या संचालिका रश्मी बागल व आदिनाथचे प्रशासकीय संचालक विलासराव घुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मकाई कारखान्याचे माजी चेअरमन व शिवसेना नेते दिग्विजय बागल यांच्या उपस्थितीत कारखाना निवडणुकीसाठी फॉर्म भरलेल्या इच्छुकांची बैठक झाली. यावेळी मार्केट कमिटीचे माजी चेअरमन प्रा. शिवाजीराव बंडगर, आदिनाथचे माजी चेअरमन धनंजय डोंगरे, कृ. उ. बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, सोमनाथ पोटे अंगद पाटील ,कल्याणराव सरडे, रणजीत शिंदे, अंगद पाटील, केरू गव्हाणे, ॲड. नानासाहेब शिंदे यांनी विचार मांडले.यावेळी आदिनाथ निवडणुकी संदर्भात निर्णय येण्याचे अधिकार रश्मी बागल व विलासराव घुमरे यांच्यावर सोपविण्यात आले. यावेळी दिग्विजय बागल यांनी आपल्या नेत्या रश्मीदीदी व मार्गदर्शक विलासराव घुमरे हे जो निर्णय घेतील, तो सर्वांनी मान्य करावा, असे आवाहन केले. या बैठकीत शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता आदिनाथ कारखान्याची निवडणूक बागल गट लढवणार नाही परंतु जो कुणी सत्तेवर येईल त्याला सर्वतोपरी मदत करेल असा एकमताने निर्णय घेण्यात आला.



# बार्शीत अग्निशमन वाहनाचा लोकार्पण सोहळा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३० मार्च-**

बार्शी नगरपरिषदेच्या अग्निशमन दलासाठी नवीन अत्याधुनिक वाहन दाखल झाले असून त्याचा लोकार्पण सोहळा आज नगरपरिषदेत पार पडला. मात्र, या सोहळ्यात प्रोटोकॉलचा गोंधळ दिसून आला. माजी आमदार राजेंद्र राऊत यांना तातडीने निघावे लागणार असल्याने त्यांच्या हस्ते प्रथम लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर खासदार ओमराजे निंबाळकर आणि आ. दिलीप सोपल यांच्या हस्ते अधिकृत लोकार्पण सोहळा पार पडला.

याप्रसंगी बोलताना आमदार दिलीप सोपल यांनी मिश्किल अंदाजात टिप्पणी करत, 'आता खऱ्या अर्थाने प्रोटोकॉलप्रमाणे लोकार्पण पूर्ण झाले, असे म्हटले. त्यामुळे या सोहळ्यात प्रोटोकॉलच्या पालनाचा मुद्दा चर्चेचा विषय ठरला. बार्शी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी यावेळी सांगितले की, हे वाहन मिळवण्यासाठी खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार दिलीप सोपल आणि माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी मोठा पाठपुरावा केला आहे. यामुळेच बार्शी शहराला हे अत्याधुनिक वाहन मिळू शकले. तसेच, जुन्या वाहनांच्या तुलनेत हे वाहन अधिक शक्तिशाली आणि प्रभावी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शहरात मागील काही दिवसांत आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. मात्र, नगरपरिषदेकडे अत्याधुनिक आणि शक्तिशाली अग्निशमन वाहन नव्हते. नव्या वाहनाच्या समावेशामुळे आता आपत्कालीन परिस्थितीला अधिक चांगल्या प्रकारे तोंड देता येणार आहे. यावेळी आ. दिलीप सोपल म्हणाले की, 'उन्हाळ्याच्या काळात आगीच्या घटनांमध्ये वाढ होते. मात्र, अशा दुर्घटना घडू नयेत यासाठी प्रत्येकाने आवश्यक ती काळजी घ्यावी. नव्या वाहनाचा योग्य आणि तातडीने उपयोग व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अखेरीस खासदार ओमराजे निंबाळकर यांनी नागरिकांना हिंदू नववर्ष गुढीपाडव्याच्या तसेच रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

> या सोहळ्यास खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार दिलीप सोपल, माजी आमदार राजेंद्र राऊत, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, माजी नगराध्यक्ष गणेश जाधव, मंगलताई शेळवणे, दगडू मांगडे, रमेश पाटील, उपनगराध्यक्ष कृष्णाराज बारबोले, माजी विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे तसेच अनेक माजी नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते. नव्या वाहनाच्या समावेशामुळे बार्शी शहराच्या आपत्कालीन व्यवस्थापनात मोठी सुधारणा होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# राजेराय मठात महाप्रसादासह इतर सोयीसुविधा मोफत

श्री स्वामी समर्थ महाराजानी सन १८७७ मध्ये राजेराय मठात विश्रांतीसाठी पादुकांची स्थापना केली. स्वामीच्या देखरेख खाली हा मठ उभा राहीला असून आज या मठालाच राजेराय मठ म्हणुन ओळखले जात आहे. श्री स्वामी समर्थाच्या वास्तव्याने पूनित झालेली अक्कलकोट या पावन नगरीत जगभरातील लाखो भाविक पर्यटक भेटी देतात. या भाविक पर्यटकांना राजेराय मठा कडून महाप्रसादसह इतर सोयी सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येत असल्याने अक्कलकोटच्या वैभवात भर पडली आहे.

देशातील विविध भागातून अक्कलकोट मध्ये आलेल्या भाविक भक्त तसेच ग्रामीण भागातून उपचारासाठी आलेल्या गरीब रुग्णांची व त्यांच्या नातेवाईक उपाशी पोटी राहू नये या उधार हेतूने प्रेरित होऊन राजेराय मठाकडून गेल्या आठ दहा वर्षांपासून सामाजिक बांधलकी म्हणुन मोफत अन्नदान वाटप करण्यात येत आहे.अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयासह शहरातील खासगी रुग्णालयातील रुग्ण आणि नातेवाईकांच्या गरजेनुसार जेवणाचा डबा पोहोचवून राजेराय मठा कडून आधार दिला जात आहे. सामाजिक बांधिलकी जपत गेल्या सात ते आठ वर्षांपासून मोफत भोजन देण्याचे महानकार्य सुरू आहे. धार्मिक कार्यासह सामाजिक कार्यातही मठ अग्रेसर आहे. मठातर्फे रोज अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांसाठी अन्नछत्र चालवले जात आहे. येथे गाभारा दर्शन,पादुका दर्शन, ध्यान मंदिर,भक्त निवसाची सोय आहे.

राजेराय मठ नेहमी धार्मिक कार्यासह सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातही अग्रेसर राहिले आहे. ग्रामीण भागातील मुलांसाठी वसतिगृह अन्नदानासह शिक्षण कार्यातही सेवा बजावत आहे.स्थापनेपासून धार्मिक सेवाचा वारसा मठाने जपला आहे. मठाकडून दररोज ग्रामीण रुग्णालयातील तसेच खासगी रुग्णालयातील रूग्णांचा आकड़ा रूग्णालयातून घेतला जातो. त्यानुसार रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना डब्बा पोहोच केला जातो. शिवाय ज्यांना गरज असल्यास रुग्णांचे नातेवाईक मठात जाऊन डब्बा घेऊन येतात. रुग्ण व भाविकांना देण्यात येणाऱ्या सेवेसाठी राजेराय मठाचे अध्यक्ष शरद फुटाणे, उपाध्यक्ष विकास दोडके, सचिव डॉ. किसन झिपरे, विश्वस्त विजय गाजूल, ॲड. अनिल मंगरूळे, दत्तात्रय मोरे आदी जातीने लक्ष देत असतात.




**स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन विशेष**

> ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना डबे पुरवण्यासाठी एक सेवेकरी नेमलेला आहे. रोज रुग्णालयाकडून रुग्णाचा आकड़ा कळवला जातो. त्याप्रमाणे मोफत डबा देण्यार येतो. मठातर्फे रोज दोन वेळेस माहाप्रसाद वाटप केले जाते. याशिवाय भाविकांसाठी निवासाची उत्तम सोयही केली आहे. ज्या स्वामी भक्तांना अन्नदान सेवा करावयाची आहे, ८० जी आयकर कलमात सुट आहे.यथाशक्ती देणगी अथवा धान्य देणगीसाठी मठाच्या कार्यालयात संपर्क साधावा. अथवा ऑनलाईन अन्नदानसाठी देणगी देऊ शकता.
>
> **- डॉ. किसन झिपरे सचिव राजेराय मठ अक्कलकोट**

> ग्रामीण भागातून शिक्षणासाठी अक्कलकोट येथे येणाऱ्या मुलांसाठी मठातर्फे मोफत वसतिगृह चालविले जात आहे. या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, निवास, जेवण, शालेय साहित्य पुरविले जाते. त्यासोबतच या विद्यार्थ्यांसाठी ई लायब्ररी सुरू केली आहे. नुकतेच विद्यार्थ्यांसाठी लेटेस्ट लॅपटॉप घेतले आहेत. यामाध्यमातून या विद्याध्यांना विविध ई पुस्तके वाचता येत आहेत. अभ्यासासोबतच शरीर मजबुत व निरोगी बनण्यासाठी खेळाचे साहित्य पुरवले आहे. तसेच आरोग्य शिबिर व इतर सेवाही मठातर्फे दिली जात आहे.
>
> **- विकास दोडके, उपाध्यक्ष राजेराय मठ अक्कलकोट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



सोलापूर : चैत्र पाडवानिमित्त जुळे सोलापुरात हिंदू नववर्ष शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली.

# गुढीपाडवानिमित्त मंद्रूपमध्ये खरेदीचा उत्साह

## सोने, इलेक्ट्रॉनिक खरेदीला ग्राहकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि. ३० मार्च-**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडवा सणाच्या निमित्ताने मंद्रूप येथे खरेदीचा उत्साह दिसून आला. सोने, दुचाकी, चारचाकी वाहनांसह इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उत्सुकता दाखवली. सोन्याच्या दरात चढ-उतार असतानाही अनेकांनी गुंतवणुकीसाठी तसेच विवाह सोहळ्यांच्या तयारीसाठी सोने खरेदी केले.

गुढीपाडवा हा वाहन खरेदीसाठीही शुभ मुहूर्त मानला जातो. यंदा वाहन खरेदीलाही चांगला प्रतिसाद मिळाला. दुचाकी आणि चारचाकी गाड्यांच्या शोरूममध्ये ग्राहकांची गर्दी दिसून आली. विशेषतः इलेक्ट्रिक गाड्यांना नागरिकांनी अधिक पसंती दिली. सध्या इंधन दरवाढ आणि पर्यावरणपूरक वाहतुकीचा विचार करता इलेक्ट्रिक वाहनांना विशेष मागणी आहे. मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सच्या खरेदीसाठी देखील चांगली मागणी पाहायला मिळाली. नवीन स्मार्टफोन, टीव्ही, लॅपटॉप यांसाठी दुकाने गजबजली होती. गावातील प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स स्टोअर्समध्ये ग्राहकांनी मोठी गर्दी केली होती.



> गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. स्मार्टफोन, लॅपटॉप आणि टीव्ही यांची विक्री चांगल्या प्रमाणात झाली. आकर्षक सवलती जाहीर करण्यात आल्याने ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केली.
>
> **- शिवराज कालदे, इलेक्ट्रॉनिक वस्तू विक्रेते**

विशेषत: सणासुदीच्या निमित्ताने आकर्षक सवलती जाहीर करण्यात आल्याने ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केली. गुढीपाडवा हा नवा संकल्प करण्याचा दिवस मानला जातो. त्यामुळे नवीन वाहन, सोन्या-चांदीसह इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या खरेदीस नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर पसंती दिली. व्यापाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# पच्चडा प्राशन, पंचांग श्रवणाने गुढीपाडवा साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

गुढीपाडवा सणाला तेलुगु भाषिक उगादी पंडुगा असे म्हणतात. यादिवशी पच्चडा अर्थात गोलाना प्राशन व नव्या पंचांगाचे सामुदायिकरित्या श्रवण करण्याची प्रथा आहे. त्यानुसार रविवारी (दि.३०) पूर्वभागातील घरोघरी पच्चडा बनविण्यात आला. श्री मार्कंडेय मंदिरात सामुदायिक पंचांग श्रवण करुन गुढीपाडवा साजरी करण्यात आली.

पच्चडासाठी बाजारातून नवीन माठ आणून ते पाण्याने स्वच्छ धुवुन घेण्यात आले. एका पत्रावळीवर तिची स्थापना करुन त्यात चिंच व गुळाचे मिश्रण तयार करून कैरी, खोबरे, गाजराचा किस, कडुलिंबाची पुले, ओवा, पुटाणे, खसखस, बडीशेप, द्राक्षे, कलिंगड, टरबूज आदीद्वारे पच्चडा बनविण्यात आले. सर्व मिश्रणासह माठाला गोलाकार हळद-कुंकु लावून, साखर हार व कडुलिंबाच्या पानाचे हार घालून विधीवत पूजा करण्यात आली. माठासमोर पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्यात आला. सिध्देश्वर पेठेतील मार्कंडेय मंदिर, भावनाऋषी पेठेतील श्री पंचमुखी हनुमान मंदिर, दाजी पेठेतील पूर्वविभाग श्री राम मंदिर, वालचंद कॉलेज रोडवरील श्रीकृष्ण मंदिर, जुना विडी घरकुल येथील श्री पंचमुर्ती देवस्थानम्, घोंगडे वस्ती भाजी मंडई येथील श्री भवानी मंदिर यांसह पूर्वभागातील विविध मंदिरात सामुहिक पंचांग श्रवण करण्यात आले.



> **शीतलता, प्रसन्नता लाभते**
>
> 'पच्चडा' आरोग्यवर्धक असते. पच्चडा प्राशनाने पोटातील कृमी, किटके नष्ट होतात. उन्हाळ्याच्या दिवसात शरिराला शीतलता व मनाला प्रसन्नता लाभते, असा विज्ञानवादी विचारही मांडण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त




### एनबीके बीवायएफ फॅन्सच्या वतीने मोफत पाणपोईचा शुभारंभ

**सोलापूर दि. ३१ मार्च-**

एनबीके बीवायएफ फॅन्सच्या वतीने सतत शहरात सामाजिक, समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात यामध्ये सद्या उन्हाळ्याचे दिवस सुरु झाले आहेत आणि सद्या उन्हाचा पहारा खूपच वाढयल्या मुळे सर्वसामान्य नागरिकांना याचा फायदा व्हावा असा उध्देश एनबीके बीवायएफ फॅन्स क्लबचा असतो याच अनुषंगाने सोलापूर शहरात नागरिकांना कडक उन्हात स्वच्छ व थंडगार पाणी पिण्यास मिळावे यासाठी दरवर्षी मोफत पाणपोईचा उपक्रम राबविण्यात येतो त्याच अनुषंगाने याही वर्षी एनबीके बीवायएफ फॅन्स क्लबच्या वतीने मोफत पाणपोई सुरू करण्यात आली असून याचा शुभारंभ आज रविवार रोजी उपस्थित प्रा. विठ्ठल वंगा, माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, साईबाबा मंदिरचे अध्यक्ष बाबू देशमुख यांच्या हस्ते व एनबीके बीवायएफचे पदाधिकारी अध्यक्ष नरसिंह कनकी, सचिव श्रीनिवास कट्टा, श्रीनिवास नंदाल, नागभुषण वंगारी, रमेश महिंद्रकर, रायेशम रापेल्ली,चंद्रकांत तुलशीगार, गिरीश अन्नलदास, गोविंद बुगडे, अंबादास मिठ्ठा, नागनाथ बंडा, अंबादास चाटला, अंबादास नागुल, गोपी मिठ्ठा, गणेश जल्ला, देविदास मंगलपल्ली, रमेश सिद्राल, नरेंद्र गुंडेटी, बालाजी कोडम, प्रभाकर इप्पलपल्ली, श्रीनिवास बिंगी यांच्या उपस्थितीत करण्यात आला व सूत्रसंचालन दयानंद आल्लोळी यांनी केले.

### बुधवारी मोफत महाआरोग्य सर्व रोग निदान, रक्तदान शिबीर २ एप्रिलला

**सोलापूर दि. ३१ मार्च-**

लोकनेते स्व. ब्रह्मानंद मोरे यांच्या २६व्या पुण्यस्मरणानिमित्त लोकनेते स्व. ब्रह्मानंद मोरे समाजसेवा प्रतिष्ठानच्या वतीने बुधवार २ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता मोफत महाआरोग्य सर्व रोग निदान शिबिर आणि रक्तदान शिबिराचे आयोजन केल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी दिली. श्रीश्रीश्री जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या सानिध्यात अक्कलकोट रोडवरील श्री ब्रहन्मठ होटगी शिक्षण संकुलातील एसव्हीसीएस प्रशालेत हे महाआरोग्य शिबीर होईल. आ. विजयकुमार देशमुख, आ. हरिष पिंपळे, आ. सुहास बाबर आदी मान्यवरांची उपस्थिती असेल. शिबिरात ५०० बाटल्या रक्त संकलन व २०० मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. या पत्रकार परिषदेस माजी नगरसेवक शिवानंद पाटील, शांतय्या स्वामी, संजय टोपे आदी उपस्थित होते.




सोलापूर : शहरातील विविध भागात रमजान ईदच्या पूर्वसंध्येला दूध वाटप केंद्र उभारण्यात आले. रविवार रात्री सात रस्ता परिसरात टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)

# सोलापुरातील पाच प्रमुख ईदगाह मैदानांवर आज 'ईद-उल-फित्र'ची नमाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च -**

आज सोमवार, दि. ३१ मार्च रोजी सर्व मुस्लीम बांधवांकडून 'ईद-उल-फित्र' (रमजान) ची नमाज अदा करणार आहेत. त्यासाठी प्रशासनाकडून नमाजसाठी शहरातील पाचही मैदानांची साफसफाई करण्यात आली आहे. होटगी रोडवरील आलमगीर ईदगाह मैदान सकाळी ९ वाजता, पानगल हायस्कूलच्या शाही आलमगीर ईदगाह सकाळी ९ वाजता, जुनी मिल कंपाऊंड सूपर मार्केट-आदिलशाह ईदगाह सकाळी ९.३० वाजता तर रंगभवन येथील अहले हदीस ईदगाह मैदानावर सकाळी ७.३० वाजता तसेच आसार मैदान गोल्ड फिंच पेठ ईदगाह मैदानावर सकाळी १०.३० वाजता नमाज पठणाची वेळ ठेवण्यात आलेली आहे.



# निराळे वस्तीत सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

निराळे वस्ती येथील महर्षी मातंगऋषी विठ्ठल मंदिर जीर्णोध्दार व कळसारोहण सोहळ्यानिमित्तच्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज (दि.३० मार्च) अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

दि. २६ मार्च रोजी सकाळी श्री विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज, मारुती मूर्ती, महादेव पिंड व नंदी या मूर्तीची भव्य मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून हरिदास खंडाळकर यांच्या हस्ते पूजन करुन काढण्यात आली. त्यांच्याच हस्ते मूर्ती प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. कळसारोहण सोहळा मोहननाथ कपलान महाराज यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी आमदार विजयकुमार देशमुख, सुभाष देशमुख, माजी महापौर मनोहर सपाटे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे, उद्योजक सुधीर थोबडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या सप्ताहात दररोज काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ, प्रवचन व कीर्तन आणि हरिजागराचे कार्यक्रम झाले. यामध्ये ह.भ.प. संतोष महाराज नवले (देगाव), ह.भ.प. दत्तात्रय महाराज शिंदे (निराळे वस्ती), ह.भ.प. श्याम महाराज जोशी (कासेगावकर), लक्ष्मण चव्हाण महाराज (सोलापूर) यांची कीर्तन सेवा झाली. गुढीपाडव्यादिवशी ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. या नाम सप्ताहामध्ये रेणूका शिंदे व सहकारी यांनी पारायण व्यासपीठ चालवले. विष्णू आवताडे, दशरथ महाराज, तानाजी लोहार, बापू डावकरे, वासुदेव जांभळे, नागेश शिंदे, संजय केसरे, पांडूरंग जांभळे, संभाजी घुले, प्रतिक कारंडे, आदिनाथ जावळे, यांनी मृदुंगाचार्य म्हणून काम केले. तर त्रिंबक शिंदे, अप्पा माने, विष्णू आवताडे, मल्हारी देढे, विठ्ठल ताकभाते. विठ्ठल वाघमारे यांनी गायनाचे काम पाहिले.

अरूण लोंढे व कुमार कदम यांनी चापदारसेवा केली. तानाजी लोंढे, बब्रुवान कांबळे व पुणाजी बुराडे यांनी विणेकरी सेवा केली. महाप्रसादाची पंगत हभप तानाजी लोंढे व पिंपरी चिंचवडचे माजी नगरसेवक शशिकिरण गवळी यांनी दिली. केशव लोंढे यांनी परिश्रम घेतले.

# रासायनिक खतांना लिंकींग खत सक्तीचे, वाहतूक खर्च शेतकऱ्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न

## प्रशासनाकडून लिंकींगवर नाही कारवाई

**तभा वृत्तसेवा। अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

केंद्र सरकारने रासायनिक खतांचा काळाबाजार टाळण्यासाठी शेतकऱ्यांसाठी अनुदान योजना सुरू केली. तसेच शेतकऱ्यांना खत घेताना त्रास होऊ नये, म्हणून विक्री पध्दतीत बदल करून आधार कार्ड धारकांनाच खत विक्री करण्याचे आदेश दिले.

रासायनिक खतांचा काळाबाजार व लिंकिंग रोखण्यासाठी नवनवीन कायदे करण्यात अले. मात्र, खत कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे या कायद्यांची अंमलबजावणी होत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावे लागत आहे. शिवाय या कंपन्यांवर कारवाई करताना प्रशासनाला अनेक तांत्रिक अडचणी येत असल्याने खत कंपन्यांचे चांगभलं सुरु आहे. महान्याभरापूर्वी कृषी विभागाकडून ३१ दुकानांवर कारवाई करण्यात आले असले तरी त्यामध्ये खत लिंकींग संबंधित एकाही दुकानांवर कारवाई करण्यात आली नाही.

सध्या उन्हाळ्यात ऊस लागवड असलेल्या क्षेत्राची मशागत करून खतमात्रा देण्यात येत आहे. बागायतदार शेतकऱ्यांना रासायनिक खत आवश्यक असल्याने युरिया, डीएपी व १०:२६:२६ सारख्या सर्वाधिक मागणी असलेल्या खतांना अधिक दर व लिंकिंग खत सक्तीचे असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावे लागत आहे . रासायनिक खत दुकानदार व शेतकरी खतांच्या वाढीव दर व लिंकिंग पद्धतीमुळे हैराण आहेत. त्यातच शासनाकडून लिंकिंग खत विक्री करू नये तसेच विक्री दरापेक्षा अधिक रक्कम घेऊ नये असे सांगण्यात येत असले तरी कंपन्यांकडून खतपुरवठा करताना वाहतूक खर्च दुकानदारांकडून घेण्यात येत आहे. त्यामुळे दुकानदारही विक्री किमतीपेक्षा ७० ते १०० रुपये अधिक रक्कम घेऊन खत विक्री करीत आहेत. त्यामुळे शेतकरी व दुकानदार यांच्यामध्ये अनेक वेळा वाद निर्माण होत आहे. याबाबत प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर वरिष्ठ कार्यालयाकडे कारवाईची शिफारस करण्यात आल्याचे सांगण्यात येते. सध्या अनेक खतांची मागणी कमी असतानाही खत विकत घेताना शेतकऱ्यांची आर्थिक लूट करण्यात येत आहे. प्रशासन अधिकारी कंपन्यांवर कारवाईचे कारण सांगत दुकान तपासणी करीत आहेत.

मात्र शेतकऱ्यांकडून युरिया, डीएपी यासारख्या अधिक मागणी असणाऱ्या खतांना प्रत्येक कंपनीकडून १०० रुपये वाहतूक खर्च तसेच प्रत्येक पिशवी बरोबर ३०० ते ५०० रुपये किमतीचे लिंकिंग खत विक्री करण्यात येत आहे. त्यामुळे दुकानदार लिंकिंग खत शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. उसासाठी व इतर पिकांच्या वाढीसाठी रासायनिक खतच मिळत नसल्यामुळे शेतकरी नाईलाजस्तव वाढीव दराने खत खरेदी करीत आहेत. गरज नसतानाही लिंकिंगमुळे इतर खत विकत घेण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

> **कृषी विभागाकडून टाळाटाळ**
>
> ऊस व इतर पिकांसाठी रासायनिक खत खरेदी करताना खत दुकानदार वाहतूक खर्च व लिंकींग खतामुळे अधिक दराने खत देत आहेत. याबाबत प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर वरिष्ठ पातळीवरून खत कंपन्यांवर कारवाई होते. आमच्याकडून कंपनीविरोधात कारवाई शिफारस करण्यात येते असे सांगितले जाते. कृषी विभागाकडे लिंकींगबाबत तक्रार केल्यानंतर कारवाईस टाळाटाळ करण्यात येते.
>
> **- सुरेश मेंडगुदले, शेतकरी, मंद्रुप**

> **कंपन्यांविरोधात कारवाईची शिफारस**
>
> दुकानदारांच्या खतविक्री करताना वाहतूक खर्च व लिंकींग खताबद्दल शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी येत आहेत. शेतकऱ्यांनी संबंधित दुकानदार व कंपनीविरोधात लेखी तक्रार केल्यास कारवाई करण्यात येईल. मात्र शेतकऱ्यांकडून तक्रार न करता तोंडी सांगण्यात येत असल्यामुळे कारवाईस अडचण येत आहे.
>
> **- हरीदास हावळे,**
> **जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परीषद सोलापूर**

> खत कंपनी वाहतुक खर्च व लिंकींग खत विक्री सक्तीचे केल्याने दुकानदारांना विक्री मूल्यापेक्षा अधिक दराने खतविक्री करावे लागते. त्यामुळे दुकानदार व शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण होत आहे. प्रशासनाने वाहतूक खर्च व लिंकींग पध्दत बंद करण्यासाठी कंपन्यांवर कारवाई करावे. कृषी विभागाकडून कंपन्यांवर कारवाईची अपेक्षा आहे.
>
> **- हणमंत कस्तुरे, तालुका अध्यक्ष,**
> **खत दुकानदार संघटना, दक्षिण सोलापूर**

> **युरियाला वाहतूक खर्च व लिंकींग अधिक**
>
> ऊस व इतर पिकांच्या वाढीसाठी शेतकऱ्यांकडून युरीयाला अधिक मागणी आहे. त्यामुळे कंपनी दुकानदारांकडून वाहतुक खर्चासह २२५ रूपये किंमतीचे नॅनो युरीया सक्तीने विक्री करीत आहे. त्यामुळे दुकानदार २६६ रूपये किंमतीची युरीया वाहतुक खर्च ३५ रूपये असे ३०० रूपयेने विक्री करीत आहेत.

> **लिंकींग खतामुळे दुकानदार वैतागले**
>
> खत कंपन्या पंढरपूर, सांगली, कूर्डूवाडी याठिकाणाहून युरीया पुरवठा करतात. येथून युरीया आणण्यासाठी दुकानदारांना वाहतूक खर्च सोसावे लागते. त्यामुळे वाहतुक खर्च लागून आलेले युरीयासह इतर खत विक्रीदरापेक्षा अधिक दराने विक्री करावे लागते. शिवाय लिंकींग खत सक्तीचे असल्याने दुकानदार वैतागले आहेत. यामुळे कंपन्यांच चांगभलं सुरू आहे.
>
> **- धनेश कडते, दुकानदार, कंदलगाव**

> बाजारात अधिक मागणी असणाऱ्या बियाणे व औषधांसाठीही कंपनीकडून लिंकींग सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात आर्थिक लूट होत आहे. दुकानदारांनी तक्रार केल्यास त्यांना खत, बियाणे व औषधे मिळणार नाहीत, असा इशारा कंपनींकडून देण्यात आल्याचे एका दुकानदारांनी सांगितले.

> **या खतांबरोबर लिंकींग खतविक्री**
>
> युरीया, डीएपी, १०:२६:२६, डीरी, २०:२०:०, १९:१९:०, २४:२४:०, १८:१८:०, या मागणी असणाऱ्या खतांबरोबर प्रती पिशवीबरोबर ३०० रूपयांपासून ५०० रूपयांपर्यंत इतर लिंकींग खत विक्री करण्यात येत आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अनुभव प्रतिष्ठानतर्फे पुरणपोळी, पाणी बॉटल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

अनुभव प्रतिष्ठान (ट्रस्ट) यांच्या वतीने हिंदूनववर्ष व गुढीपाडवा निमित्ताने आदी जांबमुनी शाळा मैदान जय मल्हार नगर, बाळे येथे गरजू गरीब आणि बेघर ९० मुलांना पुरणपोळी व पाणी बॉटल वाटप करण्यात आले आणि त्या मुलांना सोबत गुढीपाडवा देखील साजरा करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रेरणा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रमिला उबाळे, वेंकीज इंडिया लिमिटेडचे मॅनेजर सुदर्शन पाटील, सामाजिक



कार्यकर्ते दीपक करकी, डॉ. सौम्या नरोणे, संगीता नागणसुरे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश कालदीप, संतोष शिवशिंपी,गणेश येळमेली, शिवानंद नागणसुरे, शिवानंद भाईकट्टी, महेश भाईकट्टी, चेतन बुऱ्हाणपूरे, प्रसाद कालदीप, सावनकुमार नरोणे, संगमेश्वर हलकट्टी, शंकर तालिकोटी,धनंजय ममदापुरे, कार्तिक तालिकोटी आदी युवकांनी परिश्रम घेतले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

# पाडव्यानिमित्त सोलापूरकरांनी उभारली खरेदीची गुढी!

## सराफ बाजारात सुवर्ण खरेदी

● सोन्याच्या नक्षीदार दागिन्यांच्या खरेदीसाठी महिलांची गर्दी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

गुढीपाडव्या निमित्त सोन्याची लयलूट करण्यासाठी ग्राहकांची सराफा बाजारात गर्दी दिसून आली. हिंदू धर्मातील असणाऱ्या प्रमुख गुढीपाडव्या निमित्ताने शहरातील सराफा बाजारपेठांमध्ये आकर्षक नक्षीदार सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीस महिलांची हजेरी होती.

हिंदू धर्मातील साडेतीन शुभ मुहूर्तापैकी एक असणाऱ्या गुढीपाडव्या निमित्त सोने खरेदीचा शुभ मुहूर्त आणि योग असतो. त्यामुळे या दिवशी सोने खरेदी करण्याची परंपरा कायम आहे. त्याच अनुषंगाने शहरातील विविध सराफा पेढ्यांवर आज अबालवृद्ध ग्राहकांनी गर्दी केल्याचे



चित्र दिसून आले. दीपावली पाडव्या दिवशी २४ कॅरेट शुद्ध सोन्याचा भाव जी.एस. टी सहित ९२ हजार रू प्रती १० ग्रॅम इतका होता.

तसेच २२ कॅरेट सोन्याचा दर हा ८२ हजार ४०० तर चांदी १ लाख २५० रु.किलो याप्रमाणे होती. दरम्यान आंतरराष्ट्रीय स्तरावर अस्थिर वातावरण, युद्धजन्य परिस्थिती, तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सोन्याची वाढती मागणी याचा सोन्याच्या खरेदी-विक्रीवर परिणाम होत आहे. त्यामुळे सोन्याच्या दारात गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

**साडेतीन शुभ मुहूर्त साधला :** गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सोलापूर शहरातील विविध सराफ पेढ्यांवर सोने खरेदीची रेलचेल होती. यावेळी आकर्षक असे नक्षीकाम केलेले दागिने घेण्यासाठी ग्राहकांची विशेषतः महिलांची गर्दी होती. त्याच पद्धतीने आकर्षक असे नेकलेस घेण्यासाठी देखील पुढाकार होता. आगामी काळात सोन्याचे दर आणखीन वाढतील असे अंदाज वर्तवण्यात आल्यानंतर सोने खरेदीला वाव मिळत आहे.

**- अविनाश पंडित, सराफ व्यापारी.**

**सोन्याच्या दरात दिवसेंदिवस वाढ :** सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीस सराफा बाजारात आलो होतो. सोन्याचे दर वरचेवर वाढत आहे. आता सुद्धा सोन्याच्या दरात वाढ झाली आहे. दर वधारले आहेत.

**- शैलजा मोरे, ग्राहक.**

## इलेक्ट्रिक दुचाकी वाहनांना मागणी

● इलेक्ट्रिक स्कूटरकडे ग्राहकांचा कल; स्कूटरल केंद्र, राज्य सरकारची सबसिडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

सोलापूर येथील वाहन बाजारपेठेत गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर दुचाकी व चारचाकी वाहनाला मागणी वाढली आहे. पेटोलचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने शेकडो ग्राहक इलेक्ट्रिक म्हणजेच इ.व्ही तसेच सीएनजी बाईक्स घेण्याकडे रुची दाखवित आहेत. ग्राहकांचा वाढता कल पाहून आघाडीच्या सर्व दुचाकी वाहन कंपन्यांनी इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक स्कूटर, मोटारसायकल निर्मितीत वाढ करण्यास सुरुवात केली आहे. त्याच पद्धतीने इलेक्ट्रिक कारची निर्मिती सुद्धा वाढली असून ग्राहकांचा कल या वाहनाच्या खरेदीकडे वाढला आहे.

दरम्यान, बाजारात बजाज, हिरो, सुझुकी, होंडा या अग्रगण्य कंपन्यांच्या इलेक्ट्रॉनिक स्कूटर आधीच रस्त्यावर धावताना दिसत आहेत. बजाज चेतक, आयक्यूब, अथर, टेस्ला, एकर,विदा आदी कंपन्यांच्या इलेक्ट्रॉनिक स्कूटर रस्त्यावर धावताना दिसत आहेत, चेतक या स्कूटरला सर्वाधिक मागणी आहे, दीड लाख रुपयांना ही गाडी मिळत असून तीस हजार रुपयांची सबसिडी असल्याने उच्च मध्यमवर्गीय लोक, महिला, महाविद्यालयीन युवती या वाहनास सर्वाधिक पसंती देत आहेत. पाडव्याच्या मुहूर्तावर इलेक्ट्रॉनिक स्कूटर खरेदीसाठी शेकडोंच्या संख्येत बुकिंग झाले आहे. इलेक्ट्रिक स्कूटरला आरटीओ टॅक्स नाही, वीस हजार रुपये जीएसटी टॅक्स नसल्याने व केंद्र आणि राज्य सरकारची सबसिडी असल्याने ५० हजार रुपयांची बचत होत असून पाच वर्षांची वॉरंटी आहे. रोड साइड असिस्टंट सर्व्हिस असल्याने गाडी रस्त्यावर बिघडल्यास कंपनी स्वखर्चाने घेऊन जाते. इ.व्ही वाहनांना ऑईल बदली, क्लच प्लेट, इंजिन दुरुस्ती अशी कामे करावी लागत नाहीत, एक फॅमिली वाहन म्हणून सर्वांगाने परिपूर्ण असल्याने बदलत्या युगात इ व्ही स्कूटर ग्राहकात लोकप्रिय होत आहेत. गुढीपाडव्यानिमित्त खरेदी केलेल्या कार आणि दुचाकींची डिलिव्हरी मोठ्या उत्साहीपूर्ण वातावरणात करण्यात आली. ढोल ताशांच्या गजरात आणि महाराष्ट्रीयन पद्धतीने फेटा बांधून ग्राहकांना दुचाकी आणि चार चाकी सुपूर्द करण्यात आल्या.



**इलेक्ट्रिक स्कूटरमुळे ९० टक्के पेट्रोलची बचत**




इलेक्ट्रिक स्कूटर म्हणजेच ई.व्ही स्कूटर घेण्याकडे ग्राहकांचा कल वाढत आहे. आजच्या पाडवा शुभमुहूर्तावर इलेक्ट्रिक आथर स्कूटरचे बुकिंग झाले. शहरात मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक स्कूटर रस्त्यावर धावताना दिसत आहेत. ९० टक्के पेट्रोलची बचत व कुटुंबातील सर्वांना सहज वापरता येत असल्याने प्रतिसाद वाढत आहे. त्याच पद्धतीने कारची देखील विक्री वाढलेली आहे. मारुती सुझुकी कंपनीच्या विविध ब्रॅंडेडकारांना मागणी आहे. त्याच पद्धतीने नेक्सा या उच्च प्रतीच्या कारांना मागणी वाढत आहे.

**- घनश्याम चव्हाण,** संचालक चव्हाण मोटर्स

**मोबाईल फोन, एअर बड्स, स्मार्ट वॉच घेण्याकडे युवकांचा ओढा**

साडेतीन शुभ मुहूर्त असणाऱ्या गुढी पाडव्यानिमित्त नवनवीन पिक्चर्स असलेले मोबाईल फोन्स आणि स्मार्टवॉच घेण्यासाठी युवकांची मोठी गर्दी शोरूममध्ये दिसून आली. अनेक नामांकित कंपन्यांच्या स्मार्ट वॉचेस तसेच एअर बड्स यांच्यावर डिस्काउंट ऑफर देण्यात आल्याने या इलेक्ट्रॉनिक वस्तूकडे कल वाढला होता.

**मोबाईलसह होम अप्लायन्सेन्स शोरुममध्ये ग्राहकांची गर्दी ! :** येथील बाजारपेठेत मोबाईल तसेच होम अप्लायन्सेन्स विविध वस्तू घेण्यासाठी आबालवृद्ध ग्राहकांची रेलचेल दिसून आली. गुढी पाडव्याच्या आकर्षक सवलतीमुळे बाजारपेठेत ग्राहकांचा सकाळपासून ओढा होता. ब्रॅंडेड होम अप्लायन्सेस घेण्यासाठी तसेच अँड्रॉइड मोबाईल फोन्स खरेदीसाठी तरुण वर्ग तसेच महिलांची मोठी मांदियाळी शोरूम्समध्ये दिसून आली. गुढी पाडव्यानिमित्त, सालाबाद प्रमाणे या वर्षी देखील शहरातील नवीपेठसह विविध बाजारपेठात खरेदीसाठी ग्राहकांची रेलचेल होती. विविध वस्तूंच्या खरेदीवर डिस्काउंट ऑफर तसेच आकर्षक भेटवस्तू देण्यात येत असल्याने ग्राहकांचा ओढा कंपनीकडे दिसून आला. होम अप्लायन्स वस्तूच्या खरेदीत मोठी उलाढाल दिसून आली. वॉशिंग मशीन, रेफ्रिजरेटर, एअर कंडिशन, मायक्रोव्होव ओवन, तसेच एलईडी स्क्रीन घेण्यासाठी ग्राहक शोरूममध्ये दाखल झाले होते.



**सोलापूर : मांगल्याची गुढी उभारून सुहासिनी महिलांनी अभिवादन केले. यावेळी अदिती प्रधाने, प्राजक्ता प्रधाने, सुनीता प्रधाने, रूपाली प्रधाने, वैष्णवी, रुद्राणी, ऐश्वर्या, आशिष, रितेश, विश्मय व प्रधाने परिवार.**

## गुढीपाडव्यानिमित्त विठ्ठल-रुक्मिणी मातेस अलंकार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

साडेतीन मुहुर्तापैकी एक आणि नववर्षाचा पहिला दिवस म्हणजे गुढीपाडवा, त्यानिमित्ताने श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस दुपारच्या पोषाखावेळी अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोने पगडी, कौस्तुभ मणी, हि-याचा कंगन जोड, दंडपेट्या जोड मोठा, नाम निळाचा, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, लहान शिरपेच, नवरत्नाचा हार, तोडे जोड, तुळशीची माळ, मत्स्य जोड, पितांबर व ठुशी तसेच श्री रूक्मिणीमातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळ, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, लक्ष्मीहार, सरी व कंबरपट्टा



इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले. याशिवाय, श्री विठ्ठलास रेशमी सोहळे - अंगी व श्री रूक्मिणीमातेस नऊवारी रेशमी साडीचा पोषाख करण्यात आला आहे. त्यामुळे श्रींचे रूप अधिकच खुलून दिसत आहे. श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे हे मनमोहक रूप पाहण्यासाठी व दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.





# हिंदू नववर्ष शोभायात्रा उत्साहात; भगव्या रंगाने रंगले समाजबांधव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

कृष्णलल्ला हम आएंगे, मंदिर वहीं बनाएंगे, जय भवानी जय शिवराय, भारतमाता की जय, वंदे मातरम अशा घोषणा देत, भगवे ध्वज, फेट्यांसह ढोल ताशांचा गजर करीत हिंदू नववर्षानिमित्त शहरातून शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली. शहरात सर्वत्र घरांवर, दुचाकींवर भगवे ध्वज लावण्यात आल्याने शहर भगव्या रंगात रंगून गेले होते.

विजयी चौकात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून शोभायात्रेस प्रारंभ झाला. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, संस्थापक अध्यक्ष रंगनाथ बंग, उत्सव समिती अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, कार्यवाह ज्ञानेश्वर म्याकल, उपाध्यक्ष प्रकाश कलकोटे, कोषाध्यक्ष नितीन करवा, शोभायात्रा प्रमुख चिदानंद मुस्तारे, वरदराज बंग, रंगनाथ बंकापूर, चंद्रिका चौहान, सतीश जिरांगकलगी, विजय प्याटी, बाळू राठी, रामानुज होलाणी, पद्मशाली महिला संस्थेच्या अध्यक्षा मेघा इट्टम,

ममता तलकोकुल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर संघचालक राजेंद्र काटवे, भाजपाचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, गुरुशांत धुत्तरगावकर, नितीन मिस्किन, रोहिणी तळवळकर, प्रा. मोहिनी पत्की, श्रीनिवास दायमा, जगदीश भुतडा, जगदीश पाटील, चेतन शर्मा, शिवानंद कल्लूरकर, श्याम येमुल, पुरुषोत्तम उडता, उदय वैद्य, सत्यनारायण गुर्रम, ड. प्रदीपसिंग राजपूत, प्राचार्य गजानन धरणे, प्रथमेश कोठे, राजू राठी आदी उपस्थित होते.

शोभायात्रेच्या अग्रभागी श्रद्धानंद समाज मानाचा श्री आजोबा गणपती ट्रस्टच्या ढोल पथकाने शोभायात्रेत रंगत आणली. फेटे परिधान केलेल्या, भाळी चंद्रकोर लावलेल्या तरूण - तरूणींनी बहारदार ढोल वादन करून वातावरणात उत्साह भरला. यामागे पारंपारिक वेशभूषा केलेल्या आणि भगवे फेटे परिधान केलेल्या महिलांचे पथक होते. श्री पंचमुखी हनुमान देवस्थानतर्फे सजवलेल्या रथात श्री पंचमुखी हनुमानाची उत्सवमूर्ती ठेवण्यात आली होती. या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी हिंदू बांधवांनी गर्दी केली होती. तमिळनाडू येथील कुंभकोणम येथून आणण्यात आलेल्या पंचधातूपासून बनवलेल्या प्रभू श्रीराम, श्री लक्ष्मण, श्री सीतामाई तसेच हनुमंतरायाच्या उत्सवमूर्ती या शोभायात्रेत सहभागी करण्यात आल्या होत्या. तसेच छत्रपती श्री शिवाजी महाराज, झाशीची राणी लक्ष्मीबाई आदी महापुरुषांच्या पोषाखात मुले - मुली होत्या. त्यामागील रथात भारतमातेची प्रतिमा होती. तसेच अनेक लहान मुलांनी दांडपट्टा, तलवारबाजी असे साहसी युद्धप्रकार सादर केले. शोभायात्रेत ठेवण्यात आलेली श्री अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील मूर्तीची प्रतिकृती सर्वांच्या आकर्षणाचा विषय ठरली. बाळीवेस येथील विजयी चौकापासून सुरू झालेली ही शोभायात्रा टिळक चौक, मधला मारुती, माणिक चौक, सोन्या मारुती, सावरकर मैदान, नवी पेठमार्गे शिवस्मारक येथे विसर्जित झाली. शिवस्मारक येथे शोभायात्रेचा समारोप झाला.





**बाळीवेस हिंदू समाज शोभायात्रा**

**सोलापूर : सोलापूर शहरात रविवार सायंकाळी चैत्र पाडवानिमित्त बाळीवेस परिसरात हिंदू समाज शोभायात्रा काढण्यात आली. (छायाचित्र केवल तिवारी)**

**जुळे सोलापुरातील भगवे ध्वज आणि लेझीमने आणली रंगत**

हिंदू नववर्ष महोत्सव समितीतर्फे जुळे सोलापूरात काढण्यात आलेल्या भगवे ध्वज आणि लेझीमने रंगत आणली. किल्लेदार मंगल कार्यालयासमोर शोभायात्रेची सुरुवात झाली. याप्रसंगी प्रा.डॉ. नरेंद्र काटीकर, शोभायात्रा प्रमुख जयदेव सुरवसे, ड. शर्वरी रानडे, कार्याध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, उपाध्यक्ष रवींद्र नाशिककर, विकास कुलकर्णी, अनंत कुलकर्णी, विशाल पाटील सुनील भराडकर आदी उपस्थित होते. शोभायात्रेच्या अग्रभागी उद्घोषणा करणारी रिक्षा होती. यामध्ये भगवे दारी आणि मशालधारी होते. लेझीम पथकाने बहारदार लेझीमचे डाव सादर करीत उपस्थित त्यांची मने जिंकली. शोभायात्रेत सहभागी झालेल्या सजवलेल्या घोड्यासोबत सेल्फी घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली. या शोभायात्रेत सहभागी झालेल्या ढोल ताशा पथक, साहसी पथक, मशाल पथक, भारतमाता चित्ररथ, भरतनाट्यम, योग नृत्य, भजनी मंडळ, गीत गायन, अभंग गायन आदींमुळे शोभायात्रेत रंगत आली. शिवप्रताप चौक, डी मार्ट चौक या ठिकाणी लेझीम व साहसी पथकांनी कला सादर केली. किल्लेदार मंगल कार्यालयापासून सुरू झालेली ही शोभायात्रा शिवप्रताप चौक, रेल्वे पूल, डी मार्टमार्गे केएलई प्रशालेसमोरच्या मैदानावर सांस्कृतिक कार्यक्रमाने विसर्जित झाली.

**हिंदू बांधवांनी केले रांगोळी आणि आतिषबाजीने स्वागत**

चौकाचौकात रांगोळी काढून तसेच फटाक्यांची आतिषबाजी करून हिंदू बांधवांनी हिंदू नववर्ष शोभायात्रेचे प्रचंड मोठे स्वागत केले. अनेक चौकार मध्ये शोभायात्रेत सहभागी झालेल्या हिंदू बांधवांना हिंदू बांधवांकडून सरबत, ताक, मिठाई देण्यात येत होती.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०७२

**तरी अवधान एकले दीजे । मग सर्व सुखासी पात्र होईजे ।**
**हे प्रतिज्ञोत्तर माझें । उघड ऐका ।।**

जीवनात आनंद कसा मिळविता येईल, त्यासाठी आपण काय करावे, काय ऐकावे, काय ऐकू नये, काय आणि कसे बोलावे हे सांगणारे अनेक संत या भारत भूमीत झाले आहेत. त्यांचे आदर्श आमच्या समोर आहेत. त्यांनी केलेले कार्य, त्यांचे मार्गदर्शन आम्हाला ऐकायला, वाचायला मिळत असते. त्यांचे ज्ञान स्वीकारण्याची मनसीक तयारी असणे आवश्यक आहे. संतांचे महत्वपूर्ण विचार सोडून आपण नको ते ऐकत असतो. मला फलाणा असा बोलला, तसा बोलला, माझ्याबददल त्याने असे का बोलावे, त्याने माझ्याबददल असे चांगले का बोलू नये अशा बाबीवर आपण अकारण विचार करीत असतो. त्याचा विपरीत परिणाम आपल्यावरच होतो. आपल्या कानाला आपल्याबददल ईतरांकडून चांगलेच ऐकण्याची सवय आपण का लावून ठेवावी. स्वत:ला मोठेपणा मिळेल असेच लोकांनी बोलावे व तसेच आपणाला ऐकायला मिळावे असा आपल्या कानांचा अटटहास का असावा?



आपण चांगले वागावे एवढेच आपल्या हातात आहे. लोकांनी काय बोलावे हे आपल्या हातात नाही. जे अयोग्य आहे ते आपण ऐकूच नये. अर्थात, आपल्या कानांवर आपण तेवढया वेळेपुरते का होईना हात ठेवणेच योग्य असते. कोणाला काय बोलायचे ते बोलू देत, आपण मात्र सत्य व चांगलेच बोलावे. बहुतांश लोक अकारण त्याचे तसे झाले, तो तसा आहे, ती तशी आहे, त्याने असे कसे केले, त्याने तसे करायला पाहिजे होते, अशा विषयावर बोलत राहतात. अशा बोलण्यात त्यांना आनंदही वाटत असतो. आपण आपल्या आयुष्यातला अमूल्य वेळ अशा निरर्थक गप्पात अकारण घालत असतो. श्री ज्ञानेश्वर माऊलींसारखे,

**तरी अवधान एकले दीजे । मग सर्व सुखासी पात्र होईजे ।**
**हे प्रतिज्ञोत्तर माझें । उघड ऐका ।।**

असे प्रतिज्ञेवर, शपथेवर बोलणारे व त्यांचे ऐकले तर आपणाला खरे सुख मिळेल असे म्हणणारे फार कमी लोक आहेत. अकारण व निरर्थक ऐकवणा-यांचीच संख्या भरपूर आहे. आपल्या बोलण्याने एखादयावर चांगला परिणाम होणार असेल, एखादयाचे भले होणार असेल तर बोलण्यास हरकत नाही. पण एखादयाचे वाईट होणार असेल, भले होणार नसेल, राग व्देष, वाद-विवाद होणार असतील तर बोलायचे कशाला? अशा बाबींचा विचार आपण करायला हवा. एखादा आपल्यावर रागावला, एखादयाने आपला अपमान केला तर त्याचा बदला म्हणून आपण दुस-या कोणावर तरी राग काढणे, त्याला अपमानीत करणेही चुकीचे असते. जीवनात आनंद मिळवायचा असेल तर काही परिस्थितीत का होईना पण आपण आपल्या कानावर, तोंडावर हात ठेवलेला बरा असतो. यात कमीपणा किंवा अपमान मानू नये. कोणी भडकावले तरी भडकू नये.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : सोमवार
दि. ३१ मार्च २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - क्रोधी नाम
मास - चैत्र
शु. द्वितीया (०९.११)
ऋतु - वसंत
नक्षत्र - अश्विनी (१३.४५)
योग - वैधृति (१३.४६)
करण - तैतिल (१९.२६)

दिनविशेष - रमजान ईद, श्री स्वामी समर्थ प्रकट दिन, संत झुलेलाल जयंती

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : आपल्या कामातील नियमीतपणाच आपल्याला यश देणार आहे. दुसऱ्याच्या भरोशावर काम टाकू नका. कौटुंबिक जीवन आनंदमय राहणार आहे.

**वृषभ** : शुभकार्यात भाग घेतल्यामुळे आनंदी रहाल. शत्रूवर विजय मिळवाल. आळस झटकून कामास लागा.

**मिथुन** : धैर्यामुळे आपली सर्वात मोठ्यातली मोठी महत्वकांक्षा पूर्ण होईल. साहस, पराक्रमात वाढ होईल. फुकटचा मोठेपणा स्तुतीपासून दूर रहा.

**कर्क** : घराची समस्या दूर होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. वायफळ बडबड करू नका. व्यापार व्यवसायात प्रगती होईल.

**सिंह** : गुंतवणूकीच्या योजना फायदेशीर ठरतील. स्वाध्याय व ज्ञानात भर पडणार आहे. तणावाकडे लक्ष न देता कामे करा.

**कन्या** : प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप होईल ज्यामुळे आपली प्रगती होणार आहे. भावनेच्या आधारावर कोणताही निर्णय घेऊ नका. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागण्याचा योग आहे.

**तुळ** : संकोच केल्यामुळे आपल्याला निष्कारण नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक कामात अडचणी निर्माण होतील.

**वृश्चिक** : अनोळखी व्यक्तिच्या सहकार्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.योजलेले कामे पार पडतील. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील.

**धनु** : फायद्याच्या संधी मिळून कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्साह वाढणार आहे. रागावर नियंत्रण ठेवून कामे पार पाडा.

**मकर** : मान सन्मान मिळण्याच्या संधी आल्यामुळे कार्यशील रहाल. वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात वेळेवर निर्णय घेऊ न शकल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. मुलांच्या कामाच्या बाबतीत समाधानी रहाल.

**कुंभ** : स्थावर संपत्तीबाबतचे वाद मिटल्यामुळे आनंदी रहाल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. काही निर्णय चूकीचे ठरण्याची शक्यता आहे.

**मीन** : जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. आधिकारी लोकांचे सहकार्य मिळेल. मुलांच्या बाबतीत चांगल्या बातम्या ऐकावयास मिळतील.

# स्वर्णलताताई राष्ट्रसमर्पित जीवन जगल्या

**रोहन पुल्ली यांचे प्रतिपादन**

**'ज्ञानप्रबोधिनी'त गुढीपाडव्या दिवशी झाले व्याख्यान**





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

राष्ट्रयोगिनी कै. वाच. स्वर्णलताताई भिशीकर यांनी आपले जीवन राष्ट्रकार्यासाठी समर्पित केलेले होते. त्यामुळे त्यांच्या सहवासाने आपण सगळे पुनित झाल्याचे प्रतिपादन रोहन पल्ली यांनी केले.

येथील ज्ञानप्रबोधिनी संस्थेत आज गुढीपाडव्यादिवशी राष्ट्रयोगिनी कै. वाच. स्वर्णलताताई भिशीकर यांच्या राष्ट्रसमर्पित जीवन चरिताचे स्मरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात सकाळी सहा वाजता भगव्या ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर ध्वजगीत व ध्वजनमस्ते झाल्यावर उपासना मंदिरात उपासना, वाचन, पद्य, कै. लताताई जीवन दर्शन चलचित्र व व्याख्यान असा कार्यक्रम झाला. डॉ. स्वर्णलता भिशीकर- एक राष्ट्र समर्पित जीवन असा व्याख्यानाचा विषय होता. यावेळी रोहन पुल्ली यांनी डॉ. स्वर्णलताईंचे पुणे येथील कार्याची माहिती दिली. तर विश्वस्त सी.ए. श्रीरंग कुलकर्णी यांनी सोलापूर येथील कार्याचा आढावा घेतला. डॉ.अपर्णा कल्याणी यांनी डॉ. स्वर्णलतांच्या हराळी येथील कार्याची माहिती देऊन त्यांचे गुण हे त्यांच्या जीवनातील प्रसंगातून वर्णित केले. यावेळी सहकार्यवाह डॉ.अमोल गांगजी, संस्थेचे विश्वस्त सी.ए. बिराजदार व प्रशालेतील सातवी ते नववीतील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षकवृंद, कर्मचारी व युवक-युवतींसह सुमारे २५० जण उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीची आज बैठक

**डॉल्बीमुक्त मिरवणुका करण्याचा प्रयत्न राहणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीची बैठक सोमवार दि. ३१ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता सोलापुरातील फॉरेस्ट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल हायस्कूल येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती विश्वस्त राजा इंगळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे नियोजन करण्यासाठी विश्वस्त समितीचे पदाधिकारी, मध्यवर्ती जयंती उत्सव समिती पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी आघाडी, युवक आघाडी, महिला आघाडी व समाजबांधव यांची संयुक्त बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत सन २०२४ चा जमाखर्च सादर करणे, सन २०२५ च्या जयंती उत्सव समितीचे नूतन पदाधिकारी नेमणे, भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंतीचा सप्ताह ठरविणे त्याचबरोबर अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय यावर चर्चा करण्यात येणार असल्याचे यावेळी विश्वस्त राजा इंगळे यांनी स्पष्ट केले. लहान मोठ्या सर्व मंडळांना शेवटपर्यंत मिरवणुकीत सहभागी होता यावे. मात्र स्टेशनच्या पुढे गाड्या जाऊ शकत नाहीत. काही मंडळे जागेवरच थांबतात. त्यामुळे बहुतांश मंडळांना पुढे जाता येत नाही. यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक ती शिस्त लावावी या संदर्भात पोलीस अधिकाऱ्यांना सूचना करण्यात येणार आहे, असे राजा इंगळे यांनी स्पष्ट केले आहे. यंदाच्या मिरवणुकीत बुद्धगया येथील महाबोधी बुद्ध विहार या विषयावरील देखावे आकर्षण ठरणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. सर्व मंडळांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन उत्सव समिती अध्यक्ष नागेश रणखांबे यांनी केले आहे. यावेळी विश्वस्त सुभान बनसोडे, एड. संजीव सदाफुले, माजी नगरसेवक अरुण भालेराव, बबलू गायकवाड, प्रा. संघमित्रा चौधरी, शिवम सोनकांबळे, सुग्रीव जेठीथोर, विश्वास तळभंडारे, राहुल शंखे, शशी कांबळे उपस्थित होते.

**पारंपरिक पद्धतीने काढण्याचा प्रयत्न करावा**

काळानुसार भीम जयंती मिरवणुकीच्या स्वरूपात बदल झाले आहेत. बग्गी ते कंटेनर असा हा प्रवास आहे. मोठ्या कंटेनरमुळे पारंपरिक मार्गात अडथळा निर्माण झाला आहे. यामुळे डॉल्बीमुक्त मिरवणुका काढण्याचा प्रयत्न राहणार आहे. सहभागी मंडळांनी मिरवणूक ही पारंपरिक पद्धतीने काढण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन यावेळी विश्वस्त राजा इंगळे आणि सुभान बनसोडे यांनी केले आहे.

# ६ एप्रिलला एक दिवसीय हज प्रशिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

के.एम.सी. चॅरिटेबल अँड वेल्फेअर ट्रस्ट, सोलापूरच्यावतीने रविवार दि. ६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत के.एम.सी.गार्डन, सोशल हायस्कूलसमोर, मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर येथे प्रथम एक दिवसीय हज प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

एक दिवसीय हज प्रशिक्षण शिबीरामध्ये उमराह कसे करावे, अहराम कसे बांधावे, तवाफ कसे करावे, रमल कसे करावे, इस्तबा कसे करो, सफा-मरवाहची सही कशी करावी, हजची नियत कशी करावी, मिना, अरफात, मुजदलीफामध्ये काय करावे, रमी जमरात कशी करावी, कुर्बानी कुठे करावी, हलक कसे करावे अशा सखोल धार्मिक विधींचे प्रशिक्षण व प्रात्यक्षीक हज तज्ञ मार्गदर्शक हाजी उस्मान जमादार व त्यांच्या सहकार्यांच्यावतीने देण्यात येणार आहे. तरी सोलापूर शहर व जिल्हयातील तमाम हज यात्रेला जाणारे हज यात्रेकरूंनी सदरहू प्रशिक्षणसाठी वेळेवर उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी संपर्क मुबीन सय्यद (८६०००००९०४), आरीफ शेख (९४२२४५७८६२), उस्मान जमादार (९९६०५३९८५५), हाजी शेख (९०२८९६१६४८), शफीक रचभरे (९९६०००९९८०), असे आवाहन के.एम.सी. चॅरिटेबल अँड वेल्फेअर ट्रस्ट, सोलापूरचे अध्यक्ष मुबीन सय्यद यांच्यावतीने करण्यात आले आहे.





# ए.जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये टाटा मोटर्स लिमिटेड कंपनीचा कॅम्पस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

नॅशनल बोर्ड ऑफ ऍक्रेडिटेशन, नवी दिल्ली कडून पुर्नःमानांकन प्राप्त झालेला विजापूर रोडवरील ए. जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये टाटा मोटर्स पुणे या नामांकित कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह संपन्न झाला. टाटा मोटर्सच्या श्री मुबीन सईद सीनियर मॅनेजर, ऋषिकेश गुंड एच.आर. मॅनेजर व श्री राजेश रोकडे एच. आर. मॅनेजर या अधिकाऱ्यांनी डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड केली.

सदर कॅम्पस ड्राईव्ह साठी संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील ८ डिप्लोमा कॉलेजमधून ३५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कॅम्पस ड्राईव्हची सुरुवात राष्ट्रगीत व दीपप्रज्वलनाने झाली. व्यासपीठावर कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबतच संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते व कॉलेजचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी एम. एम. कुलकर्णी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांचे शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एस.ए. पाटील, उपाध्यक्ष एस. एस. पाटील, संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.ए चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते, कॉलेजचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी एम. एम. कुलकर्णी, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस.एस. लिगाडे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख एस.आर.बागबान व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख आर. एस. मोटगी यांनी अभिनंदन केले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या प्राध्यापिका केंदुले यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

# अंमली पदार्थ विरोधात कारवाईबरोबच जनजागृती आवश्यक

**जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी**

**नार्को कोऑर्डिनेशन केंद्र समितीची बैठक**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

जिल्ह्यात अंमली पदार्थ वाहतूक, विक्री तसेच सेवनाबाबत आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डिनेशन केंद्र समितीच्या माध्यमातून सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करुन कारवाई व त्यासोबतच जनजागृतीवरही भर द्यावा, असे निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिले.

जिल्ह्यात अंमली पदार्थ तस्करी व वापरावर आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डिनेशन समितीची पोलीस अधीक्षक कार्यलय सोलापूर (ग्रामीण) येथे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस अधीक्षक सीमा शुल्क विभाग महेंद्र प्रताप, जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय प्रतिनिधी अभिजित धेटे, उपसंचालक औद्योगिक सुरक्षा संचालनालय ओम भांडेकरी, सहा. आयुक्त समाज कल्याण एस.एम.शिंदे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ किरण चव्हाण, पोलीस आयुक्त शहर कार्यालय क्षिरसागर, अन्न वऔषध प्रशासन कार्यालय द.रा विरगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मिलींद कारंजकर, राज्य उत्पादन शुल्कचे जगन्नाथ पाटील, केंद्रिय गुप्त वार्ताचे वासुदेव अपसिंगेकर, नायब तहसिलदार (गृह शाखा) बालाजी बनसोडे, सहा. पोलीस निरिक्षक (ग्रामिण) विशाल वायकर तसेच शासकीय विभाग प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक म्हणाले, जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्री व सेवनास आळा घालण्यासाठी जनजागृतीवर भर देण्यात यावा. अंमली पदार्थांची वाहतुक रोखणे यासाठी संयुक्त कारवाई होणे अपेक्षित आहे. याबाबत गुप्त माहिती घेऊन प्रतिबंध करणे, ही उपाययोजना करीत असतांना समाजात जनजागृतीच्या माध्यमातून व्यसनाधीनते विरोधात प्रबोधन करावे. तसेच खाजगी डॉक्टरर्स मानसपोचार तज्ञ यांच्या मदतीने जनजागृती करून अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या रूग्णांना समुपदेशन करावे. राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीस यांनी केमिकल कारखाने तसेच बंद पडलेले कारखाने यांना भेटी देऊन तपासणी करावी. जिल्ह्यातील शहरी -ग्रामिण भागातील सर्व औषध विक्रेते दुकानाची वेळोवेळी अन्न औषध प्रशासानाने तपासणी करावी. शाळा महाविद्यालये,विद्यापिठ आदी ठिकाणी विद्यार्थी यांच्या मध्ये जनजागृती करावी. जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी यांच्या मदतीने समाजात अमली पदार्था विरोधी जनजागृतीपर कार्यक्रम घ्यावेत अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. तसेच अमली पदार्थांच्या विक्री व वाहतुकी संबंधी माहिती मिळाल्यास पोलीस विभागाने विकसित केलेल्या क्यूआर कोड वर माहिती द्यावी संबधितांचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. असेही पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

# मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १३ मार्च रोजी सायंकाळी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास कुमठा नाका येथे घडली. याप्रकरणी प्रमोद मुकुंद जानवर (रा. कुमठा नाका रेणुका कॉम्प्लेक्स) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचे वडील दुचाकी क्रमांक एम एच.१३.बीजी.२३२९ यावरून घरी येत असताना वरील ठिकाणी अज्ञात इसमाने त्याच्या ताब्यातील चार चाकी वाहन क्रमांक एम एच.१३.सीयू.३९१२ हे वाहन अविचाराने चालवून फिर्यादी यांच्या वडिलांच्या दुचाकीला कट मारून खाली पडून गंभीर जखमी होऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार नदाफ करीत आहेत.

# विधान परिषद सभापती शिंदे यांचा आज सत्कार

**धनगरी परंपरेने होणार मान्यवरांचा सत्कार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**


ॲड. शंकर पैलवान मित्रपरिवार आणि रुद्र उद्योग समूह सोलापूर यांच्या वतीने सोलापुरातील गांधीनगर येथील हेरिटेज सभागृहात सोमवार दि. ३१ मार्च रोजी सकाळी १० वाजता राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज तथा विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह मान्यवरांचा धनगरी परंपरेने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती ॲड. शंकर पैलवान नरोटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याप्रसंगी कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे, आ. गोपीचंद पडळकर, आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, दिलीप सोपल, नारायण पाटील, अभिजीत पाटील, राजाभाऊ खरे, उत्तमराव जानकर, ऍड. बाबासाहेब देशमुख, देवेंद्र कोठे, माजी आ. राम सातपुते, रामहरी रुपनवर आदी मान्यवरांचा यावेळी नागरी सत्कार करण्यात येणार आहे.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, विश्वास देवकते, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी नगरसेवक सुरेश पाटील, संतोष वाकसे, तानाजी खरात, शैलेश पिसे, बाळासाहेब शेळके यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. उल्लेखनीय काम करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचाही यावेळी गौरव करण्यात येणार आहे, असे ॲड. शंकर पैलवान नरोटे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस शेखर बंगाळे, ॲड. सोमनिंग पुजारी, ॲड. अभिषेक देवकते, युवराज जानकर, समर्थ मोटे आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (९३) वनवासी

श्री गुरुजी म्हणत वनवासी, गिरीजन गरीकुहारामध्ये- पहाडामध्ये दयनीय जीवन जगत आहेत. त्यांना सरकार व मिशनरी आदिवासी संबोधतात. परंतु आदिवासी हा शब्द कपट पूर्ण, भ्रामक आणि विच्छेदक वाटतो. त्यातून गुलामी प्रगट होते. गेली दीड दोन शतके इतर धर्मीय प्रचंड कारस्थाने करून त्यांचे धर्मांतरण करतात. अशा वनवासींना अज्ञान अंधःकारातूत प्रकाशाच्या वाटेवर आणण्यासाठी काय करता येईल, असा प्रश्न ते कार्यकर्त्यांना विचारत. आणि मग वनवासी जीवनाचे पुनरुज्जीवन करणारी संघाची प्रथम व्यक्ती उभी राहिली त्यांचे नाव श्री बाळासाहेब देशपांडे. त्यांनी १९५२ मध्ये मध्यप्रदेशातील जशपूरच्या महाराजांच्या सक्रिय सहयोगाने वनवासी कल्याण आश्रमाची स्थापना केली. तेव्हा श्री गुरुजी- जसपूरचे महाराज व तब्बल दहा हजार वनवासींच्या उपस्थितीत तिथे कार्याचा श्रीगणेशा छात्रावास व प्राथमिक शाळा काढून केला, आधी तिथे असलेल्या हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार केला. हीच प्रथा पुढे श्री बाळासाहेब देवरस यांनी पण सुरू ठेवली. वनवासी संत गहिरा गुरुजींचा आशीर्वाद व सहयोग मिळवला. असे अनेक वनवासी संत श्री बाळासाहेब यांच्या हाकेला ओ देऊ लागले मग इथे विश्व हिंदू परिषदेने पण पहिला उपक्रम हाती घेतला त्यांनी ॐचेकंठहार अनेक वनवासींच्या गळ्यात घातले. आधी त्यांच्या गळ्यात क्रॉसचा कंठहार दिसायचा. त्यानंतर इथे यज्ञ-योग-रामचरितमानस कथन-रामनवमी यात्रा- व अनेक धार्मिक कार्यक्रम केले. साधूसंतांची प्रवचने केली. आसपासच्या वनवासींचे भजनसंघ बनवले. महिला बालक- युवा सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमामुळे संघाकडे आकृष्ट झाला. सामूहिक सहभोजने रक्षाबंधन हळदीकुंकू आदोन कार्यक्रमात सर्वांचा सहभाग वाढू लागला. १९७८ ला प्रधानमंत्री मोरारजी देसाईंनी भेट दिली तेव्हा हे बहुमुखी परिवर्तन पाहून सुखद आश्चर्य आनंदाने प्रगट केले. ते म्हणाले आपने तो इसाई मिशनरीयो को बहुत पीछे छोडा है।। (बाकी पुढील अलक मध्ये) **क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### प्रियदर्शनी महिला मंडळाच्यावतीने इफ्तार पार्टीचे आयोजन

**माढा, दि. ३० मार्च-**

प्रियदर्शनी महिला विकास मंडळातर्फे माढा शहरातील मुस्लिम महिलांसाठी शहरातील मोमीन गल्लीत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. प्रियदर्शनी महिला मंडळाच्या अध्यक्षा मिनल साठे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या आठ वर्षांपासून मुस्लिम भगिनींसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. रमजान महिना हा मुस्लिम समाजात पवित्र महिना समजला जातो महिनाभर मुस्लिम महिला व पुरुष उपवास करून नमाज पठण करत असतात त्यामुळे महिला भगिनींसाठी प्रियदर्शनी मंडळाकडून सर्व धर्म समभाव संदेश सर्वत्र पोहोचावा या उद्देशाने गेल्या आठ वर्षांपासून इफ्तार पार्टीचे आयोजन माढा येथे केले जाते. यावेळी मुस्लिम भगिनींने बहुसंख्येने उपस्थिती लावली होती. यावेळी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी नेहा कंठे उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, नगरसेविका शबाना बागवान, निर्मला थोरात, सुनीता राऊत, रेश्मा लंकेश्वर, मोहिनी नेटके, प्रियदर्शिनी महिला मंडळाच्या सदस्या गीतांजली देशमुख, विजया कोल्हे, दिपाली गुंड, पल्लवी साबळे, अरुणा देशपांडे, रेहाना शेख, वैशाली कथले, अनिता टिंगरे, प्रियंका गवळी, विदुला कुंभेजकर, अर्चना राऊत, सरोजिनी कोल्हापुरे उपस्थित होते.



### नितीन शिंदे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**पिलीव, दि. ३० मार्च-**

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेवस्ती येथील शिक्षक नितीन राजाराम शिंदे यांना माळशिरस तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्यावतीने आदर्श शिक्षक पुरस्कार माळशिरस तालुक्याचे आ. उत्तमराव जानकर, पंचायत समितीचे माजी सभापती अर्जुनसिह मोहीते-पाटील, माजी पंचायत समिती सदस्य अजय सकट, माळशिरस पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार करडे, शिक्षण विस्तार अधिकारी सुषमा महामुनी या मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माळशिरस तालुका शिक्षक सोसायटीचे संचालक अमोल नष्टे, संभाजी औटी,विनायक आर्वे, नागनाथ शेटे,भारत मगर, राजू गोरवे,संजय करमाळकर, पोतदार, राजेंद्र सुरवसे, आत्माराम गायकवाड, दगडु पवार, पांडुरंग वाघ,राजेंद्र लोहार, दिलीप ताटे, किरण काळे उपस्थित होते.



### जिल्हा परिषद शाळा भांडेवस्तीचे स्नेहसंमेलन उत्साहात

**पिलीव, दि.३० मार्च -**

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भांडेवस्ती या जिल्हा परिषद शाळेचे प्रथमच वार्षीक स्नेहसंमेलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास माळशिरस पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार करडे, शिक्षण विस्तार अधिकारी सुषमा महामुनी, चांदापुरी केंद्राचे केंद्र प्रमुख राजू गोरवे, प्रकाश तोरणे, अमोल नष्टे, सुरेश सोनवणे, अनिल कोल्हटकर, राजाभाऊ जाधव, नितीन शिंदे, संभाजी औटी, सतीश लोखंडे, बापुराव चंदनशिवे, संतोष पोतदार, यदुनाथ इंगळे उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल कोल्हटकर यांनी तर आभार सुर्यकांत जाधव यांनी मानले.

### मानव विकास परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी ॲड. संजीवनी चुंबळकर

**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

मानव विकास परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्ष पदासाठी पंढरीतील



प्रसिद्ध वकील ॲड. संजिवनी चुंबळकर यांची निवड करण्यात आली असल्याचे पत्र संस्थापक आणि राष्ट्रीय अध्यक्ष अफसर शेख यांनी नुकतेच दिले आहे. ॲड.संजीवनी चुंबळकर यांचे सामाजिक कार्याची दखल घेत ही निवड केली आहे. सदरची निवड २८मार्च २०२५ ते २७ मार्च २०२६ अशी एक वर्षासाठी करण्यात आली असल्याचे देण्यात आलेल्या नियुक्ती पत्रात सांगितले आहे.

### मंद्रूपच्या डी.एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूटचा सन्मान

**मंद्रूप, दि.३० मार्च-**

ग्रामीण भागात सर्वाधिक क्लिक कोर्स प्रवेश केल्याबद्दल मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर) येथील डी. एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूटला एमकेसीएलच्या वार्षिक सभेत विशेष सन्मान देण्यात आला. हा सन्मान संस्थेचे संचालक अभिजीत जवळकोटे आणि अविनाश जवळकोटे यांनी स्वीकारला. सोलापुरातील निर्मलकुमार फडकुले सभागृहात दिनांक २८ मार्च रोजी झालेल्या या कार्यक्रमात एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला एमकेसीएलचे रिजनल मॅनेजर अतुल पतोडी, अमित रानडे, आर. एम. दीपक कुंभार, महेश पत्रिके आणि रोहित जेऊरकर यांच्यासह समन्वयक हरून शेख आणि मलिक शेख उपस्थित होते. जिल्ह्यातील विविध केंद्र चालकांनीही या कार्यक्रमात सहभाग घेतला. डी. एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूटने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण आणि एमएससीआयटीच्या माध्यमातून डिजिटल साक्षरतेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन चघउडने हा सन्मान दिला.

# भाळवणीच्या पाणी संस्थेकडून अडीच लाखांची थकबाकी जमा

### जय भवानी पाणी वापर संस्थेने भरली रक्कम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

तालुक्यातील भाळवणी येथील जय भवानी पाणी वापर संस्थेची मागील थकबाकी पैकी २ लाख ५० हजार ३७१) रुपयांचा भरणा संस्थेचे संचालक संभाजी शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपसरपंच नितीन शिंदे,गणपत गवळी, महेश शिंदे, प्रशांत माळवदे, शहाजहान शेख, मुसा शेख, निळकंठ गवळी, शिवाजी लोखंडे, दादा लोखंडे, शफी शेख, देविदास लिंगे आदि शेतकरी



उपस्थित होते.

यावेळी पाटबंधारे कार्यालय मधील बीटचे अधिकारी मोरे यांची दारूबंदी अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार जय भवानी पाणी वापर संस्थेमार्फत करण्यात आला. जय भवानी पाणी वापर संस्थेचे सचिव नीलकंठ चंद्रकांत गवळी यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे सचिवपदी काम करण्यास अडचण येत असल्याकारणाने गवळी यांनी सचिवपदाचा राजीनामा दिला असल्याने त्यांचा निरोपपर सत्कार संस्थेमार्फत करण्यात आला. संस्थेचे नूतन सचिव बाळासाहेब कापसे यांचा ही सत्कार संस्थेमार्फत करण्यात आला. संस्थेमार्फत इरिगेशनच्या इतर अधिकाऱ्यांचा ही सन्मान करण्यात आला.

यावेळी संभाजी शिंदे म्हणाले की, सर्व शेतकरी सभासद यांना विश्वासात घेऊन पाटबंधारे कार्यालयाची थकबाकी जमा केलेली आहे. शेतकरी बांधवांनी योग्य प्रमाणात पाण्याचा वापर करून वेळोवेळी पाणीपट्टी तात्काळ जमा करावी. म्हणजे आपल्या शेतीस आवश्यक त्या प्रमाणात पाणी उपलब्ध होईल. संस्थेच्या कार्यास पाटबंधारे विभागाने ही यापुढे सहकार्य करावे असे आवाहन शिंदे यांनी केले. यावेळी रामचंद्र सावंत यांनी बोलताना सांगितले की संस्थेची राहिलेली थकबाकी ही येत्या एक-दोन आवर्तनामध्ये आपण योग्य नियोजनाने व पारदर्शकपणे कारभार चालवून लवकर संस्था कर्जमुक्ती करून आपल्या सर्व सभासदांच्या सहकार्यातून बाहेर काढू असा विश्वास मी आमच्या मॅनेजमेंटच्या सर्व सभासदांच्या वतीने देऊ इच्छितो, असे सावंत म्हणाले. यावेळी अधिकारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनीषा कुन्हाळे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३० मार्च-**

तालुक्यातील वागदरी येथील जिल्हा परिषद मराठी मुलांची शाळेची उपक्रमशील शिक्षिका मनीषा कुन्हाळे यांना शांभवी कल्याणशेट्टी यांच्या हस्ते तालुकास्तरीय आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. अक्कलकोट येथील लोकापुरे मल्टीपर्पज हॉलमध्ये पंचायत समिती शिक्षण विभाग यांनी आयोजित केलेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभामध्ये यांनी आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अक्कलकोट पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे, मल्लय्या मठपती केंद्रप्रमुख, बसवराज मुनोळी सुरेश शटकार, धडके, जीवराज खोबरे, आदीसहित तालुक्यातील



प्राथमिक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वागदरी केंद्रातील मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे, शिवानंद गोगाव अनुसया कलशेट्टी, नदाफ, तोलन बागवान, बाबासाहेब बनसोडे, सुजाता केसुर अमोल बोराळे, नागेंद्र बिराजदार, सिद्धाराम होदलुरे, फड आदीसह केंद्रातील शिक्षक शिक्षिका उपस्थित होते. मनीषा कुन्हाळे यांनी मराठी मुलांच्या शाळेत नावीन्य पूर्ण उपक्रम राबवून मुलांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करीत आहे. त्यांच्या कार्याच्या दखल घेऊन पंचायत समिती अक्कलकोटचे शिक्षण विभाग यांनी या वर्षाच्या आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## सुप्रभात ग्रुपचे गेट-टुगेदर उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ३० मार्च-**

माणूस हा माणसापासून दुरावत चालला आहे. माणसा माणसा मधील सवांद कमी झाला आहे. माणसांनी एकत्र येणे गरजेचे आहे या हेतूने शहरांमध्ये सर्व क्षेत्रातील लोकांनी १५ वर्षांपूर्वी सुप्रभात ग्रुपच्या नावाने मॉर्निंग वॉक चालू केला आहे. या ग्रुपच्या माध्यमातून सुळकाई ,भांब डोंगर, जरंडेश्वर (सातारा), रायगड, मुरुड जंजिरा, राजगड, शिंगणापूर, वैष्णवीदेवी, अमरनाथ या धार्मिक, ऐतिहासिक स्थळांना भेटी दिल्या असून.प्रत्येक रविवारी कोणत्या न कोणत्या धार्मिक अथवा, ऐतिहासिक स्थळाला भेट देण्याचे निश्चय या ग्रुपचा असल्याने यामधील सदस्यांना गोडी लागली असून सदस्यांनी वाढही होत आहे.



या ग्रुपचे गेट टुगेदर आठवड्यास होते परंतु फॅमिली गेट-टुगेदर होत नाही. सर्व फॅमिली एकत्र याव्यात या उद्देशाने या सुप्रभात ग्रुपने फॅमिली गेट-टुगेदराचे आयोजन केले त्यास चांगला प्रतिसाद मिळाला .

या गेट-टुगेदर मध्ये महिलांचे व मुलांचे फनी गेम ही झाले त्यामध्ये विजेत्यांना बक्षीसही मिळाली. या सर्व कार्यक्रमानंतर सर्व कुटुंबाला भोजन देण्यात आले. सध्याच्या काळात आपलीच लोक आपल्याला विसरत चालली आहेत ती एकत्र यावीत यासाठी गेट-टुगेदर या सुप्रभात ग्रुपने आयोजित केला. या कार्यक्रमास सुप्रभात ग्रुपचे सुरेश तोरसे, डॉ.भानुदास शेंडगे,घाडगे मेजर, कुमार नाळे सर, भीमराव शेंडगे, राजाभाऊ देशमुख सर, ड.आप्पासाहेब वाघमोडे, सुरेश कोरे, मोहिते भाऊ, आबा गोरड, नितीन गायकवाड, निकम ज्वेलर्स, डॉ.देविदास गेजगे, सुरेश पवार, सोमनाथ वाणी, तात्या राऊत, बाबर सर, साळुंखे मेजर, सिद मेडिकल, राठोड साहेब, गोरड गुरुजी, पांडुरंग सूर्यवंशी, पांडुरंग देवकर, सुनील कांबळे, संतोष माने, राकेश शिंदे, गोविंद (तात्या)गायकवाड, डॉ. सुरेश कुलकर्णी. उपस्थित होते.

## स्व.आ. काकासाहेब साळुंखे-पाटील यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३० मार्च-**

सांगोल्याचे स्व.आ. काकासाहेब साळुंखे पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त सांगोला शहर आणि तालुक्यात विविध समाज उपयोगी कार्यक्रम पार पडले. यामध्ये जि.प.प्रा.शाळा महुद, जि.प.प्रा.शाळा एखतपुर, आश्रम शाळा व जि.प.प्रा.शाळा घेरडी, अंगणवाडी व जि.प.प्रा.शाळा कडलास, अंगणवाडी व जि.प.प्रा. शाळा नाझरे येथे ग्रामस्थांच्या वतीने शालेय साहित्यांचे व खाऊचे वाटप करण्यात आले.यावेळी महूद बु येथे जयवंत नागणे, कैलास खबाले, धनंजय पाटील, विठ्ठल बागल, अंगद जाधव, यशवंत



खबाले, अभिषेक कांबळे, बाबुराव नागणे, दिलीप नागणे एखतपुर येथे नवनाथ इंगोले, निवास जाधव, प्रशांत इंगोले, दादासो इंगोले घेरडी येथे दिलीप मोटे, भाऊसाहेब यमगर, शामराव पोळ, कय्युम आत्तार कडलास येथे सुनील गायकवाड, गिरीश गायकवाड नाझरे येथे बसवेश्वर आदाटे, नागेश रायचुरे, पांडुरंग वाघमारे, संभाजी हरिहर, सुरेश देशपांडे, रफिक काझी, ओंकार देशपांडे, इम्रान काझी, सिद्धेश्वर झाडबुके उपस्थित होते. तसेच कोळा ग्रामस्थांच्या वतीने गोपाळपूर ता.पंढरपूर येथील मातोश्री आश्रमात भोजन देण्यात आले. तर सांगोला शहरातील मातोश्री वृद्धाश्रम येथे भोजनाचे सर्व साहित्य दिले. यावेळी तानाजी पाटील, शिवाजी बनकर, अनिल खटकाळे, सोमनाथ लोखंडे, अनिल खडतरे, रवी चौगुले उपस्थित होते.

जवळा ग्रामस्थांच्या वतीने प्राथमिक मुलांची शाळा क्र.१ येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात हजारो नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी ॲड. यशराजे साळुंखे पाटील, साहेबराव देशमुख, सज्जन मागाडे, चंद्रकांत शिंदे, पंडित साळुंखे, सुषमा घुले यांच्यासह ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

## हत्तुर येथील अपघातात एकजण जखमी

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

शेतातून घराकडे जात असताना सोमेश्वर नगर येथील डांबरी रस्त्यावर असलेल्या वळणावर अज्ञात इसमाने महिंद्रा बोलेरो गाडी क्रमांक एमएच.१३.डी क्यू.८७४३ ही भरधाव वेगाने चालवून फिर्यादी शिवानंद महालिंग वाले (वय-६०,रा.मुक्काम पोस्ट हत्तुर) यांना धडक देऊन अपघात करून जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे.ही घटना २५ मार्च रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास हतुर गाव येथे घडली.शिवानंद वाले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात इस्माविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार सोनार हे करीत आहेत.

## अज्ञात चोरट्याने तरुणाचा मोबाईल पळवला

**सोलापूर, दि. ३० मार्च-**

सात रस्ता येतील बाबुराव इडली गृह येथे पार्सल घेण्यासाठी फिर्यादी सागर फकीरचंद मुदगल (वय-३०,रा.सिद्धेश्वर हौसिंग सोसायटी,सिद्धार्थ चौक) हे आले असता, त्यावेळी अज्ञात चोरट्याने अकरा हजार पाचशे रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना १६ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सागर मुदगल यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.



## जेऊर येथील श्रीराम जन्मोत्सव मंडळाच्या वतीने छावा सिनेमाचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३० मार्च-**

तालुक्यातील जेऊर येथे श्रीराम जन्मोत्सव मंडळ यांच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छावा सिनेमा दाखवण्यात आला. यास जोरदार प्रतिसाद मिळाला. श्रीराम जन्मोत्सव मंडळांच्या वतीने स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या फोटो पूजन करून कार्यक्रमला सुरूवात करण्यात आली. याप्रसंगी चौलगे वस्तीचे अध्यक्ष गौरीशंकर चौलगे, विश्वनाथ चौलगे, सोमनाथ चौलगे उपस्थित होते.

## शिंपी समाज व नामदास परिवाराकडून मुख्यमंत्र्यांचे आभार

### संत नामदेव महाराज स्मारक उभारणीबाबत दिले आभारपत्र

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

समस्त शिंपी समाजाचे आराध्य दैवत वारकरी संप्रदायाचे व भागवत धर्माचे आद्य प्रचारक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे स्मारक पंढरीत उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून या कामास प्रशासकीय स्तरावर गती दिल्याबद्दल संत नामदेव महाराजांचे वंशज नामदास परिवार व समस्त नामदेव शिंपी समाज पंढरपूरच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करण्यात आले असल्याची माहिती पंढरपूर शिंपी समाजाचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शनिवारी (दि.२९) पंढरपूर दौऱ्यावर आले असता शासकीय विश्रामगृह येथे शिंपी समाजाच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेवून आभारपत्र दिले. यावेळी संत नामदेव महाराजांचे वंशज ह. भ. प. एकनाथ महाराज नामदास, संत नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे विश्वस्त राजेश धोकटे , युवक संघटनेचे अध्यक्ष पै.शैलेश धट, दत्तात्रय चांडोले, प्रथमेश परंडकर, अक्षय महिंद्रकर, राहुल महाडिक आदी उपस्थित होते. संत नामदेव महाराज स्मारकाच्या कामासाठी राज्य शासनाने २५ कोटी रुपयांची निधी राखीव ठेवला आहे. मात्र तो निधी कमी पडत असून त्यामध्ये वाढ करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

संत नामदेव महाराज स्मारकाच्या जागेचा प्रलंबित प्रश्न सुटावा यासाठी अनेकांनी अनेक वेळा यापूर्वी प्रयत्नही केलेले होते. ॲड. महेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाच्या प्रयत्नांना यश आले असून पंढरपूर येथील संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या स्मारकाची जागा महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित झालेली आहे. शेगाव दुमाला येथील जमीन ग.नं. १५७, क्षेत्र ६ हे १० आर. ही रेल्वे विभागाच्या ताब्यातील जमीन दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी पंचनामा करून राज्य शासनाने ताब्यात घेतली आहे. तसेच नोंदणीकृत आदलाबदल दस्त क्र. ५१३/२०२५ दि. ३ फेब्रुवारी रोजी करारनामा नोंदविलेला आहे. महाराष्ट्र शासनाने सदरहू जागा ही संत शिरोमणी नामदेव महाराज स्मारकासाठी राखीव करून तसा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे सादर केलेला आहे. यामुळे संत नामदेव महाराजांच्या स्मारकाच्या कामास लवकरच सुरुवात होणार असल्याचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी सांगितले.

## ज्ञानेश्वर दुधाणे यांच्या पखवाज वादनाने रसिक मंत्रमुग्ध

### सुंदरीसम्राट पं. सिद्राम जाधव यांच्या स्मृती संगीत महोत्सवात सादर केले पखवाजवादन

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३० मार्च-**

ख्यातनाम सुंद्रीवादक कै. सिद्राम जाधव यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ सोलापूर येथे आयोजित केलेल्या २६व्या संगीत महोत्सवामध्ये ग्रामीण भागातील करकंब या गावचे पखवाज वादक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. सुरुवातीला आयोजक सुंद्रीवादक पं.भिमाण्णा जाधव,उस्ताद रईस खान, ज्ञानेश्वर दुधाणे, सिध्दाराम पाटील, गोवर्धन कमटम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.




त्यानंतर पं. भिमाण्णा जाधव यांच्या शिष्यांचे सुंदर सुंद्री वादनाने राग यमन सादर केला. त्यांना तबला साथ नितीन दिवकार यांनी केली. सानिका कुलकर्णी आणि रसिका कुलकर्णी यांचे सुंदर गायनात राग मारुबिहाग सादर केला.त्यांना दादा मुळे यांनी तबला साथ केली. पखवाज वादनात ज्ञानेश्वर दुधाणे यांनी आदीताल सादर करत त्यामध्ये उठान, चक्रदार, रेले, कमाली चक्रदार परण सादर करत सोलापूरकर रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.बोलांची स्पष्टता आणि पढंत हे पखवाज वादनाच वैशिष्टे दिसून आल.त्यांना लेहेरासाथ वैभव केंगार यांनी केली. संगीत महोत्सवाची सांगता खतनाम आंतरराष्ट्रीय कीर्तीचे सतार वादक उस्ताद रईस खान यांच्या सतारवादनाने झाली. आलाप जोड झाला. अतिशय तयारीने वाजवलेल्या सतार वादननाने सोलापूरकर कलाशिक मंत्रमुग्ध झाले.त्यांनी राग किरवाणी सादर केल्यानंतर पहाडी धून वाजवली त्यांना तितकीच सुंदर तबला साथ ऋषिकेश बदामीकर यांनी दिली.याबरोबरच ज्ञानेश्वर दुधाणे यांचे अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रसार आणि प्रचारासाठी करण्यासाठी अतिशय सिंहाचा वाटा असून अनेक दिग्गज कलाकारांना पंढरपूर येथे आपली कला सादर करण्यासाठी आमंत्रित करत उदयोन्मुख कलाकारांना ही संधी प्राप्त करून देतात.तसेच पं.जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव ही पंढरपूर येथे पं.शौनक अभिषेकी यांचे मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या आयोजित करत आहेत.महाराष्ट्र आणि इतर राज्यांतही त्यांनी अनेक दिग्गज कलाकारांना पखवाज साथ केलेली असून आज आपल्या पखवाज वादनाने नोकरी करत करत ही कला जोपासली आहे.याचा सर्वांना अभिमान वाटतो अशी भावना कलारसिक सोलापूरकरांच्या रुपाने ऐकायला मिळत होती. कार्यक्रमाचे सुंदर आयोजन पं.भिमण्णा जाधव करीत असूनकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गायत्री जाधव, कलाश्री जाधव, गोरखनाथ जाधव, डॉ. जगदीश पाटील, श्रुती मैंदर्गीकर, निलम शहाणे त्यांच्या शिष्यपरिवाराने अधिक परिश्रम घेतले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वळसंग पोलिसांचा रुट मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ३० मार्च-**

हिंदू नववर्ष गुढीपाडवा, आगामी सण, उत्सव, जयंती आणि रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अनिल सनगल्ले यांच्या नेतृत्वाखाली रूट मार्च काढण्यात आला.

कुंभारी हद्दीतील गोदुताई परुळेकर विडी घरकुल, कुंभार, होटगी या गावांमध्ये रूट मार्च काढण्यात आला. रूट मार्चद्वारे कायदा, सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले यांनी केले.




या रूट मार्चमध्ये तीन पोलीस अधिकारी, नऊ पोलीस अंमलदार, १९ एसआरपीएफ जवान आणि दहा होमगार्ड सहभागी झाले होते.



## संक्षिप्त वृत्त...



### एकता महिला मंचच्या सदस्यांनी उभारली जलसाक्षरतेची गुढी

**बार्शी, दि. ३० मार्च-**

मळेगाव (ता. बार्शी) येथे एकता महिला मंचच्या सदस्यांनी गुढीपाडव्यानिमित्त दुष्काळ व तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर रविवार, दिनांक ३० मार्च रोजी जलसाक्षरतेची गुढी उभी करून पाणी बचतीची शपथ घेतली. यावेळी उपस्थित एकता महिला मंचच्या मळेगाव येथील सविता आपुणे, शोभा यादव, ज्योती आपुणे, जयश्री यादव, भामाबाई बारबुले, भामाबाई कदम, महानंदा करंडे, कौशल्या करंडे, सुनिता नागटिळक उपस्थित होते.

### माळशिरस शहर व परीसरात गुढीपाडवा उत्साहात साजरा

**सदाशिवनगर, दि.३० मार्च-**

माळशिरस शहर व परिसरांत हिंदु नववर्षाचा महत्वाचा सन गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला. आजपासून शंभू महादेव यात्रा सुरू होत असल्याने या यात्रेसाठी जाणाऱ्या कावडीची मिरवणूकही आज काढण्यात आली. शहरात सर्वत्र नागरिकांनी आपल्या घरावर गुढी उभा केली होती. गुढीची पारंपरिक पद्धतीने पूजा ही करण्यात आली. या सणासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या साखरेच्या हारगाठी बाजारात शहरात सगळीकडे विक्रीसाठी आल्या होत्या. या हार गाठी ७० ते ८० रुपये किलो दराने विकण्यात येत होत्या. साखरेचे भाव स्थिर असल्याने या हार गाठीच्या किंमतीत कसलीही वाढ करण्यात झाली नव्हती. गुढीपाडव्यानिमित्त येथील ग्रामदैवत श्रीराम व श्री मारुती मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. नववर्षानिमित्त नागरिक एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा देताना दिसत होते.



### डॉ. आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्षपदी बापूसाहेब पोळके

**श्रीपूर, दि.३० मार्च-**

श्रीपूर येथील आरपीआय आठवले गट प्रणित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्षपदी बापूसाहेब पोळके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. आरपीआय सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष शामराव भोसले, जिल्हा संपर्कप्रमुख भारत आठवले जिल्हा संघटक तुकाराम बाबर, ज्येष्ठ पत्रकार बी टी शिवशरण व माजी अध्यक्ष विश्वजित भालशंकर यांचे उपस्थितीत ही निवड करण्यात आली. याबरोबरच नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली यामध्ये उपाध्यक्ष नितीन आठवले, राजू शेंडगे, ज्ञानेश्वर काटे, दिगंबर आल्हाट राजू नवगिरे, खजिनदार,सचिन ताकतोडे, नियोजन प्रमुख संजय खरे, विश्वजीत भालशंकर, गणेश सावंत, संदीप जगधने किशोर आठवले, संपर्क प्रमुख, अनिल आठवले, दावल शिवशरण, रमेश भोसले, स्वागताध्यक्ष भारत आठवले, बी. टी. शिवशरण, तुकाराम बाबर, गौतम आठवले, अनिल दळवी, गुडुलाल शेख, भालचंद्र शिंदे पाटील, प्रभाकर सुरवसे, सोपान शिंदे अशी कार्यकारणी निवडण्यात आली. याप्रसंगी संदीप घाडगे, अनिल आठवले, गौतम लोंढे, प्रथमेश लोंढे, किशोर आठवले, संदिप जगधने, गणेश सावंत, राजू सुरवसे, समाधान लांडगे, शैलेंद्र शेंडगे, नितीन मोटे, सुनील सुरवसे उपस्थित होते.




### बार्शीतील व्यावसायिकाची फसवणूक

**बार्शी, दि.३० मार्च-**

शहरातील गॅरेज व्यावसायिक सरफराज समद इनामदार (वय ४२, रा. नाळे प्लॉट, बार्शी) यांची बनावट पोलीस अधिकारी व आरटीओ अधिकाऱ्यांकडून ४६,९३० रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. त्यांनी या प्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सरफराज इनामदार यांच्या मालकीची मोटार त्यांच्या ओळखीचा सादीक बशीर काझी वापरत असे. मे २०२४ मध्ये सदर मोटारीने येडशी येथे कंदुरी कार्यक्रमाहून परत येत असताना अरणगाव (ता. बार्शी) येथे अपघात झाला. यात जमीर शेख आणि अभिजीत मुकटे किरकोळ जखमी झाले होते. या अपघातानंतर अभिजीत मुकटे यांनी सरफराज इनामदार यांच्याकडे दवाखान्याच्या खर्चाची मागणी केली. त्यांनी सुरुवातीला १,२०० रुपये फोन पे द्वारे पाठवले. त्यानंतर अनोळखी व्यक्तीने पोलीस अधिकारी असल्याचे सांगून ९,५०० रुपये मागितले. पुढे आरटीओ अधिकारी असल्याचे सांगून १८,२३० रुपये विमा शुल्कासाठी उकळण्यात आले. शेवटी, ३,००० रुपये अतिरिक्त शुल्क म्हणून वसूल करण्यात आले. त्यानंतर वारंवार पैशांची मागणी होत असल्यामुळे सरफराज इनामदार यांना संशय आला. त्यांनी आपल्या नातेवाईकासोबत चौकशी केल्यावर अभिजीत मुकटे आणि जमीर शेख यांनी संगनमत करुन फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. या प्रकारानंतर सरफराज इनामदार यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## गुढी पाडव्यानिमित्त विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात फुलांची सजावट





### सजावटीसाठी शेवंती, ॲष्टर, गोंडा, गुलाब, जिप्सी फुलांचा वापर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

चैत्र गुढीपाडवा व मराठी नववर्षाप्रारंभशनिमित्त रविवारी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात व गाभाऱ्यात विविध फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. त्यामुळे श्रींचा गाभारा मनमोहक दिसत होता. सजावटीसाठी शेवंती २०० किलो, अष्टर ८० किलो, गोंडा १५० किलो, गुलाब १०० गड्डी, जिप्सी १० गड्डी या फुलांचा वापर करण्यात आला असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

सदरची सजावट विठ्ठलभक्त नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर पाटील (रा. रांजणगाव म हागणपती) यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली असून, सजावटीचे काम श्री फ्लॉवर्स, पुणे यांनी केले. यासाठी सुमारे १२ कामगारांनी परिश्रम घेतले. हिंदू नववर्षानिमित्त भाविकांची दर्शन रांगेत व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, भाविकांची गर्दी विचारात घेऊन भाविकांचे जलद व सुलभ दर्शन होण्याच्या दृष्टीने ऑनलाइन दर्शन पास बुकिंग व्यवस्था बंद ठेवण्यात आली आहे. तसेच व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, पुजेची संख्या कमी करणे व इतर अनुषंगिक उपाययोजना करण्यात समिती मार्फत करण्यात आल्या आहेत. प्रत्येक वर्षी महत्त्वाचे सण उत्सव, खास दिवस या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात फुलांची आरास, सजावट केली जाते. हिंदू नवीवर्षाच्या स्वागतासाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर सजले असून, मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आल्याने, विठुरायाचे सावळे रूप अधिकच खुलून दिसत आहे.

हिंदू नव वर्षाची सुरुवात श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनाने व्हावी यासाठी हजारो भाविक श्री क्षेत्र पंढरपूरात दाखल झालेले आहेत. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शन रांगेत गर्दी केली असून, विठ्ठल रुक्मिणीमातेच्या नाम गजराने परिसर दुमदुमून गेला आहे. या सजावटीमुळे विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मुर्तीसह गाभारा पाहून देखील भाविक अधिक समाधानी होत आहे.

## अन्नछत्रात वर्धापन दिनानिमित्त भोजन व्यवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३० मार्च-**

चैत्र शुध्द प्रतिपदा हा हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे नवीन वर्षारंभाचा दिवस आहे. नवीन वर्षानिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस नवीन महावस्त्रे परिधान करण्यात आली. मंदिरात सकाळी ८ वाजता मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते ध्वजपूजन करण्यात आले.

यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, विभाग प्रमुख पांडुरंग बुरांडे, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी, प्रसाद दशपुत्रे व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय, श्री संत नाम देव पायरीवरील (महाद्वारावरील) गोपूर, श्री रुक्मिणी उत्तरद्वार गोपुर, या ठिकाणी विधिवत पूजा करून ध्वज लावण्यात आले. सकाळी पंचांग पूजन करण्यात आले. मंदिर समितीचे पुजारी वेद शास्त्र संपन्न समीर कौलगी यांनी पंचांग वाचन केले. या दिवसापासून श्रीं चे महानैवेद्यामध्ये श्रीखंड वापरण्यास सुरवात करण्यात येत असून, दुपारी पोशाखावेळी श्रींस अलंकार परिधान करण्यात येणार आहेत.



हिंदू धर्मात अन्नदानाचे महत्व अनन्य साधारण आहे. विशेषतः तीर्थक्षेत्री अन्नदान केल्याने महत्पुण्य लाभते अशी भावना आहे. मंदिर समितीचे श्री संत तुकाराम भवन येथे विनामूल्य अन्नछत्र सुरू असून, या अन्नछत्राचा सन १९९६ पासून गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर प्रारंभ करण्यात आला आहे. आज अन्नछत्राचा वर्धापनदिन असल्याने विशेष भोजन व्यवस्था करण्यात आली होती. या अन्नछत्रामध्ये दुपारी बारा ते दोन व सायंकाळी सात ते नऊ या वेळेत मोफत भोजनप्रसाद भाविकांना दिला जातो. दररोज अडीच ते तीन हजार भाविक प्रसादाचा लाभ घेतात. आज वर्धापन दिनानिमित्त मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते पुजा करून भाविकांना भोजन प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख संजय कोकीळ, सहायक विभाग प्रमुख राजकुमार कुलकर्णी व कर्मचारी उपस्थित होते. या अन्नछत्रामध्ये अन्नदान करण्यासाठी विविध योजना असून इच्छुक भाविकांना कार्यालयात संपर्क करून अधिक माहिती जाणून घेता येईल.


## दक्षिण तालुका कृषी कार्यालयात गुढी पाडव्यादिवशीही कामकाज

- शेतकऱ्यांना अनुदान मिळवून देण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांकडून प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३० मार्च-**

गुढी पाडवा हा मराठी नववर्षाचा पहिला दिवस. गुडी पाडवा सण मार्च महिना अखेरला आला आहे. शेतकरी हा जगाचा पोषिंदा आहे. मात्र या पोषिंदयाला विविध योजनेतील अनुदान मिळविण्यासाठी मार्चअखेरपर्यंत प्रतीक्षा करावे लागते.त्यामुळे संपूर्ण वर्षभरातील आर्थिक व्यवहार व शेतकर्यांची अनुदानाची कामे पूर्ण करण्यासाठी दक्षिण तालुका कृषी कार्यालयात कामकाज सुरू आहे.

दक्षिण सोलापूर तालुका कृषी कार्यालयात घरी विजयाची गुडी उभारून सुप्रिया घोडके, गुरूदेवी कस्तुरे, रेश्मा पवार, जयश्री लिगाडे या महिला कर्मचाऱ्यांनी सकाळीच कार्यालयात हजेरी लावण्यास पसंती दिली. त्यामुळे शनिवार व रविवार सुट्टीचे दिवस असतानाही तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांनी शेतकऱ्यांची सर्व योजनांमधील प्रलंबित अनुदान कामे पूर्ण करण्यासाठी संध्याकाळपर्यंत कार्यालयात कामकाज करताना दिसून आले. विशेष म्हणजे आर्थिक वर्षाचे मार्च महिनाअखेर असल्याने महिला कर्मचाऱ्यांसह सर्वच कर्मचारी कार्यालयात कामकाज करताना दिसून आले. यावेळी शेतकऱ्यांची महात्मा गांधी रोजगार हमी योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, मुख्यमंत्री वैयक्तिक शेततळे, राष्ट्रीय कृषी विकास योजना, यांत्रिकीकरण आदी योजनांमधील शेतकऱ्यांचे अनुदान प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिकारी गुडी पाडव्या दिवशीही कामकाज करीत होते.



### जगाच्या पोषिंद्यासाठी गुढी

मराठी नववर्षाची सुरूवात गुडी पाडव्याने होत असले तरी या दिवशी मार्च अखेर आहे. त्यामुळे गुडी पाडव्यापेक्षा जगाचा पोषिंदा असणार्या शेतकर्यांची विविध योजनेतील अनुदानाची कामे महत्वाची आहेत. मार्च महिना अखेरला शासनाकडून पोर्टलवर बिल मंजूरी देण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे गुडी पाडवा सणापेक्षा शेतकऱ्यांच्या विकासासाठी त्यांचे प्रलंबित अनुदान शेतकऱ्यांना मिळवून देणे महत्वाचे आहे. आदी शेतकऱ्यांची गुढी महत्वाचे आहे.

**- अवधूत मुळे, तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर**

### शेतकऱ्यांना अनुदान मिळवून देण्यास प्राधान्य

गुढीपाडवा सण महत्वाचा असला तरी वर्षभरापासून शेतकर्यांची अनेक योजनेतील अनुदान प्रलंबित आहे. मार्चअखेर असल्याने शासनाकडून सर्व प्रलंबित कामे पूर्ण करण्यास सांगण्यात आले आहे. त्यामुळे गुडी पाडवा सणापेक्षा शेतकर्यांना प्रलंबित अनुदान मिळवून देण्यास प्राधान्य दिले आहे. आमच्यासाठी शेतकर्यांची कामे महत्वाची आहेत.

**- सुप्रिया घोडके, कृषी अधिकारी, कार्यालय दक्षिण सोलापूर**

## सांगोला तालुक्यासाठी राजेवाडी, निरेचे पाणी सोडा

- चेतनसिंह केदार-सावंत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३० मार्च-**

सांगोला तालुक्यासाठी राजेवाडी तलावातून तसेच निरा उजवा शाखा नं. ४ व ५ चे उन्हाळी आवर्तन सुरु करण्याची मागणी भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी पंढरपूर दौऱ्यावर आले होते. यावेळी चेतनसिंह केदार सावंत यांनी त्यांची भेट घेऊन सांगोला तालुक्यातील भीषण पाणी टंचाईची परिस्थिती सांगितली. तालुक्यातील खवासापूर, लक्ष्मीनगर, चिकमहुद, नराळेवाडी व वाकी या गावांना राजेवाडी तलावातून प्रत्येक वर्षी पाच आवर्तने सोडण्यात येतात. परंतु चालू वर्षी उन्हाळी आवर्तने प्रकरण प्रसिद्ध केले नाही. तसेच तालुक्यातील वाकी, शिवणे, चिंचोली, शेळकेवाडी, एखतपूर या गावातील लाभधारक शेतकऱ्यांना नीरा उजवा कालवा शाखा नं. ४ व ५ मधून पाणी मिळते. परंतु आता नीरा उजवा कालवाचे शाखा नं. ४ व ५ ला उन्हाळी आवर्तन सोडले नाही. सध्या दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने राजेवाडी तलावातून उन्हाळी आवर्तने प्रसिद्ध करून वरील गावांना तसेच भाटकर धरणामध्ये उन्हाळी आवर्तन करून पाणीसाठा शिल्लक आहे. तरी शिल्लक पाण्यामधून शाखा नं.४ व ५ ला वरील गावांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी सोडण्यात यावे अशी मागणी केली चेतनसिंह केदार सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



## खरीप हंगामासाठी जिल्ह्यात दोन लाख टन खत येणार

### यंदा १२ हजार मे. टनाची वाढ; जिल्हा कृषी विभागाची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३० मार्च-**

जिल्ह्यातील रब्बी हंगामाची सुगी आता जवळजवळ संपली असून, शेतकरी बांधव आता विविध ठिकाणच्या जत्रा-यात्रेच्या उत्सवाचा आनंद सहकुटुंब घेताना आपण चौफेर पाहत आहोत. दरम्यान, काही शेतकरी आगामी खरिपाच्या पेरणीसाठी कडक उन्हातही घाम गाळताना दिसून येत आहेत.

शेताची नांगरणी, कुळवणी करून पेरणीपूर्व तयारी करण्याच्या नादात काहीजण आहेत. तर आपल्या जिल्हा कृषी विभागालाही आता आगामी खरीप हंगामाचे वेध लागले असून, त्यांनी आपल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खरीप हंगामासाठी यंदा तब्बल २ लाख ३२ हजार ३५६ मे. टन इतके खत मागविले आहे. तर हे खत गतवर्षीच्या तुलनेत १२ हजार मे. टनाने अधिक असल्याची माहिती जिल्हा कृषी विभागाकडून मिळाली. २०२३ व २०२४ या दोन वर्षात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरिपात रासायनिक खत वापर कमी केल्याने खतांची टंचाई जाणवली नाही. मात्र गतवर्षी पाऊसकाळ मुबलक झाल्याने आता खतांची मागणी वाढू लागल्याने ही खतांची तयारी सोलापूर कृषी विभागाकडून करण्यात आली आहे.



खरिपासाठी सप्टेंबर २०२५ पर्यंत पुरेल इतक्या खताचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये युरिया-९७ हजार १९४ मे. टन, डिएपी- २३ हजार ५०२ मे. टन, एमओपी ७ हजार ९६० मे. टन, एनपीके ७५ हजार ८०० मे. टन तर सिंगल सुपर फॉस्फेट २७ हजार ९०० मे. टन आदींचा समावेश आहे. हे खत कमी पडले तरी शासन स्तरावरुन अजून खत मिळू शकते. यामुळे शेतकरी बांधवांनी आगामी खरीप हंगामासाठी खते मिळतील का नाही? याची चिंता करू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### घरगुती सोयाबीन वापरामुळे बियाणांचा तुटवडा नाही

आगामी खरीप हंगामाच्या पेरणीसाठी आमच्या जिल्हा कृषी विभागाने खतांचे मुबलक नियोजन केले आहे. इतकेच काय तर शासनाच्या आवाहनानुसार जिल्ह्यातील अनेक शेतकरी आता घरचेच सोयाबीन बियाणे वापरू लागल्याने बियाणांचा तुटवडा जाणवणार नाही. पेरणीसाठी घरगुती सोयाबीन बियाणे गतवर्षी वापर वाढल्याने महाबीज आणि इतर काही खाजगी कंपन्यांचे जिल्ह्यातील बियाणे ३० टक्के शिल्लक राहिले होते. आगामी वर्षातही मराठवाड्याच्या धर्तीवर सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनीही घरगुती सोयाबीन बियाणे वापरावे.

**- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर**

### एटीएम कार्डची अदलाबदल करून वृद्धाला घातला गंडा

**सोलापूर दि. ३१ मार्च-**

अज्ञात इसमाने फिर्यादी सिद्धलिंग मल्लय्या स्वामी (वय-६०,रा. अंबिका नगर,अक्कलकोट रोड) हे एसबीआय शाखा ट्रेझरी सोलापूर येथे पैसे काढत असताना त्यांना अडकलेले पैसे काढून देतो असे म्हणून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून एटीएम कार्डचा पिन बघून कार्डची अदलाबदल करत फिर्यादी सिद्धलिंग स्वामी यांच्या एटीएम मधून ७५ हजार रुपये काढून फसवणूक केल्याची घटना १७ ते १८ मार्च दरम्यान घडली.याप्रकरणी सिद्धलिंग स्वामी यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार मुलांनी हे करीत आहेत.

धाराशिव
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## खामसवाडीच्या युवकाने सुरु केली वडिलांच्या स्मरणार्थ पाणपोई

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.३० मार्च -**

सद्याला उन्हाळ्याचे दिवस असल्याने उन्हाची तिव्रता वाढत आहे. चौकात बसलेल्या वृद्ध लोकांना, महिलांना जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाणी उपलब्ध करून देऊन एक वेगळेपण खामसवाडीतील ज्ञानेश्वर तुकाराम बंडगर यांनी केले आहे.

स्वर्गीय तुकाराम बंडगर हे आध्यत्मिक वारकरी होते. गावातील रामायण,महाभारत,विजय, दिग्विजय, ज्ञानेश्वरी आदी मराठी ग्रंथाचे विवेचन कार्यक्रमातून सोप्या भाषेत सांगत असतं.परमार्थची सखोल माहिती असलेला अशिक्षित माणुस म्हणुन ख्याती. वडिलांच्या श्रद्धेसाठी काहीतरी करावं या हेतुने पुत्र ज्ञानेश्वर यांनी पाणपोई टाकण्याची इच्छा व्यक्त केली. या सामाजिक कामाला मित्रकंपनीने तात्काळ साथ केली. निलेश पाटील, माजी उपसरपंच किरण पाटील, राजाभाऊ झोरी, कुलदीप घावटे, रणजित देशमाने आदी मित्रानी चौकातच पाणपोई सुरु करायला मदत केली.

गावातील हभप भारत महाराज यांच्या हस्ते उदघाटन करून पाणपोईला सुरुवात केली. यावेळी भाजपाचे नेते संजय पाटील, गावाचे सरपंच अमोल पाटील, बापु पाटील, आदी लोक उपस्थित होते.



### राज्याच्या कृषी विभागाचे, कृषी आयुक्तांना २१ मार्चच्या पत्राद्वारे स्पष्ट निर्देश?...

# एक रुपयात पिक विमा ही योजना पुढील वर्षीपासून बंद होणार!

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

एक रुपयात पिक विमा ही योजना आता राज्य शासनाने गुंडाळली असून या संदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली २० मार्च रोजी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर तातडीने राज्याच्या कृषी,पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाने दि.२६ मार्च रोजी पत्र काढून कृषी आयुक्तांना पुढील वर्षीपासून वेगळी पिक विमा योजना राबवण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

प्रधानमंत्री पिक विमा योजना राज्यात सन २०१६ पासून राबविण्यात येत आहे. सन २०२३ पासून एक रुपयात पिक विमा योजना राबविण्यात येत आहे, ही योजना दोन वर्षे चालली. मात्र, योजनेत अनेक गैरव्यवहार होत असल्याचे कारण देत राज्य शासनाने ही योजना आता गुंडाळली आहे. केंद्र शासनाने यापूर्वी केवळ पीक कापणी प्रयोगावर आधारित उत्पादन ही संरक्षणाची बाब अनिवार्य केली होती. मात्र, राज्य शासनाने यात चार बाबी ॲड ऑन कव्हर म्हणून स्वीकारल्या आहेत. त्यात प्रतिकूल हवामान घटकांमुळे पेरणी न होणे, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान काढणी पश्चात नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबींचा अंतर्भाव होता. परंतू, नव्या योजनेत याअंतर्गत आता शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार नाही. नव्या योजनेत आता केवळ कापणी प्रयोगावर आधारित रक्कम मिळणार जी शेतकऱ्यांवर अन्याय करणारी आहे.




प्रधानमंत्री पिक विमा योजना सुरू झाल्यापासून २०१६ ते २४ पर्यंत विविध पीक विमा कंपनीला राज्य शासनाकडून ४३,२०१ कोटी रुपये दिले गेले तर पिक विमा कंपनीने पीक नुकसान भरपाई पोटी शेतकऱ्यांना केवळ ३२ हजार ६५८ कोटी रुपये दिले. याचा अर्थ आठ वर्षात १० हजार ५४३ कोटी रुपये कंपन्यांना फायदा झालेला आहे.



ही योजना बंद करण्यासाठी जे निर्देश दिले आहेत. त्यामध्ये असे सांगितलं गेलं आहे की, कंपनीच्या कार्यपद्धतीबाबत शेतकऱ्यांच्या प्रचंड तक्रारी होत्या. तसेच विमा योजनेसाठी राज्य शासनाने ८०- ११० चे मॉडेल स्वीकारले आहे. त्यानुसार गेल्या आठ वर्षात विमा कंपन्यांना देण्यात आलेल्या एकूण विमा हप्त्यापोटी कंपनीचा प्रचंड फायदा आहे. तसेच महाराष्ट्र व इतर राज्याची तुलना करत असताना सांगितले गेले आहे की, गुजरात राज्य या योजनेतून बाहेर पडले आहे.


ओडिसा राज्यामध्ये एक रुपयात पिक विमा योजना ही केवळ दोन हेक्टर पूर्ती मर्यादित देण्यात येते. त्यापुढे विमा संरक्षित नियमित विमा हप्ता भरून घ्यावे लागते. आंध्रप्रदेश राज्यामध्ये कोणता विमा हप्ता घेतला जात नाही. मात्र पिकाची १०० टक्के पीक पाहणी करून राज्य शासन विमा हप्ता भरते. केवळ पीक उत्पादन आधारित विमा संरक्षण दिले जाते. राजस्थानमध्ये नैसर्गिक आपत्ती बाब पिक विमा योजनेतून वगळली आहे राज्याचा ८०-११० चा बीड पॅटर्न मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्याने स्वीकारला आहे तर राजस्थानमध्ये ६०-१३० मॉडेलवर योजना राबवते.

> राज्य शासनाने एक रुपयात पिक विमा योजना बंद करू नये. योजनेत काही त्रुटी, दोष असतील ते दूर करावेत. गैरव्यवहार करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, मात्र, ऐन पेरणीच्या हंगामात शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा योजनेतून मिळणारा आर्थिक दिलासा यामुळे मिळणार नाही. शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होईल. त्यामुळे पूर्वीची योजना चालू राहावी, उलट पीक विमा नुकसान भरपाई देण्याच्या पद्धतीत काही बदल करावेत. योजना बंद झाली तर केवळ निवडणुकीसाठी व सवंग लोकप्रियतेसाठी ही योजना होती, अशी बळीराजाची धारणा होईल.
>
> **- अनिल जगताप, पिक विमा अभ्यासक**

## आ.कैलास पाटील, धनंजय शिंगाडे यांच्या हस्ते स्वागतयात्रेचा शुभारंभ, आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत सांगता

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

हिंदु नववर्ष अर्थात गुढी पाडव्यानिमित्त नाणीजधाम दक्षिणपीठाचे अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज व उत्तराधिकारी कानिफनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखालील जिल्हा स्व-संप्रदाय समितीच्या वतीने धाराशिव येथे रविवार, ३० मार्च रोजी भव्यदिव्य हिंदु नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात आली. स्वागतयात्रेमुळे अवघे शहर भगवेमय झाले होते.



गुढी पाडव्यापासून हिंदु नववर्षाची सुरुवात होते. यानिमित्त संप्रदाय प्रमुख अनिरुद्ध कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील समर्थनगर येथील व्यंकटेश महाजन महाविद्यालयापासून ही स्वागतयात्रा काढण्यात आली. प्रारंभी भव्य रथामध्ये प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघाचे आमदार कैलास पाटील व बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर भव्यदिव्य स्वागत यात्रेला प्रारंभ झाला.

यात्रेत हातामध्ये भगवे ध्वज, माथ्यावर मंगलकलश व जनजागृतीचे फलक घेऊन महिला, तसेच युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. सत्पुरुषांनी जो शिकविला तो मानवधर्म आपला.. पुढच्या पिढीला काय उपहार? देऊया त्यांना वैदिक संस्कार.. विश्वबंधुत्व भाव जोपासा, तोच कल्याणाचा मार्ग माणसाचा.. नववर्षाचा एकच निर्धार, जतन करु हिंदु संस्कार.. असे फलक लक्ष वेधून घेत होते. तर प्रभु श्रीराम, सीता, लक्ष्मण, हनुमान, श्रीकृष्ण, संत गजानन महाराज, संत गोरोबा काका यांची वेशभूषा परिधान करुन आबालवृद्ध सहभागी झाले होते.

महाजन महाविद्यालयापासून निघालेली ही स्वागत यात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हा मध्यवर्ती बँक, महावितरण कार्यालय, जिजामाता उद्यान, देशपांडे स्टॅन्ड, नेहरु चौक, माऊली चौक, निंबाळकर गल्ली, काळा मारुती चौक, पोस्ट ऑफिस, संत गाडगे महाराज चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गे परत महाजन महाविद्यालय येथे आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत स्वागतयात्रेची सांगता झाली.

यात्रेत स्व-संप्रदाय समितीच्या धाराशिव शहर, तालुका, कळंब, तुळजापूर, उमरगा, लोहारा, परंडा, भूम वाशी तालुक्यातील सेवेकर्यांनी सहभाग घेतला. स्वागत यात्रेच्या यशस्वीतेसाठी स्व-संप्रदाय समितीचे प्रमुख अनिरुद्ध कावळे, जिल्हा निरीक्षक साहेबराव आहेर, जिल्हाध्यक्ष संतोष केसकर, सचिव बाळासाहेब कानडे, महिलाध्यक्ष लक्ष्मी माने, युवाध्यक्ष आकाश जाधव, प्रवचनकार दिनेश देटे, विजय भारती यांच्यासह जिल्हाभरातून आलेल्या अनुयायांनी परिश्रम घेतले.



## संजीवनी मेडिको, ८-फार्मा ग्रुप यांच्या वतीने मोफत पाणपोई

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मार्च -**

युवा नेते सुनील चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त संजीवनी मेडिको नळदुर्ग व ८-फार्मा ग्रुप अणदुर यांच्या वतीने नळदुर्ग येथे सुरु करण्यात आलेल्या मोफत पाणपोईचे उद्घाटन निमा संघटनेचे सचिव डॉ.जितेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पत्रकार विलास येडगे, तानाजी जाधव, उत्तम बनजगोळे, दादासाहेब बनसोडे, मारुती खारवे, उमेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या १० वर्षांपासुन ही पाणपोई सुनील चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त नळदुर्ग शहरात सुरु करण्यात येते. तसेच ही संपूर्ण उन्हाळातील ३० मार्च ते १५ मे पर्यंत ही पाणपोई लोकांसाठी उपलब्ध आहे.

रुग्ण व ग्रामस्थांना असल्या भीषण उन्हाळ्यात थंडगार पाणी पाजण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे, सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार अजय अणदुरकर यांनी केले तर आभार ऋषभ जाधव यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ८-फार्मा ग्रुप चे जीवन मोजगे, संजय जाधव, गोविंद शिंदे, गुणवंत मुळे, सचिन कासार, तेजस जाधव, प्रतीक किलजे यांनी परीश्रम घेतले.

## मार्डी येथे इफ्तार पार्टीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३० मार्च -**



लोहारा तालुक्यातील मार्डी येथे महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे तालुकाध्यक्ष तानाजी माटे यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. हजरत ख्वाजा जैनोद्दीन चिश्ती उर्फ जिंदावली दर्गाह आवारात मस्जिद येथे ही इफ्तार पार्टी संपन्न झाली.

उपविभागीय पोलीस अधिकारी सदानंद शेलार, सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर कुकलारे, पोलीस उपनिरीक्षक विनोद जोकार, सचिन केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे लोहारा अध्यक्ष तानाजी माटे यांनी मार्डी येथील मुस्लीम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर कुकलारे, मार्डी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे उपाध्यक्ष आरिफ पठान, पोलीस कॉन्स्टेबल व्यंकट वाकळे, पोलीस नाईक अर्जून तिघाडे, गृहरक्षक दलाचे जवान प्रकाश कोकरे मस्जिदचे इमामसाब सादीक शेख, यूसुफ पठान, रसूल शेख, अजीज शेख, अहमदपशा शेख, शकील शेख, मुकरमपाशा शेख, मैनुद्दीन, अकबर ईनामदार मुजफर शेख तसेच लहान मुले उपस्थित होते.

## तेरणा फार्मसीच्या वतीने फार्माविक आरंभचे आयोजन, गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट् संचलित अभियांत्रिकी महाविद्यालय येथील फार्मसी विभागाच्या वतीने २४ मार्च ते २८ मार्च या दरम्यान विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळवा म्हणून विद्यार्थ्यांसाठी विविध अभ्यासक्रमेतर कार्यक्रमांचे आयोजन केले होते. हा आठवडा आरंभ २०२५ म्हणून साजरा करण्यात आला.

या फार्मासप्ताहाचे आयोजन संस्थेचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या आठवड्यातील कार्यक्रमांचे नियोजन फार्मसी विभागाच्या प्रमुख डॉ. प्रीती टी. माने यांनी केले होते आणि सर्व कार्यक्रमांचे समन्वयक प्रा. सायली एस. पवार होते. फार्मावीकच्या शेवटच्या दिवशी सांस्कृतिक व बक्षीस वितरण दिनानिमित्त तेरणा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त बाळासाहेब वाघ, अशोक शिंदे, विजेंद्र चव्हाण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तेरणा पब्लिकच्या विश्वस्त अशोक शिंदे यांनी यांच्या भाषणामध्ये मागील आठवड्यात दि.२१ व २२ मार्च २०२५ रोजी बेंगलोर येथील माजी विद्यार्थी मेळाव्याच्या उल्लेख करून कॉलेज स्थापनेपासून ते आजपर्यंत कॉलेजच्या इतिहास सांगून आम्ही येथे सर्व विद्यार्थ्यांना चांगले चांगले शिक्षण व सुविधा देण्यासाठी सदैवप्रतिशील आहोत असे प्रतिपादन केले.



बक्षीस वितरण सोहळ्याच्या शेवटी पहिल्या वर्षासाठी मिस फ्रेशर आणि मिस्टर फ्रेशर म्हणून वैष्णवी क्षीरसागर आणि शुभम राऊत तसेच थेट दुसऱ्या वर्षाच्या बी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांमधून विश्वजीता निरगुडे आणिप्रशांत काळे यांची मिस फ्रेशर आणि मिस्टर फ्रेशर म्हणून नावे घोषित करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे सर्व विभाग प्रमुख सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. फार्म वीक यशस्वी होण्यासाठी सर्व विभागातील प्राध्यापकांनी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. यावेळी डॉ.जी.बी. चिवटे, डॉ. आर.बी.ननवरे, डॉ.एम.ए.जे. शेख, प्रा.आर. एस.टेकाळे, प्रा.ए.टी.हजगुडे, प्रा.एस. जे.नलगे, डॉ.आर.एस.यादव, प्रा.आर.एस. हिंगमीरे, प्रा.एन. एन.नायकवाडी, प्रा.व्ही.व्ही. इंगळे, प्रा.एस.पी.घनघवे, प्रा. डी.बी. भोजने, आर.एल. मुंडे, एच.एम.निंबाळकर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## बहुजन योद्धा सामाजिक संघटनेतर्फे मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टी

**आपआपसातील धार्मिक सलोखा कायम राहील : आ.कैलास पाटील**

**ईद निमित्त मुस्लिम समाजातील गोरगरीब कुटुंबांना साहित्य वाटप...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

पवित्र रमजान महिन्यानिमित्त बहुजन योद्धा सामाजिक संघटना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीतर्फे प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही मुस्लिम बांधवांसाठी शुक्रवारी सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज चौपाटी धनंजय शिंगाडे यांचे कार्यालयात इफ्तार पार्टी देण्यात आली. यावेळी सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. धाराशिव - कळंब विधानसभा मतदार संघाचे आमदार कैलास पाटील यांनी देखील इफ्तार पार्टीत सहभागी होऊन रमजान ईदच्या निमित्ताने सदिच्छा व्यक्त केल्या.



इफ्तार पार्टीत मुस्लिम बांधवांनी सामूहिक प्रार्थना करून 'बहुजन योद्धा सामाजिक संघटनेसाठी' दुआ मागितली. तर समी कव्वाल यांनी अभंग व कवाली सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

आमदार कैलास पाटील म्हणाले की, जगात आणि देशात पवित्र रमजान ईदचा सण हा एकात्मतेचा संदेश देणारा आणि आपसातील बंधुभाव कायम राखणारा आहे. सध्या देशात सुरू असलेली परिस्थिती लक्षात घेता धाराशिव जिल्ह्यात बंधुभाव आणि सलोखा कायम आहे. यापुढेही कायम राहील, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

रमजान महिन्यात मुस्लिम बांधव उपवास करतात. उपवास सोडण्यासाठी रोजा इफ्तारचे आयोजन केले जाते. या महिन्यातील अखेरचे पाच ते सहा दिवस रात्रभर जागून प्रार्थना केली जाते. रात्रभर जागल्यानंतरही शेकडो मुस्लिम बांधव या इफ्तार पार्टीला उपस्थित होते.

यावेळी बहुजन योद्धा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय शिंगाडे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष विश्वास शिंदे, ॲड. परवेज काझी, ॲड. जयंत जगदाळे, माजी उपनगराध्यक्ष खलिफा कुरेशी, मुनीर कुरेशी, खलील सय्यद, मसूद शेख, अहमद चाऊस, इलियास आबदार, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष मुकुंद घुले, कार्याध्यक्ष संजय मुंडे, राजाभाऊ पवार, बाबा मुजावर, सुभाष पवार, नंदकुमार शेटे, पांडू भोसले, विशाल शिंगाडे, प्रसेंजीत शिंगाडे, सारीपुत शिंगाडे, बाळासाहेब शिंगाडे, लहू बनसोडे, बंटी शिंगाडे, सम्राट वाघमारे, संजय थोरात, सुरेश गवळी, समीयोद्दीन मशायक, सजियोद्दिन शेख, खलील पठाण, इलियास पिरजादे, बिलाल तांबोळी, तायीब मुजावर, कलीम मौलाना, इलियास मुजावर, इमाम कलीम पेंटर, कलीम मुजावर, नुरखा पठाण, जुल्फेखार काझी, मुसा आबदार, आदिल आबदार, अनिरुद्ध कावळे, बंडू आदरकर, सतीश कदम यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व मुस्लिम बांधव उपस्थित होते.

## नागूर येथे पुस्तकांची गुढी उभारून हिंदू नवं वर्षाच स्वागत

**लोहारा, दि.३० मार्च -**



तालुक्यातील नागूर येथे गुढीपाडव्यानिमित्त गावातील हनुमान मंदिरासमोर पुस्तकांची गुढी उभारून हिंदू नवं वर्ष साजरा करण्यात आला. अस्मिता बहुउद्देशिय सामाजिक संस्था नागूर यांच्या वतीने गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम संस्थेचे सचिव यशवंत चंदनशिवे यांच्या सहयोगातून राबविला जात आहे. यावेळी पुस्तकांची गुढी उभारण्यासाठी शंकर जाधव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी यशवंत चंदनशिवे म्हणाले, पुस्तकांची गुढी उभा करण्याचा हा उद्देश आहे की, आजची युवा पिढी हातातले पुस्तक टाकून तो तासोनतास मोबाईल पाहताना दिसतो आहे. मोबाईल गेम तो हाताळताना दिसतो. त्यामुळे संवाद कमी झाला. वाचन संस्कृती नष्ट होते की काय अशी चिंता सतवत आहे. कार्यक्रमात पुस्तके ही वाटण्यात आली. यावेळी सतिश कद, शिवाजी मोरे, शरद पाटील, देवांश जावळे, आप्पासाहेब मसलकर, उध्दव मोरे, शेषेराव जाधव, बब्रुवान सलगरे, मुकुंद क्षीरसागर आदिसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## स्वातंत्र्यसैनिक कै.हरिश्चंद्र सदाशिव वाघमारे यांच्या स्मरणार्थ मोफत पाणपोईचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० मार्च -**



उन्हाच्या तीवतेत भाविक भक्तांसह नागरिकांना शुद्ध आणि थंड पाणी मिळावे, यासाठी युवा नेते सुदर्शन वाघमारे यांच्या वतीने मंदिर महाद्वार रोडवरील आर्य चौकात मोफत पाणपोई सुरू करण्यात आली. हा उपक्रम स्वातंत्र्य सैनिक कै.हरिश्चंद्र सदाशिव वाघमारे यांच्या स्मरणार्थ राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, काँग्रेस शहराध्यक्ष भारत कदम, जनसेवक अमोल कुतवळ, माजी नगराध्यक्ष सुहास साळुंखे, राजाभाऊ चोपदार, नागेश किवडे, राहुल भालेकर, ॲड.शुभम खोले, सोमा मस्के, शंकर गवळी, दत्ता बेंद्रे, संदीप जोशी, सचिन खोले, पपू लकशेट्टी व सर्व मित्र परिवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### श्री तुळजाभवानी देवींची विशेष अलंकार महापूजा

**धाराशिव, दि.३० मार्च -**



गुढीपाडव्याच्या निमित्ताने श्री तुळजाभवानी देवींची अलंकारमहापूजा करण्यात आली. प्रथा परंपरेप्रमाणे गुढीपाडव्याच्या दिवशी देवींची विशेष अलंकार महापूजा मांडली जाते. गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर आज पहाटे पाच वाजता श्री तुळजाभवानी मंदिरात पारंपरिक पद्धतीने गुढी उभारण्यात आली. पहाटे ५ वाजता मंदिरातील महंतांच्या नेतृत्वाखाली, गुढी उभारून सगळे पूजा विधी केले.



### इदं न मम माहितीपटाचा लोकार्पण सोहळा

**नळदुर्ग, दि.३० मार्च -**

समाजातील भटक्या विमुक्तांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलिसांसोबत ज्यांना झुंज द्यावी लागली, अशा एका सामाजिक कार्यकर्त्याची नियुक्ती 'राज्य पोलिस तक्रार प्राधिकरणा'च्या न्यायिक सदस्यपदी होते. पीडितांना न्याय मिळवुन देण्यासाठी व्यवस्थेविरुद्ध झुंज देणारा कार्यकर्ता एका वळणावर न्यायासनावर आरूढ होतो,असा दैवी न्याय मिळालेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व राज्य पोलिस तक्रार प्राधिकरणाचे न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर यांच्या कार्याचा परीचय करून देणाऱ्या 'इदं न मम' या माहितीपटाचा लोकार्पण सोहळा त्यांच्या जन्मदिवसाच्या पुर्वसंध्येला दि.३० मार्च रोजी संभाजीनगर येथे संपन्न झाला. माहितीपटाची संहिता व दिग्दर्शन प्रेरक लेखक दत्ता जोशी यांचे असुन याची निर्मिती 'द कॅटालिस्ट'च्या वतीने करण्यात आली आहे. हा कार्यक्रम मृदगंध कला दालन, सिडको, संभाजीनगर येथे झाला. यावेळी मोठ्या संख्येने नागरीकांची उपस्थिती होती.

### शिक्षक दांपत्यांनी उभारली 'पुस्तक' गुढी

**तुळजापूर, दि.३० मार्च -**



आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात, वाचन संस्कृती जतन करणे ही काळाची गरज आहे. कारण वाचनाने ज्ञानवृद्धी होते, विचारसरणी विकसित होते आणि समाजाला प्रगतीकडे घेऊन जाण्यास मदत होते. गुढीपाडव्याचे औचित्य साधून शिक्षक दांम्पत्याने आपल्या घरात पुस्तकांची गुढी उभा केली आहे. जि.प.प्राथ.शाळा जळकोटवाडी (नळ) येथे कार्यरत असणारे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त तथा तुळजापूर तालुका शिक्षक सोसायटीचे व्हा. चेअरमन अशोक राठोड व आयएसओ मानांकित जि.प.प्रा.शाळा मानमोडी शाळेच्या उपक्रमशील व आदर्श शिक्षिका सुचिता राठोड-चव्हाण यांनी आधुनिक काळात गेली तीन वर्षांपासून समाजासमोर पुस्तकाची गुढी उभारून वाचनाचा आदर्श ठेवत आहेत. त्यांनी आपल्या घरातच ग्रंथालय उभारले आहे.



### सोनबा येवले यांच्या नावाने पाणपोई

**धाराशिव, दि.३० मार्च -**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यंना पाणी देणाऱ्या सोनबा येवले यांच्याविषयी रमाई फाउंडेशनच्या वतीने सन २०१७ पासून ३० मार्च हा दिन समाजिक दायित्व दिन म्हणून साजरा केला जातो. गेल्या वर्षी सुरु केलेल्या पाणपोईला एक वर्षे पूर्ण झाले असून पाणपोईचा प्रथम वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा.रवी सुरवसे, सुशांत सोनवणे व बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती अध्यक्ष अक्षय शिंगाडे यांच्या हस्ते फीत कापून पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी रमाई फाउंडेशनचे संस्थापक पृथ्वीराज चिलवंत, सुनील बनसोडे, दिपक सरवदे, कुंदन चिलवंत, अतुल लष्करे, प्रभाकर सोनवणे, सतीश जेटीथोर, स्वराज जाणराव, सुनील माळाळे, शिलशांत वाघमारे (नांदेड), अमरशक्ती चिलवंत, रोहन शिंगाडे, विशाल बनसोडे, दिपक विधाते, महेश शिंगाडे, लहू खुणे, सम्यक चिलवंत, अनिकेत बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रदीप विधाते, रोहित बनसोडे, शौर्य गायकावाड, हर्षद बनसोडे, प्रेम माने, अर्हतविर चिलवंत आदिंनी सहकार्य केले.

### धोकादायक वाहन पार्किंगवर गुन्हा नोंदवला

**नळदुर्ग, दि.३० मार्च -**

नळदुर्ग बसस्थानकाच्या उजव्या गेटसमोर रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या वाहन उभे केले म्हणून आरोपी शायद अब्दुलगणी इनामदार याच्यावर पोलीसांच्या प्रथम खबरेवरून भारतीय दंड संहिता कलम २८५ अंतर्गत नळदुर्ग पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

## पिक विम्याचे रु. २५० कोटी आठवड्यात शेतकऱ्यांना मिळणार

### खरीप हंगाम-२०२४ चा पिक विमा... आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

खरीप हंगाम २०२४ मधील स्थानिक नैसर्गिक आपत्तीपोटी पिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी जवळपास रु.२५० कोटी पुढील आठवड्यात शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित असून राज्य शासनाचा व शेतकऱ्यांचा हिस्सा विमा कंपनीस उपलब्ध करून देण्याबाबतचा शासन निर्णय दि. २७ मार्च रोजी निर्गमित करण्यात आला आहे.



नैसर्गिक आपत्ती मुळे झालेल्या पिकाच्या नुकसानीपोटी रु. २५० कोटी पेक्षा जास्तीची रक्कम आठवडा भरातः ५ लाखाहून अधिक शेतक-यांच्या खात्यावर जमा होणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

खरीप हंगाम २०२४ मध्ये जिल्ह्यातील ७१९१६७ शेतकऱ्यांनी ५७९८१६.२१ हेक्टर क्षेत्रासाठी विमा संरक्षित केला होता. स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत ५४९७९१ शेतकऱ्यांनी नुकसानीच्या पुर्वसुचना दिल्या होत्या, त्यापैकी ५३२८२६ पुर्वसुचना पात्र झालेल्या आहेत. ५३२८२६ पात्र पुर्व सुचनापैकी ४७००७२ पुर्वसुचना या सोयाबीन पिकाच्या आहेत. या शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी अंदाजित रु. ६००० ते रु.६५०० विमा भरपाई मिळणे अपेक्षित आहे. काढणी पश्चात झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने पात्र ६०७८२ तक्रारीनुसार शेतकऱ्यांना रु. ७००० ते रु. ११००० पर्यंत नुकसान भरपाई मिळणे अभिप्रेत आहे.




महिनाखेर पर्यन्त ही रक्कम विमा कंपनीकडे उपलब्ध होवून शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग व्हावी यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता. आता सरकार कडून राज्य शासनाचा व शेतकऱ्यांचा हिस्सा विमा कंपनीस उपलब्ध करून देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामुळे लवकरच ही रक्कम विमा कंपनीस प्राप्त होईल व विमा कंपनीच्या माध्यमातून पुढील आठवड्यात प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यास सुरूवात होईल.

**शेतकऱ्यांची दिशाभूलीचा विरोधकांकडून केविलवाणा प्रयत्न...**

खरीप २०२४ पीक विम्या पोटी विमा कंपनी कडे रु. ५९६ कोटी रुपयांचा विमा हप्ता भरला व त्या बदल्यात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना केवळ २५० कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात येत असून उर्वरित ३४६ कोटी रुपये विमा कंपनीचा फायदा झाल्याचा कांगावा विरोधकांकडून केला जात आहे, मात्र यात त्यांची चूक नसून त्यांचे अज्ञान आहे. वस्तुतः मागील दोन वर्षांपासून राज्यात १००-८०-११० हे सूत्र वापरले जात असून कोणत्याही विमा कंपनीला फायद्याची रक्कम पुर्ण हप्त्याच्या वीस टक्क्यांपेक्षा अधिक दिली जात नाही. विरोधकांनी केवळ ठाकरे सरकारच्या काळात शेतकऱ्यांना का विमा मिळाला नाही, याचा शोध घ्यावा.



## कडकनाथवाडी सोसायटीवर कपालेश्वर पॅनलचा दणदणीत विजय

### १० जागा कपालेश्वर गटाला तर ३ जागा श्री म्हसोबा गटाला

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३० मार्च -**

वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी पंचवार्षिक निवडणूक दि.२९ मार्च रोजी पार पडली. मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी एकाच दिवशी असल्याने रात्री उशिरा निकाल जाहीर करण्यात आला.

निवडणूकीत कपालेश्वर शेतकरी विकास पॅनल आणि श्री म्हसोबा स्वाभिमानी सभासद बचाव पॅनल यांच्यात दुरंगी लढत झाली. ही निवडणूक अति चुरशीची ठरली. जरी या निवडणुका पक्षाच्या चिन्हावर लढल्या जात नसल्या तरी मात्र गावपातळीवर वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे ग्रुप पाहायला मिळाले.

या निवडणुकीत कपालेश्वर शेतकरी विकास पॅनलचा बहुमताने विजय झाला असून १३ जागा पैकी १० जागा कपालेश्वर शेतकरी पॅनला मिळाल्या तर श्री म्हसोबा स्वाभिमानी सभासद बचाव पॅनलचा निवडणुकीत पराभव झाला असून ३ जागांवर म्हसोबा पॅनलला समाधान मानावे लागले.

स्पष्ट बहुमत कपालेश्वर पॅनलला मिळाल्यामुळे कडकनाथवाडी विविध कार्यकारी सहकारी सोसायटी निवडणुकीत खरा म्हसोबा कपालेश्वर पॅनलला पावला म्हणावे लागेल.

## मुर्टा शिवारात बिबट्याचा धुमाकूळ; १० शेळ्यांचा पाडला फडशा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३० मार्च -**

पाडव्याच्या सणादिवशी बिबट्याने तुळजापुर तालुक्यातील मुर्टा शिवारात धुमाकुळ घातला आहे. त्याने रविवारी सकाळी तब्बल १० शेळ्यांचा फडशा पाडला आहे. या भागात वारंवार बिबट्या दिसत असतांना त्याला जेरबंद करण्यास वनविभाग असमर्थ ठरला आहे. बिबट्याची दहशत या परिसरात पसरली असुन वनविभागाने तात्काळ या बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे माजी उपजिल्हाप्रमुख कमलाकर चव्हाण यांनी केली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासुन तुळजापुर तालुक्यातील नळदुर्ग परीसर मुर्टा, श्रीक्षेत्र रामतीर्थ परीसर, कंदुरमळा यासह अनेक भागात बिबट्या दिसल्याचे अनेकजण सांगत आहेत. सध्या या परिसरात बिबट्याची मोठी दहशत पसरली आहे.

रविवारी सकाळी मुर्टा शिवारातील लक्ष्मण कोळी यांच्या दहा शेळ्यांचा फडशा बिबट्याने पाडला आहे. बिबट्याने एक शेळी सोबत नेली आहे तर इतर शेळ्या व बकऱ्यांना त्यांने ठार केले आहे. ऐन गुढी पाडवा सणाच्या दिवशी लक्ष्मण कोळी यांच्यावर हा दुर्दैवी प्रसंग ओढवला आहे. लक्ष्मण कोळी यांच्या दहा शेळ्या बिबट्याने ठार केल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शिवसेना ठाकरे गटाचे माजी उपजिल्हा प्रमुख कमलाकर चव्हाण यांनी याबाबतची माहिती वनविभागाला कळविली असुन वनविभागाने तात्काळ या बिबट्याला जेरबंद करण्यासाठी कारवाई करावी व लक्ष्मण कोळी यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी कमलाकर चव्हाण यांनी केली आहे.



बिबट्याने अनेक प्राण्यांचा बळी घेतला आहे, असे असताना बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभाग कांहीच उपाययोजना करीत नाही. नागरीकांनी बिबट्या पहिल्यानंतर वनविभागाला कळविले जाते यानंतर वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी त्याठिकाणी येऊन भेट देण्याचे नाटक करुन परत जातात. वनविभागाने या बिबट्याला जेरबंद करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. या बिबट्याची दहशत या परिसरात पसरली आहे.

## ज्वारीची चोरी; गुन्हा नोंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

वाशी पोलीस ठाण्यात नितीन झुंबर गपाट (वय ४३, रा. इंदापुर, ता. वाशी यांच्या फिर्यादीवरून २८-२९ मार्च २०२५ दरम्यान शेतातील ज्वारीचे ६०-६५ पोते चोरण्याचा गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, त्यांच्या शेतात ज्वारीचे पोते अंदाजे ३० हजार रुपये किंमतीचे ठेवले होते. २८ मार्च रात्री १० वाजल्यापासून २९ मार्च सकाळी १० वाजेपर्यंत अज्ञात व्यक्तीने पोते चोरून नेल्याची घटना घडली. पोलिस ठाण्यात भा.द. वि. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रवाशांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे भेट



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३० मार्च -**

कै.इंदुबाई रामभाऊ पुदाले यांच्या स्मरणार्थ अनिल पुदाले यांनी व कै.मनोहर डुकरे यांच्या स्मरणार्थ तुळजा ऋग्वेद इलेक्ट्रिकल ॲन्ड वल्लभ सोलार यांच्याकडुन बसस्थानक परिसरात प्रवाशांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे भेट देण्यात आले आहेत.

नळदुर्ग बसस्थानक परीसरात बसची वाट पाहत उभारलेल्या प्रवाशांना बसण्यासाठी कुठलीच व्यवस्था नाही. कांही महिन्यांपुर्वी सामाजिक कार्यकर्ते अण्णासाहेब दराडे यांनी नळदुर्ग बसस्थानकात प्रत्येकी पाच बाकडे भेट दिले आहेत.

बसस्थानकातील वाहतुक नियंत्रक महेश डुकरे यांच्याकडे सुपुर्द केले. यावेळी पत्रकार सुहास येडगे, विलास येडगे, उत्तम बनजगोळे, दादासाहेब बनसोडे, इरफान काजी उपस्थित होते.

## गुढीपाडव्यानिमित्त बाईक रॅली संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३० मार्च -**

गुढीपाडवा तसेच नवीन संवत्सर हिंदू नववर्ष शुभारंभ निमित्त हिंदू नववर्षाचे स्वागत करण्यासाठी धाराशिव शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने बाईक रॅली काढण्यात आली होती.या रॅलीची सुरुवात मध्यवर्ती प्रशासकीय इमारती समोरील महात्मा बसवेश्वर चौकातून झाली. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

या बाईक रॅली दरम्यान राजमाता जिजाऊ यांच्या चौकात पूजन करण्यात आले तसेच हिंदू धर्म पालक हिंदूंचे प्रेरणास्थान श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



या बाईक रॅलीत मध्यवर्ती शिवजयंती समितीचे अध्यक्ष संदीप इंगळे, माजी नगराध्यक्ष सुनील काकडे, माजी उपनगराध्यक्ष अभय इंगळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक ॲड.रवींद्र कदम, जिल्हा सरकारी वकील ॲड.महेंद्र देशमुख, सहाय्यक सरकारी वकील सचिन सूर्यवंशी, भाजपा नेते विनोद गपाट, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजे निंबाळकर, नगरसेवक अभिजीत काकडे, दाजी पवार, पत्रकार संघाचे अध्यक्ष देविदास पाठक तसेच शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे पदाधिकारी, शिवप्रतिष्ठानचे पदाधिकारी, सकल हिंदू समाजातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## बावी-तेरखेडा रस्त्यांचे काम नदीपात्रात; करोडो रुपये जाणार पाण्यात

### भूसंपादित जागेत नाही रस्त्याचे काम; सरपंचाची कारवाईची मागणी... रस्ता करणारा कंत्राटदार, भूसंपादित केलेल्या जमिनीचा मालक हे नातेवाईक असल्याचा ग्रामस्थांचा आरोप...

**तभा वृत्तसेवा/तालुका प्रतिनिधी**
**नळदुर्ग, दि.३० मार्च -**

वाशी तालुक्यातील बावी ते तेरखेडा या दोन गावांना जोडणारा बावी गावानजीकचा अनेक संकटांतून मिळालेली मंजूरी आणि तयार होणाऱ्या रस्त्यावरील मेहनतीसह करोडो रुपये पाण्यात जाण्याची शक्यता असून भुसंपादन केलेल्या केलेल्या जमिनीतून रस्ता न करता तो नदीपात्रात करण्यात येत आहे. यामुळे पुन्हा बावी ते तेरखेडा रस्त्यासाठी नेमण्यात आलेले रस्ता करणारा कंत्राटदार, लाखो रुपये घेऊन भूसंपादित केलेल्या जमिनीचा मालक हे नातेवाईक असल्याचा ग्रामस्थांकडून आरोप करण्यात आला आहे.

बावी ते तेरखेडा अंदाजे सात किलोमीटर अंतर आहे. यातील जवळपास पाच किलोमीटर रस्ता झालेला आहे. मात्र बावी गावानजदीक दोन किलोमीटर रस्ता हा नदीपात्रातून असल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. देश स्वतंत्र झाल्यापासून लोकांना नदीतून जावे लागत होते. पावसाळ्यात नदी ओसंडून वाहत असते. त्यामुळे नदीपात्रात चिखल आणि पाणी मोठ्या प्रमाणात येत असल्याने शेतकऱ्यांना शेतजमीन कसण्यासाठी जात असताना अडचणींचा सामना करावा लागत होता. अचानक वैद्यकीय समस्या उद्भवल्यास नागरिकांना उपचारासाठी वेळेवर दवाखान्यात दाखल करता येत नव्हते. रस्त्याअभावी नदीच्या पाण्यातून वाट काढावी लागत होती. प्रशासनाचं याकडे अनेक वर्षे झाली दुर्लक्ष होते. मागच्या दोन वर्षात शासनाने रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटवण्यासाठी कसून प्रयत्न सुरू केले. आणि नदीकाठच्या शेतकऱ्याला जमिनीचा मोठा मोबदला दिला आणि जमीन भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली. त्यानंतर शासनाने रस्त्याचे टेंडर काढून एका ठेकेदाराकडे काम दिले गेले.





स्वातंत्र्य मिळाल्यापासून गावाला रस्ता नसल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मात्र त्या आनंदात आता थोडा कडवटपणा आलेला दिसून येत आहे. बावी ग्रामपंचायत कार्यालयाने रस्ता चुकीच्या पद्धतीने केला जात असल्याने रस्त्याची तक्रार जिल्हाधिकारी व राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पत्र देऊन केली आहे. पत्रात अशी मागणी केली आहे, की रस्ता हा भूसंपादित झालेल्या क्षेत्रमध्ये होत नसून सदर पर्वीचा नाला वजा जाता रस्ता होणे अपेक्षित होते.

परंतु सदर पूर्वीच्या नाल्याच्या खुणा येथे आढळून येत नाहीत. तरी कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग धाराशिव, उपविभागीय अभियंता बांधकाम वाशी, भूअभिलेख वाशी या कार्यालयाने व कंत्राटदार यांनी संगणमताने रस्ता हा पूर्वीच्या नाल्यामध्ये करत आहेत. पर्वीचा नाल्यामध्ये भरपूर पाणी येत असल्यामुळे पाणी जाण्यास अडथला होऊन. रस्ता हा खचून जाण्याची दाट शक्यता आहे.

भूमिअभिलेख कार्यालयाने केलेली मोजणी सिट तपासून कारवाईची मागणी केली आहे. सदरील नाल्याची लांबी व रुंदी भूमीअभिलेख कार्यालयांनी स्पष्ट दर्शवलेली नाही. भूमीअभिलेख कार्यालय वाशी यांच्याकडे तोंडी विचारले असता माहिती देण्यास टाळाटाळ करत असल्याचे तक्रारीत सांगितले आहे.

ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाल्ला रस्त्याचे टेंडर नातेवाईकांला, रस्ता करणारा कंत्राटदार नातेवाईक आणि ज्याची जमीन रस्त्यासाठी भूसंपादित केली तो जवळचा नातेवाईक असल्याची माहिती ग्रामस्थांनी यावेळी दिली. यामुळेच भूसंपादित केलेल्या जमिनीतून रस्ता न करता नदीच्या क्षेत्रात करून नातेवाईकांची जमीन वाचवण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे बोलले जात आहे. यासंदर्भात एक्झिटिव्ह इंजिनियर बंडे यांच्याकडे संपर्क साधला असता त्यांनी फोन उचलला नाही.

> देश स्वातंत्र्य झाल्यापासून आमच्या गावाला रस्ता नव्हता. नदीच्या पाण्यातून वाट काढत रस्त्यासाठी संघर्ष करावा लागला. सरकारने भूसंपादन केलेल्या जमिनीचा शेतकऱ्याला लाखो रुपये मोबदला दिला आहे. तरी ठेकेदार सर्व संबंधित अधिकारी मिळून संगनमताने भूसंपादित केलेल्या जमिनीतून रस्ता न करता नदीच्या क्षेत्रात रस्त्याचे काम चालू आहे. तरी अधिकाऱ्यांनी यावर कारवाई नाही केल्यास. ग्रामस्थांना घेऊन उपोषण करणार आहे.
>
> **- संजय शिंदे, सरपंच, बावी.**

# यंदा सालगड्याचे ‘पॅकेज’ सव्वा लाखांवर

**तभा वृत्तसेवा**
**तामसा, दि.३० मार्च**

गुढीपाडव्यापासून नवीन सालगडी शोधण्याची शेतकऱ्यांची धावपळ सुरु झाली आहे. अलीकडच्या काळात कोणालाही शेतीच्या कामात 'नो इंटरेस्ट' असल्याने सालगड्यांची संख्या घटली. त्यात यंदा सालगड्यांचे 'पॅकेज' सव्वा लाखांवर गेल्यामुळे सालगडी मिळणे आणि सालगडी ठेवणे कठीण झाले आहे. आज गुढीपाडवा सण आहे. मात्र सालगडी मिळत नसल्याने शेतकऱ्यांकडून सालगड्यांचा शोध घेणे चालूच आहे.

‘गुढीपाडवा’ हा शेतकऱ्यांचा सण मोठ्या थाटात साजरा होत आहे. गुढपाडव्याच्या दिवशी दारात गुढ्या उभारून शेतकरी नव्या



सालगड्याच्या उपस्थितीत शेतावर ‘तास’ अर्थात औताचे पूजन करतात. दहावीस शेजारीपाजारी, मित्रमंडळी जेवायला घालून नवीन वर्षातील शेतीच्या मशागतीच्या कामाचा शुभारंभ करतात. गुढीपाडव्याच्या एक महिना अगोदरपासूनच नवीन सालगडी शोधण्याची मोहीम सुरू होते. अलीकडच्या काळात शेतीची किचकट कामे करण्यात तरुणांच्या 'नो इंटरेस्ट'मुळे सालगड्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकी राहीली आहे. वाढत्या महागाईने सालागड्यांच्या सालाच्या रक्कमेत विक्रमी वाढ झाल्याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. मागच्या वर्षी ऐंशी ते पंच्याशी हजार रुपये असणारे सालगड्याचे ‘पॅकेज’ यावर्षी सव्वा लाखांवर गेले आहे. त्यातही कामावर आल्याबरोबर नगदी अर्ध्या रक्कमेची उचल आहे. गहू, ज्वारीऊ, डाळ, शेतात राहण्यासाठी सुरक्षित घर, मुबलक पाणी आणि काही दिवसाच्या हक्काच्या सुट्ट्यांची देखील ‘डिमांड’ केली जात आहे. बऱ्याच गावात सालगडी मिळत नसल्याने बाहेगावाहून सालगडी मागवली आहेत. काही सालगडी अर्धवट साल सोडून पलायन करीत असल्याने शेतकरी नाईलाजास्तव वाटेकरी ठेवून तिसऱ्या किंवा अर्ध्या हिस्याने बटाईने किंबहुना खंडगुत्त्याने शेती देताना दिसत आहेत.

निसर्गाच्या पाण्यावर अवलंबुन असलेल्या शेतीच्या उत्पन्नात घट झाली आहे. सालगडी परवडत नसल्याने शेती घरीच ठेवून ट्रॅक्टरने मशागत व पेरणी करुन कापणी, मळणीची कामे यंत्राच्या सहाय्याने केली जात आहेत. मुलांचे शिक्षण, कुटुंबीयांचा उदरनिर्वाह, आरोग्य सगळा प्रपंच सालावरच अवलंबून असल्याने ‘पॅकेज’ वाढून मिळावे. अशी अपेक्षा सालगड्यांनी व्यक्त केली.

# खा. अशोक चव्हाण यांची श्रावण भिलवंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,३० मार्च**

राज्याचे माजी.मुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे खा. अशोक चव्हाण यांनी नरसीतील भाजपचे माजी सरचिटणीस तथा तुळजाभवानी जिनिंग फ्रेड्रेशनचे नवनिर्वाचित चेअरमन श्रावण भिलवंडेच्या निवासस्थांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी श्रावण भिलवंडे मित्र मंडळाच्या वतीने नरसी मुख्य चौकात फटाक्यांच्या आतिषबाजीत अभूतपूर्व जल्लोषात स्वागत केले.

तालुक्यातील सगरोळी येथील संस्कृती संवर्धन मंडळाचे संस्थापक कर्मयोगी के.ना तथा बाबासाहेब देशमुखांचा दि.२९ रोज शनिवारी जन्मशताब्दी सोहळ्याच्या अनुषंगाने राज्याचे खा.अशोक चव्हाण यांनी सगरोळीचे कर्मयोगी बाबासाहेब देशमुखांच्या या अविस्मरणीय जन्मशताब्दी सोहळ्याला प्रत्यक्ष भेट देत बाबासाहेब देशमुखांना यावेळी शुभेच्छा दिल्या. तद्नंतर सगरोळी ते नरसी मार्गे नांदेडकडे जात असतांना नुकतेच नरसी येथील भाजपाचे तथा श्री.तुळजा भवानी जिनिंग फ्रेड्रेशनचे चेअरमन श्रावण भिलवंडेनी सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणूकीत आपलं पॅनलच्या माध्यमातून १३ उमेदवार उभे करुन गांवकरी विकास पॅनलच्या अटीतटीच्या लढत देत १३ जागेपैकी ७ जागेवर विजय संपादन केला असुन उद्याच्या होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संवाद साधावा. या अनुषंगाने भाजपाचे श्रावण भिलवंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता. यावेळी श्रावण भिलवंडे मित्र मंडळाच्या वतीने खा. अशोक चव्हाण यांचे नरसीतील मुख्यचौकात क्रेनच्या सहाय्याने फुलांचा पुष्प हार घालून,जेसीबीच्या साह्याने फुलांची पुष्पवृष्टी करीत फटाक्यांची आतिषबाजीत अशा अभुतपूर्व जल्लोषात भव्य जंगी सत्कार करण्यात आला. तद्नंतर हजारो जन सुमुदायांच्या उपस्थितीत मुख्य चौका पासून पारंपारिक पध्दतीचे हलगी वाद्य वाजवत निवासस्थानापर्यंत उघड्या रॅली काढण्यात आली. ही रॅली निवासस्थानी पोहचल्यानंतर श्रावण भिलवंडे यांच्या सुविद्य पत्नी इंदुताई यांच्या हस्ते खा. अशोक चव्हाण यांचे औक्षण करण्यात आले. तद्नंतर श्रावण भिलवंडे यांच्या नेतृत्वाखाली नव्यानेच सेवा सहकारी सोसायटीवर विजय संपादित केल्यामुळे खा. अशोक चव्हाण यांच्या हस्ते सर्व प्रथम श्रावण भिलवंडे यांचा सर्व विजयी उमेदवारांचे पुष्पहार घालून यथोचित सत्कार ही करण्यात आला. यानंतर भाजपा पक्षाचा राज्यातील विविध विकास कामांचा पत्रकार परिषदेत संवाद साधण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, माजी महापौर दिलीप स्वामी, भाजपाचे प्रवक्ते संतोष पांडागळे, बालाजी बच्चेवार, पत्रकार संघाचे माजी जिल्हाध्यक्ष सूर्यकांत सोनखेडकर, नरसीतील माजी सरपंच व्यंकट विश्वनाथराव कोकणे, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष गंगाधरराव वडगांवे, भीमराव पांचाळ, कैलास पांचाळ, आनंदराव सूर्यवंशी, शंकर कल्याण, आनंदराव बावणे, वसंत कस्तुरे, रमेश वासरे, राम खनपट्टे, मारोती बुक्के, जनाजी खनपट्टे, होटाळ्याचे माजी सरपंच दत्तात्रय पाटील पवार, धनराज शिरोळे, बालाजी चिंतावर, मारोतराव वडगावे, चंद्रशेखर कोकणे , रमेश वासरे, राजू वडगावे, खलिल शेख आदीसह भाजपाचे पक्षाचे पदाधिकारी मंडळीची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**श्रावण भिलवंडेंना भक्कम पाठिंबा : खा. अशोकचव्हाण**

राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी श्रावण भिलवंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता यावेळी ते म्हणाले की यापूर्वी मी अनेकवेळा नरसीत आलोय. परंतु श्रावण भिलवंडे यांच्या निवासस्थानी मी पहिल्यांदाच आलोय. हा दुग्धशर्करा योग म्हणावा लागेल. यापुढे श्रावण भिलवंडेच्या राजकीय कारकीर्दीला माझा आशीर्वादरुपी भक्कम पाठिंबा राहील अशी ग्वाही त्यांनी दिली.

## संक्षिप्त वृत्त



### एसटी महामंडळ नांदेड विभागीय सार्वजनिक भिमजयंती मंडळ कार्यकारिणीची जाहीर

**नांदेड**-प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागाच्यावतीने भारतरत्न, क्रांतीसुर्य, संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती सार्वजनिकरित्या मोठ्या हर्षोउत्हासात साजरी करण्याच्या संदर्भाने दि.२७ मार्च गुरूवार रोजी दुपारी १ वाजता एसटी मध्यवर्ती बसस्थानक नांदेड येथील रेस्टहाऊसमध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी विभाग नियंत्रक डॉ.चंद्रकांत वडस्कर हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून विभागीय कामगार अधिकारी लक्ष्मीकांत गवारे, आगार व्यवस्थापक अनिकेत बल्हाळ, बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, वाहतुक निरीक्षक मयुर तेलंगे, श्रमिक संघटनांचे पदाधिकारी कार्यकर्ते, कामगार-कर्मचारी सौ.आम्रपाली जमदाडे, रघुनाथराव वाघमारे, बाळू हाटकर, राजेश कांबळे, निर्दोष पवार, एसटी मेक्॑निक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, चंद्रकांत पांचाळ, राहुल गजभारे, यशोदीप अटकोरे, रामेश्वर कांबळे, सिद्धार्थ जोंधळे, राहुल कोकाटे, केशव टोनगे, राजेश शेळके, संजय दुधमल, सुनिल मोरे, गणेश कळसे, अनिल अत्रे, मनोहर माळगे, देविदास दुम्पलवार, दिवसे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.चंद्रकांत वडस्कर, लक्ष्मीकांत गवारे, अनिकेत बल्हाळ यांनी या बैठकीला मार्गदर्शन करून सर्वांनुमते खालीलप्रमाणे कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली. अध्यक्ष म्हणून डॉ.चंद्रकांत वडस्कर, कार्याध्यक्ष अशोक कांबळे, सचिव लक्ष्मीकांत गवारे, सहसचिव राहुल गजभारे, कोषाध्यक्ष गणेश कळसे, सदस्य म्हणून सर्व श्रमिक संघटनेचे पदसिद्ध पदाधिकारी राहतील अशा प्रकारे सार्वजनिक भिमजयंती मंडळाची कार्यकारिणीची निवड घोषीत करण्यात आली. या बैठकीचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचालन गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले तर आभार संतोष ढोले यांनी मांडले. याप्रसंगी नांदेड आगार, विभागीय कार्यालय, वर्कशॉप, टिआरपी (टायर प्लांट) येथील कामगार-कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

### आदमपूर येथे सर्वधर्मीय अखंड शिवनाम, शिवकथा सप्ताह प्रारंभ

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे १७ वा सर्वधर्मीय अखंड शिवनाम व शिवमहापुरान कथा व शिवदिक्षा रविवार दि.३०



मार्च रोजी थोर गुरूवर्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभ झाले आहे.शिवकथाकार म्हणून निलंगा येथील म.नि.प्र.संगनबसव महास्वामीजी विरक्त यांच्या रसाळ वाणीतून या संगीतमय शिवकथा ज्ञानयज्ञ सोहळ्याची श्रवणीय अनुभूती दैनंदिन भक्तांना मिळणार आहे. अनुक्रमे रविवार दि.३० मार्च रोजी शि.भ.प. कावेरी किशनराव मुदखेडे,शि.भ.प.स्वातीताई तमशेट्टे, शि.भ.प.भुषण स्वामी वखारीकर, शि.भ.प.अमोल महाराज बनवसकर,शि.भ.प.डॉ.अखिलेश स्वामी वसमतकर,श्री.१०८,सद्गुरू सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर,(टाळ आरती वरील किर्तन दुपारी शि.भ.प.मन्मथ महाराज कुऱ्हाडे)तद्नंतर शि.भ.प.महादेवीताई अक्कलकोट अखेर दि.०६ एप्रिल रोजी शि.भ.प.नाथसेवक परमहंस गोरक्षनाथजी स्वामी रामलिंगेश्वर लाबोटा यांचे महाप्रसादावरील किर्तन संपन्न होईल. रविवार दि.३० मार्च पासून अनुक्रमे सलीम पिंजारी, अनिल हालबुर्गे,राम बिद्राळे, मारोती इबिते,डॉ.राहुल माका देगलूर,बसवंत मुंडकर शेवटी गुत्तेदार बाबुराव हालबुर्गे या सर्व शिव भक्तांच्या वतीने दररोज गावकरी भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम अनुक्रमे पहाटे शिवपाठ,सकाळी रूद्राभिषेक, परमरहस्य पारायण, आशिर्वचन,भोजन विश्रांती,दुपारीशिवमहापुरान कथा,सायंकाळी गाथा भजन शिवपाठ,महाप्रसाद आस्वाद,विश्रांती, रात्री शिवकिर्तन, शिवजागर २ वाजेपर्यंत नित्यक्रम नियमित सुरू राहील.कलावंत शि.भ.प.मरूळसिद्ध पळसकर, आकाश हसनाळे, जनार्दन बेंद्रीकर,हावगी स्वामी पन्नासे,पांडुरंग शेवाळकर,अशोक हालबुर्गे यांचा सहभाग आहे. सदरील सोहळ्यात विविध भागातील गायक,गायिका, विणेकरी, वादक,व्यासपीठ प्रमुख, पारायण प्रमुख, शिवपाठ प्रमुख,चोपदार,पूजारी,अन्नदाते आणि गाव परिसरातील आचारी, अनुयायी यांचा विशेष सहभाग असणार आहे. आदमपूर गाव परिसरातील सदभक्तांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन समस्त गावकरी मंडळी आदमपूर यांनी केले आहे.

### छळवणूक संबंधीच्या तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी शितल कांबळे

**अर्धापूर**-अर्धापूर पंचायत समितीच्या शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या छळवणूक संबंधीच्या तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या कनिष्ठ सहाय्यक शितल गौतम कांबळे यांची निवड करण्यात आली. शासन निर्णयान्वये शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळवणूक संबंधीच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी या कार्यालयातील महिला अधिकारी / कर्मचाऱ्यांची व अशासकीय महिला सदस्यांचा समावेश करून तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली. या तक्रार निवारण समितीत अध्यक्ष शितल गौतम कांबळे, उपाध्यक्ष प्रतिमा सिध्दोधन गोणारकर, सचिव गोदावरी लक्ष्मणराव बुडकेवार, सदस्य अनुसया काळे, अशासकीय सदस्य रामचंद्र माणिका मनपुर्वे यांची निवड करून समिती गठीत करण्यात आली. अर्धापूर पंचायत समितीच्या महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी शितल कांबळे यांची निवड झाल्याबद्दल पंचायत समितीच्या वतिने स्वागत करण्यात आले.

# लिफ फॉरवर्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत इस्लापूरचे तीन विद्यार्थी फायनलसाठी पात्र

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ३० मार्च**

मुंबई येथील खाजगी संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या लीप फॉरवर्ड या इंग्रजी परीक्षेत किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील सावरकर नगर जि. प. प्राथमीक शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी सेमी फायनल मध्ये पोहोचल्याने त्या विद्यार्थ्यांचा सत्कार व त्यांना प्रमाणपत्र स्कूल बॅग बॉटल टिफिन स्टडी टेबल हे लीप फॉरवर्ड च्या प्रतिनिधी मीनाक्षी देशमुख व श्रुती चोरगे यांनी दिला . त्यावेळी सरपंच प्रतिनिधी नारायण शिंगारे पप्पू पळसपुरे गौरव कदम गजानन कदम शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य जगदीप हानवते बालाजी गुलजारवाड प्रमोद जाधव बिरादार ,मुख्याध्यापक अडबलवार मॅडम,तसेच शिक्षक पांडे ,बालाजी तोंडारे डॉ . गोणेवारहे उपस्थित होते.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जि. प. प्राथमीक शाळा सावरकरनगर इस्लापूर येथील विद्यार्थ्यांनी इंग्रजी शब्दार्थ वाचन स्पर्धेसाठी वर्ल्ड चॅम्पियनशिप या स्पर्धेत सहभाग घेतला होता या स्पर्धेत राज्यातून २५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यापैकी सेमी फायनल पर्यंत राज्यात २४ विद्यार्थी सेमी फायनल साठी पात्र ठरले असून नांदेड जिल्ह्यातून चार तर किनवट तालुक्यातील तीन असे विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत . विशेष म्हणजे या परीक्षेसाठी इस्लापूर येथील जि प प्राथमीक शाळेचे विद्यार्थी कार्तिकी बिराजदार वर्ग दुसरा , शर्वरी भुरके वर्ग ३ रा व श्रीराम गोपणवाड वर्ग चौथा, या विद्यार्थ्यांनी लिफ फॉरवर्ड वर्ल्ड पावर चॅम्पियनशिप या स्पर्धेमध्ये सेमी फायनल मध्ये पोहोचल्यामुळे त्यांचा व त्यांच्या आई-वडिलांचा शाळे तर्फेशाल श्रीफळ देऊन कौतुक व गौरवण्यात आला.

श्रीराम गोपणवाड ,यांचे वडील इस्लापूर येथे एका स्टॉलवर डोसा इडली विकून आपल्या पोटाची खळणी भागवतात त्याचाच मुलगा आज या लिफ फॉरवर्ड वर्ल्ड पावर चॅम्पियनशिप स्पर्धेत सेमी फायनल पर्यंत पोहोचल्याने या गरीब घराण्यातल्या विद्यार्थ्यांची सर्वत्र कौतुक होत आहे.

सतत दोन वेळेस अतिदुर्गम आदिवासी भागातील एका जिल्हा प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय लेव्हल पर्यंत घेऊन जाणाऱ्या शिक्षक इर्शाद पांडे, यांचे तालुका भर कौतुक होत आहे.

लिफ फॉरवर्ड वर्ल्ड पावर चॅम्पियनशिप स्पर्धेत नांदेड जिल्ह्यातून चार विद्यार्थी एक हदगाव , तर तीन किनवट तालुक्यातील इस्लापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरकरनगर ,येथील तीन विद्यार्थी,सेमी फायनल साठी पात्र ठरले आहेत.

# हजापूर शिवारात चंद्रपुरच्या महाकाली देवीची मूर्ती आढळल्याने चर्चेला उधान

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.३० मार्च**

तालुक्यातील हाजापूर चिकाळा तांडा मोठा शिवारातील शिवेवर खडकाळ जमिनीच्या ठिकाणी देवीची मूर्ती आढळल्यामुळे २८ मार्च रोजी तालुक्यात वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे.

सदरिल माहिती अशी की, हाजापूर येथील पोतराज व देवकर म्हणून परिचित असलेले लक्ष्मण डुबुकवाड यांनी हजापूर शिवारात मूर्ती आढळल्याची माहिती हजापूरचे पोलीस पाटील सिताराम मात्रे यांना दिली त्यावरून त्यांनी भ्रमणध्वनी संदेशाद्वारे सदर घटनेची माहिती पोलीस प्रशासनास कळविले असल्याचे समजते. २८ मार्च रोजी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान सदर देवीची मूर्ती आढळली किंवा प्रकट झाली असल्याची चर्चा परिसरामध्ये वाऱ्यासारखी पसरून त्या ठिकाणी अनेकांनी घटनास्थळी मूर्ती पाहण्यासाठी एक उत्सुकता म्हणून भेट दिली दरम्यान चंद्रपूरची देवी महाकाली यांची सदरची भरीव मूर्ती असल्याचे चर्चिल्या जात असून आढळलेली मूर्ती पितळाची की सोन्याची या वेगवेगळ्या चर्चेला तूर्तास उधाण आले आहे. दरम्यान घटनास्थळी मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक बि. आर. कांबळे, पोलीस उप निरीक्षक शिवाजी शिंदे यांच्यासह अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. त्या ठिकाणी दोन होमगार्डच्या जवानांना बंदोबस्तासाठी ठेवण्यात आले आहे. याबाबत प्रस्तुत प्रतिनिधींनी तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला असता सदर घटनेच्या अनुषंगाने माहिती घेऊन शासन स्तरावरील योग्य त्या तरतुदीनुसार कारवाई केली जाईल असे त्यांनी बोलताना सांगितले आहे.

# उपवर्गीकरणाच्या आंदोलनासाठी किनवट-माहूर तालुक्यातून हजारो कार्यकर्ते मुंबईला जाणार : शंकर भंडारे

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.३० मार्च**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरनाची तात्काळ अंमलबजावणी करावी या मागणीसाठी २० मे रोजी मुंबई येथील आझाद मैदानात ५ लक्ष समाजबांधवाच्या उपस्थितीत भव्य आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधले जाणार असून या आंदोलनासाठी किनवट



माहूर तालुक्यातून हजारो युवा कार्यकर्ते मुंबईला जाणार आहेत अशी माहिती युवानेते शंकर भंडारे यांनी पत्रकारांसी बोलताना दिली आहे. अनु. जातीमधील उपवर्गीकरनासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी महत्वपूर्ण निर्णय दिला असून या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र शासनाने त्वरित उपवर्गीकरणाचा आराखडा तयार करावा आणि त्याची अंमलबजावणी करावी, अशी ठाम भूमिका मातंग समाजाने मांडली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्यासाठी आराखडा तयार करावा,या प्रक्रियेसाठी समिती गठित करून त्वरित निर्णय घ्यावा, अनुसूचित जातींमधील सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास घटकांना न्याय मिळावा, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत पारदर्शकता ठेवून त्याचा लाभ गरजू घटकांपर्यंत पोहोचावा अशा सकल मातंग समाजाच्या मागण्या असून या मागण्याकडे सरकारचे लक्ष वेधन्यासाठी २० मे २०२५ रोजी मुंबई येथील आझाद मैदानात ५ लक्ष समाज बांधवांच्या उपस्थितीत भव्य आंदोलन होणार आहे. या आंदोलनासाठी किनवट माहूर तालुक्यातून हजारो युवाकार्यकर्ते मुंबईला जाणार असल्याची माहिती युवानेते शंकर भंडारे यांनी दिली आहे.

# विद्यापीठाच्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पनवेलचा यश पाटील प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३० मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सव व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयाचा यश पाटील याने प्रथम क्रमांक पटकाविला.



या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यासह गोवा येथील अनेक स्पर्धकांनी हजेरी लावली होती. गोव्यासह राज्यातील एकूण १८ विद्यापीठातील ७८ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेवून दर्जेदार सादरीकरण केले. या स्पर्धेत पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयाचा यश पाटील हा विद्यार्थी प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. २१००० रू, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा तेजस पाटील हा उपविजेता ठरला. १५,००० रू प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तर बी.जे. एस. महाविद्यालय पुणे येथील गोविंद भांड हा सर्वतृतीय ठरला. ११,००० रू. स्मृतिचिन्ह देऊन त्याचा गौरव करण्यात आला. तर १) श्रुती बोरस्ते (एचपीटी महाविद्यालय, नाशिक), २) ऋतुजा पवार (डी.के.टीई महाविद्यालय, इचलकरंजी), ३) पुंडलिक घाटोळ (स्वारातीम विद्यापीठ परिसर, नांदेड), ४) अभय आळशी (वझे महाविद्यालय, मुंबई) आणि ५) कु.धनश्री जाधव (शासकीय महाविद्यालय, साखळी, गोवा) या पाच स्पर्धकांना प्रत्येकी २००० रू. स्मृतिचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. जवळपास सलग दहा तास चाललेल्या या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान, पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर, भारतीय शिक्षण पद्धती, विकसित भारत आणि राष्ट्र विकासात माझी भूमिका या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी करून स्पर्धा गाजवून या स्पर्धेला चार चाँद लावले. यावेळी सभागृहात विद्यार्थी व श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य इंजि. नारायण चौधरी, डॉ. हनुमंत कंधारकर, अधिसभा सदस्य अॅड. युवराज पाटील, डॉ.विजय भोपाळे, शिवाजी चांदणे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदींनी विजेत्या स्पर्धकांचे भरभरून कौतुक करून शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. संदीप काळे तर आभार प्रदर्शन सिनेट सदस्य डॉ. विजय भोपाळे यांनी केले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. अविनाश कदम, डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, डॉ.गजानन पाटील, डॉ. पांडुरंग पांचाळ व विद्यार्थी विकास विभागाचे कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# झुंजवादी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी आ. कोहळीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३० मार्च**



९ वे अखिल भारतीय झुंजवादी साहित्य संमेलन मानवाडी ता. हदगाव येथील हनुमान संस्थान मानवाडी-आंबाळा सभागृहात दि. १९ एप्रिल रोजी होणार आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नुकतीच मानवाडी येथील हनुमान मंदिर संस्थानमध्ये ह.भ.प. गणपतराव पवार गुरूजी यांच्या अध्यक्षतेखाली एक व्यापक बैठक घेण्यात आली. या बैठकीस संस्थानचे रामराव पवार, दत्तराव पवार, ह.भ.प. दिगंबर पवार, दाजीबा पवार, विनायक पवार, बाबुराव पवार हे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच या बैठकीस प्राचार्य सू.ग. चव्हाण, प्राचार्य डॉ. आ.वि. कल्याणकर, उत्तम मुधोळ तालंगकर, राजकमलसिंघ गाडीवाले यांची उपस्थिती होती.

# धनगर समाजाच्या विकासासाठी उपाययोजना करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.३० मार्च**

धनगर समाज संघर्ष समितीचे युवक प्रदेशअध्यक्ष अमन कुंडगीर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज आणि विधान परिषद सभापती राम शिंदे यांची मुंबई येथे विधानभवनात नुकतीच भेट घेतली असून यावेळी त्यांनी समाजाच्या विविध प्रश्नावर उपाययोजना करण्याचे निवेदन देऊन माहूर येथे दर्शनासाठी येण्याचे निमंत्रण सभापती राम शिंदे यांना दिले आहे.

राज्यातील धनगर समाजाचे अनेक प्रश्न शासन दरबारी प्रलंबित आहेत.धनगर समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने काही आर्थिक शैक्षणिक व सामाजिक सोयी सवलती लागू कराव्यात यासाठी धनगर



समाज संघर्ष समितीचे युवक प्रदेशाध्यक्ष अमन कुंडगिरे हे सातत्याने लढा देत आहेत. दरम्यान पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांची त्यांनी मुंबई येथील विधान भवनात नुकतीच भेट घेतली असून या भेटीदरम्यान धनगर समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक उन्नतीसाठी आवश्यक उपाययोजना राबवण्याबाबत सभापती महोदयांना निवेदन दिले. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठापैकी एक प्रमुख पीठ असलेले श्रीक्षेत्र माहूर हे ऐतिहासिक, धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठिकाण असल्यामुळे आपण परिवारासमवेत श्रीक्षेत्र माहूर येथे दर्शनासाठी यावे अशी विनंती अमन कुंडगीर यांनी सभापती राम शिंदे यांना केली आहे. तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा जागर देशभरात व्हावा यासाठी त्यांची ३०० वी जयंती राष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात साजरी करावी अशी मागणीनी कुंडगीर यांनी निवेदनात केली आहे. याप्रसंगी धनगर समाज संघर्ष समितीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदमपूर मस्जिद हाफिज व रोजेदार यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर, दि. ३० मार्च**

मुस्लिम बांधवांचा पवित्र रमज़ान महिना सध्या सुरू आहे.या महिन्यातील शेवटचे दहा दिवस अनुयायांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण असे असतात.गुरुवार दि.२७ मार्च रोजी 'शब-ए-कद्र' अर्थात बडीरात (मोठी पुण्याची रात्र)हा पर्व मशीद व घरादारांतून आनंदाने साजरा करण्यात आला.या पर्वाचे औचित्य साधत बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील जामा-मस्जिद मधील कार्यरत मौलाना हाफिज सय्यद आदमसाब मुतन्याळकर व छोटे रोजेदार (अर्थात एक महिन्याचे रोजे पूर्ण करणारे बालक) यांचा मस्जिद समितीतर्फे रात्री यथोचित सत्कार करण्यात आला. एक महिना रमज़ान पर्वात आदमपूर येथील मस्जिदमध्ये हाफिज आदमसाब यांनी अखंडित तीस पारे(अर्थात तोंडपाठ कुराण पठण नियमित मशीदीत सादर)केले आहे.त्याचबरोबर मोठ्या अनुयायी लोकांसोबत मोहल्ल्यातील शेख अक्रम व शेख समीर या बालकांनी उन्हातान्हात न चुकवता नियमित एक महिन्याचे रोजे(उपवास)पूर्ण करीत आहेत.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातुरात शॉर्टसर्किटने गोडाऊन जळून खाक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** शहरातील जुना बार्शी रोडवरील एका बारदाणा गोडाऊनला शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत वेगवेगळ्या प्रकारची पोती जळून खाक झाली आहेत. शनिवारी दुपारी धगधगत्या उन्हातच आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने यामध्ये जिवीतहानी झाली नाही.

शहरालगतच्या जुन्या बार्शीरोड परिसरात महेश गायकवाड यांचे मधुकर बारदाणा ट्रेडर्स नावाने गोडाऊन आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागात कमी-अधिक दाबाने विद्युत पुरवठा होत आहे. यासंबंधिची तक्रार परिसरातील नागरिकांनी महावितरणकडेही केली होती. मात्र, याकडे कानाडोळा केल्याने अखेर अनर्थ हा घडलाच आहे.

मधुकर बारदाणा ट्रेडर्स भोवती विद्युत तारांचा गराडा आहे. यातूनच शॉर्टसर्किट झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तिवला जात आहे. या गोडाऊनमध्ये प्लॅस्टिक, गुळाची तसेच तुरीचे पोते होती. यामध्ये १५ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे गोडाऊन मालक महेश गायकवाड यांनी सांगितले. घटनास्थळी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे कर्मचारी दाखल झाले होते तर अग्निशमन दलाच्या दोन गाड्यांनी ही आग आटोक्यात आणली. महावितरणचा मनमानी कारभार

एकीकडे वसुलीसाठी एक ना अनेक यंत्रणा राबवून ग्राहकांच्या मागे तगादा लावला जात आहे. मात्र, गेल्या महिन्याभरापासून संगीत विद्यालयाच्या पाठीमागे असलेल्या मथुरा नगरी येथील रोहित्रावरुन कमी-अधिक दाबाने विद्युतपुरवठा होत आहे. त्यामुळे अनेकांची उपकरणे जळून खाक झाली आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## बाजार समितीत हरभरा, तुरीची आवक वाढली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** शेतीमालाच्या घटत्या दरामुळे येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आवक घटली होती. त्यामुळे बाजारपेठेत मरगळ आली होती. मात्र, गुढीपाडव्याच्या निमित्ताने का होईना आवकमध्ये वाढ झाली आहे. ही आवक टिकून राहणार की तात्पूर्ती असणार याकडे लक्ष लागले आहे.

येथील बाजार समितीचे अर्थकारण हे खरिपातील सोयाबीन आणि रब्बीतील हरभरा याच पिकावर अवलंबून असते. या दोन्ही मुख्य पिकाच्या दरात कमालीची घट झाली आहे. त्यामुळे विक्रीसाठी शेतकऱ्यांनी आखडता हात घेतला असून शेतीमाल साठवणुकीवरच भर दिला होता. त्यामुळे दिवसाकाठी सोयाबीनची २ ते ३ हजार व हरभ्याची १ ते दीड हजार क्विंटल एवढीच आवक होती. मात्र, गुढीपाडव्याच्या तोंडावर सोयाबीन, हरभरा, तूर या मुख्य पिकांसह रब्बी ज्वारी चिंच, चिंचुका, राजम्याची आवक वाढली आहे. दर स्थिर असतानाही सणासाठी चार पैसे असावेत याच उद्देशाने शेतकऱ्यांनी साठवणुकीतील माल विक्रीसाठी काढला आहे. त्यामुळेच शुक्रवारी हरभऱ्याची ५ हजार ८५५, तुरीची १ हजार ४१९ तर सोयाबीनची ६ हजार क्विंटलची आवक होती. सणामुळे शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्रीचा निर्णय घेतला असला तरी यामध्ये सातत्य राहिलच असे नाही.

## पुढचा जन्म मिळालाच तर शिक्षक होणे आवडेल : प्रा. कोल्हे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** निरोपाचा क्षण हा भावनिक क्षण असतो. गेल्या तीन वर्षापासून विद्यार्थी तयार करत असताना खूप आनंद मिळाला. विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी लावण्यासाठी सर्व शिक्षकांनी अपार मेहनत घेतली. पण हेच विद्यार्थी आज सोडून जाताना मनामध्ये एक अस्वस्थता वाटत आहे. म्हणूनच मला असं वाटते की जर ईश्वराने पुढचा जन्म मला दिलाच तर पुन्हा एकदा मला शिक्षक होणे आवडेल. असे प्रतिपादन प्राचार्य श्रीधर कोल्हे यांनी केले.

येथील जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये आयोजित केलेल्या बी.ए., बी.कॉम तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य श्रीधर कोल्हे, प्रमुख पाहुणे डॉ. सुधीर माने, डॉ. दिलीप गुंजरगे, डॉ. रामेश्वर स्वामी डॉ. समीना शेख, प्रा. सुवर्णा शिंदे, प्रा. प्रज्ञा स्वामी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. समीना शेख यांनी केले तर सूत्रसंचालन हर्षवर्धन बिराजदार व आभार हर्षवर्धन काळे यांनी मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शरद ईगवे, युगप्रवर्तक लोखंडे, साक्षी माने, शेख वसीम, अजय खोसे, सुनील चव्हाण, तुषार येरमुळे, नवनाथ सूर्यवंशी, अनिकेत भालेराव यांनी परिश्रम घेतले.

## 'अंकुर'मध्ये आजी-आजोबाचा पाद्यपूजन सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** येथील अंकुर बाल विकास केंद्रात संस्कारक्षम सोहळा संपन्न झाला. संस्थेतर्फे आजी-आजोबा पाद्यपूजन कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थी आणि शिक्षकांनी आपल्या वृद्ध स्नेहींच्या सेवाभावाचे प्रतिक म्हणून त्यांच्या चरणी नतमस्तक होत त्यांचा सन्मान केला. कार्यक्रमास सर्व विद्यार्थ्यांचे आजी आजोबा उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांसाठी विशेष गीत सादर केले, तर काही विद्यार्थ्यांनी त्यांच्या अनुभवांवर आधारीत भावस्पर्शी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजनाबद्दल शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी योगेश सिरसाट, महानंदा बिराजदार, पंडित गायकवाड, संघपाल शिंदे, पंचफुला बुये, कृष्णा पांचाळ, प्रेमचंद गायकवाड, लोंढे जयश्री, जाधव अमृता, नानासाहेब पांडुळे, निलेश पांढरे, जोशी आदिती, अनिल मोरे, जमादार विद्या, रेड्डी वर्षा, बिराजदार स्वरांजली, सुरवसे प्रीती, जगताप अनुसया, सूर्यवंशी निखिल, सूर्यवंशी प्रमिला, कदम अस्मिता, खुडे भागवत, गवळी कोमल, बोरे शितल आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## 'सायबर सुरक्षेसाठी' धावले लातूरकर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** सायबर सुरक्षा बद्दल जनजागृती व्हावी यासाठी जिल्हा पोलिस दलाच्या वतीने 'एक धाव सायबर सुरक्षेसाठी' या शीर्षकाखाली मॅरेथॉन चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयीन मुले, मुली, नागरिक, जेष्ठ नागरिक, सामाजिक संस्था यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता.

समाजामध्ये मोठ्या प्रमाणात इंटरनेट व मोबाईलचा वापर वाढला त्या सोबतच सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक, ब्लॅकमेलिंग ई प्रकार वाढत आहेत. जनतेमध्ये सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती व्हावी याकरिता लातूर पोलिसांकडून रविवार, दि. ३० मार्च रोजी पहाटे ५ वाजता मॅरेथॉन स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यात ८ हजारांपेक्षा जास्त स्पर्धकांनी राज्याच्या विविध जिल्ह्यातून सहभाग नोंदविला.

मॅरेथॉनला जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे, पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, जि. प. चे सी ई ओ राहुल कुमार मीना, अपर पोलिस अधीक्षक अजय देवरे यांनी झेंडा दाखवून शुभारंभ केला. त्या नंतर ५ कि. मी. व ३ कि. मी. प्रकारातील स्पर्धकांना सोडण्यात आले.

मॅरेथॉन मार्गावर विविध शाळांतील जवळपास १ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धकांना प्रोत्साहन देऊन सायबर सुरक्षितेचे फलक घेऊन जनजागृतीचे काम केले. तसेच स्पर्धा मार्गावर विविध ठिकाणी संगीत व म्युझिक ग्रुप्सनी भाग घेऊन स्पर्धकांचे व नागरिकांचे मनोरंजन केले.

१० व ०५ कि. मी. मॅरेथॉनमध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांना रोख बक्षीस, मेडल देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत लातूर शहरातील विविध सायकलिस्ट, मॉर्निंग वॉकिंग ग्रुप्स, दिव्यांग ग्रुप तसेच विविध सामाजिक संस्थांनी सहभाग नोंदविला.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे, पोलिस अधीक्षक सोमय मुंडे व सी ई ओ राहुलकुमार मीना यांनी स्पर्धकांना मार्गदर्शन करून भविष्यात यापुढेही लातूर मध्ये मॅरॉथॉन आयोजनाबाबत सकारात्मकता दर्शवली.

सदर मॅरेथॉनमध्ये लातूर पोलिसांकडून अतिशय उत्तम व्यवस्थापन करण्यात आले होते. यामध्ये फुड पॅकिट्स, एनर्जी ड्रिंक्स, पाणी बॉटल्स, केळी तसेच वैद्यकीय पथक, फिजिओथेरपी पथक, ॲम्ब्युलन्स, झुंबा डान्स, पारंपारिक शिवकालीन शस्त्रांचे कौशल्ये ठेवण्यात आली होती. स्पर्धेकरिता कीर्ती ऑईल, सनरीच अक्का, भारती- गित्ते ग्रुप, शारदा उद्योग, लक्ष्मी मंगलकार्य, मंत्री डिव्होलपर्स, माऊली ज्वेलर्स, दयानंद शिक्षण संस्था, व्हेज हॉटेल असो, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो आदींनी सहकार्य केले. झुंबा डान्सचे प्रिती मिसाळ, सोहेल शेख यांचे टीमने सादरीकरण केले.

सदर मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सर्व पोलिस अधिकारी व अमलदार यांनी परिश्रम घेतले. निवेदन बालाजी सुळ व सहाय्यक पोलीस निरीक्षक दयानंद पाटील यांनी केले.

## लातूर-हैदराबाद बसच्या चालक, वाहकांची मनमानी

### तर रास्ता रोको आंदोलनाचा सरपंचाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** गेली अनेक वर्षांपासून हलगरा गावातून ये-जा करणारी लातूर आगाराची लातूर - हैदराबाद गाडी मागील काही दिवसांपासून चालक व वाहकांच्या मनमानीमुळे गावात येत नाही. त्यामुळे प्रवाशांची हेळसांड होत आहे. वेळीच चालक व वाहकांनी नियुमानुसार गाडी गावात घेऊन यावी, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करु, असा इशारा सरपंच यांनी एसटी महामंडळास दिला आहे.

तत्कालीन सरपंच कै. धनाजीराव चव्हाण यांनी रास्ता रोको आंदोलन करीत सन २००५ पूर्वी लांब टप्प्याच्या सर्वच एसटी बस सेवा हलगरा गावात आणल्या होत्या. तेंव्हापासून आजतागायत या सर्व गाड्यांची सुरळीत सेवा सुरु असताना अलिकडे लातूर आगाराची लातूर हैदराबाद ही गाडी चालक व वाहकांच्या मर्जी नुसार कधी गावात येते, तर कधी येत नाही. त्यामुळे थेट हैदराबादवरुन ये-जा करणाऱ्या प्रवाशांची हेळसांड होत आहे. नेमकं गाडी गावात येणार का नाही हे कळत नाही. वाट पहात थांबले तर गाडी हलगरा फाट्यावरुन सरळ निघून जाते. त्यामुळे गावात प्रतिक्षा करीत बसलेल्या प्रवाशांची मात्र तारांबळ उडते.

लातूरवरुन निघालेली लातूर - हैदराबाद गाडी हलगरा गावात न येता फाट्यावरून सरळ निघून गेली. चालक महाशयांना अडवून विचारले असता गावात जात नाही, असे उत्तर दिले. याच गाडीतून हलगरा गावात जाणारे अनेक प्रवासी ना विलाजाने फाट्यावर उतररले. गावात हैदराबाद गाडीची प्रतिक्षा करणारे अनेक प्रवासी गावातच ताटकळत उभे राहिले.

प्रत्येक आगाराच्या चालक वाहकांनी मनमानी न करता वेळापत्रकानुसार गाड्या गावात घेऊन याव्यात, अन्यथा पुन्हा रास्ता रोको आंदोलन केले जाईल, असा इशारा सरपंच योगेश रमेश पाटील यांनी दिला.

याबाबत लातूरचे एटीएस संतोष बिराजदार यांच्याशी संपर्क केला असता ही गाडी हलगरा गावात गेली पाहिजे असे सांगून संबंधितांवर कारवाईचे आश्वासन दिले.

## सोशल मीडियाचाच धोका, सायबर सेलची करडी नजर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** सोशल मीडिया हे सर्वात प्रभावी माध्यम असले तरी त्याचा सर्वजण सदुपयोगच करतील असे नाही. अलिकडच्या काळात या मीडियातील खोट्या



बातम्या, व्हिडिओ किंवा आक्षेपार्ह पोस्ट यामुळेच कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न अनेक ठिकाणी निर्माण झाला होता. त्यामुळे आगामी काळातील सणोत्सव आणि महामानवांच्या जयंती दरम्यान सायबर सेलची सोशल मीडियावर करडी नजर राहणार असल्याचे संकेत पोलीस प्रशासनाने शांतता कमिटीच्या बैठकीत दिले आहेत.

रमजान ईद आणि त्यानंतर महामानवांची जयंती असे सामाजिक कार्यक्रम होणार आहेत. शांतता कमिटीची बैठक पार पडल्यानंतर शनिवारी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली येथील नियोजन समिती सभागृहात जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले.

यावेळी सुरुवातीला प्रशासनाकडून काय अपेक्षित आहे, याबाबत लातूरकरांनी अपेक्षा व्यक्त केल्या शिवाय काही सूचनाही केल्या. नागरिकांच्या सूचनांचा योग्य विचार करुन शहरातील रस्त्यांची दुरुस्ती, जयंतीसाठी परवाने, सार्वजनिक ठिकाणी विद्युत पुरवठा यासारख्या बाबींवर चर्चा झाली.

तर अशा सणोत्सवात सोशल मीडियावरुन काय प्रसारीत केले जाते हे देखील महत्त्वाचे आहे. फेसबुक, इंस्टा, व्हॉट्सॲप, ट्विटर, स्नॅपचॅट यासारख्या माध्यमांवर काय संदेश दिले जातात यावर पोलिसांचे लक्ष असणार आहे. सायबर सेलमार्फत २४ तास विशेष लक्ष राहणार असल्याचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले.

श्रीराम नवमी, हनुमान जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा बसवेश्वर जयंती आणि गुढीपाडवा व रमजान ईद हे साजरे होत असताना कायदा-सुव्यवस्थेचे पालन करावे असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

## महिलांनी आत्मनिर्भर व्हावे : आशाताई भिसे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** एकाग्रता, बचत करणे, काटकसर करणे हा महिलांचा मूळ स्वभाव असून घरातील अर्थकारण मजबूत होणेकरिता त्या नेहमीच प्रयत्नशील असतात. महिलांनी आत्मनिर्भर होणे करिता शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे, बचत गटाच्या माध्यमातून छोटे मोठे व्यवसाय करणे, उद्योग उभारणे गरजेचे असल्याचे आशाताई भिसे यांनी सांगितले.

दर्जी बोरगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष निवासी शिबिरात महिला मेळावा संपन्न झाला. यावेळी त्या बोलत होत्या. या




मेळाव्यास महिला आयोग, महाराष्ट्र राज्य माजी सदस्या आशाताई भिसे, मुक्ताबाई माने, उपसरपंच इंदुबाई माने, कृषि महाविद्यालयचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे उपस्थित होते.

डॉ. ठोंबरे म्हणाले की कृषि शिक्षणाकडे पाहण्याचा मुलींचा दृष्टीकोन बदलला आहे. पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी कृषि शिक्षणामध्ये मुलींचा टक्का वाढून ५०% च्याही पुढे गेला आहे. कृषिचे शिक्षण घेतल्यावर कृषि क्षेत्राकडे अनेक महिला वळत आहेत परंतु कृषि आधारित व्यवसायामध्ये महिलांचा सहभाग तुलनेने कमी असून तो वाढविणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले.

यावेळी स्नेहल बरगिले, हर्षदा दाभाडे, कार्तिकी माने या विद्यार्थिनींनी स्वागत गीत गायले. वैष्णवी सामंत हिने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दयानंद मोरे, सुत्रसंचालन आरती निमसे व आभार प्रदर्शन डॉ. सारिका भालेराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिलकुमार कांबळे, डॉ. रमेश ढवळे, डॉ. प्रभाकर अडसूळ, डॉ. योगेश भगत यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी प्रीती मोरे, वर्षा कांबळे आदिंची उपस्थिती होती.

## एका महिन्यात २४ लाखांचा मुद्देमाल जप्त : उत्पादन शुल्कची कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** मार्च महिन्याचे उद्दिष्ट आणि जिल्ह्यात अवैध दारुविक्रीला आळा बसावा म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईच्या धडक्याने गेल्या महिन्याभरात राज्य उत्पादन शुल्क विभागाने ३४ ठिकाणी कारवाई करीत २४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गेल्या वर्षभरात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धाडीमध्ये सातत्य ठेवल्याने कारवाईचा आणि मुद्देमाल हस्तगत करण्याचा आकडाही वाढला आहे. मार्च महिन्याच्या अनुषंगाने जिल्ह्याचे अधीक्षक केशव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष गुन्हा अन्वेषणाच्या मोहिमा राबविण्यात आल्या होत्या.

अवैध मद्य निर्मिती, विक्री आणि वाहतूकीच्या विरोधात लातूर, उदगीर, निलंगा, चाकूर विभागात संयुक्तरित्या मोहिम राबवून कारवाई करण्यात आली होती. यामध्ये ३४ आरोपींना अटक करुन दारु वाहतूक करणारी १४ वाहने, २६४ लिटर हातभट्टी दारु, १२० लिटर देशी तर ९७ लिटर विदेशी दारु असा मिळून २३ लाख ८८ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई निरीक्षक आर. एस. कोतवाल यांच्यासह इतरांनी केली.




## राज प्रतिष्ठानतर्फे ईदसाठी शिधा वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** येथील राज प्रतिष्ठानच्यावतीने शहरातील इस्लामपुरा परिसरातील १०० गरजू मुस्लीम परिवारांना शुक्रवारी रमजान ईदसाठी शीरखुर्मा साहित्य तसेच शिधा वाटप करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यस्थानी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे होत्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते अभिजीत देशमुख, हंसराज जाधव, डॉ. हर्षवर्धन राऊत, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, धनजंय शेळके, दत्तात्रय पाटील, सलिम शेख, ॲड. इनुस जमादार, हकीम शेख, अल्ताफ खान, जावेद शेख, अकबर शेख, इम्रान शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रोहिणी नऱ्हे व अभिजीत देशमुख यांनी राज प्रतिष्ठानच्या सामाजिक कार्याचे कौतुक करीत प्रतिष्ठानने सामाजिक बांधिलकीत आपली वेगळी ओळख दिली आहे. सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता जपण्यात हे प्रतिष्ठान मोलाची भूमिका बजावत असून हे कार्य दिशादर्शक व प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

## समाजाप्रती आपल्या संवेदना जागृत ठेवा : आविष्कार गोजमगुंडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३० मार्च -** समाजातील वेदना जाणून घेण्यासाठी युवकांनी आपल्या संवेदना नेहमी जागृत ठेवल्या पाहिजे असे प्रतिपादन जेष्ठ रंगकर्मी अविष्कार गोजमगुंडे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर द्वारा पदवी आणि पदव्युत्तर अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक राजेश्वर बुके, रंगकर्मी राजू गड्डीमे, प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, खटउ समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, पदव्युत्तर समन्वयक डॉ. यशवंत वळवी, वाणिज्य शाखा समन्वयक



डॉ. विजयकुमार सोनी, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांनी अभिवादन करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. गोविंद पवार आणि विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना गोजमगुंडे म्हणाले की, आज समाजात माणुसकी जपणे अत्यंत आवश्यक आहे. संवेदनशील तरुण पिढीच समाज परिवर्तन करू शकते. समाज माध्यमांचा माफक उपयोग करून वाचन, लेखन, संशोधन आणि विश्लेषण या कार्यात विद्यार्थी दशेत लक्ष दिले पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात भव्य दिव्य यश मिळवण्यासाठी संघर्षाला सामोरे जावेच लागते असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना रंगकर्मी राजू गड्डीमे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानासोबत विविध छंद जोपासून आपला व्यक्तिमत्व विकास साधला पाहिजे असे ते म्हणाले. प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या तत्त्वज्ञानावर आणि श्री देशीकेंद्र महाराज यांच्या शिक्षणरूपी बहुमोल विचाराने सन १९७० पासून महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातर्फे शैक्षणिक ज्ञानार्जनासोबत कला, विज्ञान, वाणिज्य, समाजकार्य, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये संस्था पदाधिकारी व महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनींच्या मार्गदर्शनाने विद्यार्थी आपल्या भावी जीवनामध्ये उत्तुंग यश प्राप्त करीत आहे असे सांगून पुढील पदव्युत्तर शिक्षणासाठी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अश्विनी रोडे, साक्षी घोडके, शिवाली मुकडे यांनी केले तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनेकांनी परिश्रम घेतले.